# अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर
## नगरसचिव विभाग

**महानगरपालिका सचिव कार्यालय** जा.क्र. : अम/सका- ०१ दिनांक : २२-०७-२०२०.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सर्वसाधारण स

भेची सुचना (ऑनलाईन ॲप व्दारे)

( महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे अनुसूची ड चे प्रकरण - २ नियम क्र.१ (अ)अन्वये )

**सभा सुचना क्रमांक ०१, बुधवार दिनांक - २९ / ०७ /२०२०.**

प्रति,
मा.श्री. / श्रीमती...........................................

सदस्य,
अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.

महोदय,

याद्वारे कळविण्यांत येते की, अहमदनगर महानगरपालिकेची सर्वसाधारण सभा क्रमांक - १ **बुधवार दिनांक २९/०७/२०२० रोजी दुपारी १.०० वाजता** मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक ०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये ऑनलाईन ॲप व्दारे सोबतच्या विषय पत्रिकेतील कामकाज चालविण्यांसाठी आयोजित केली आहे.

तरी आपणांस सदर सभेस ॲप व्दारे ऑनलाईन सहभागी होण्याची विनंती करण्यांत येत आहे.

**सोबत :** १. विषय पत्रिका
२. प्रस्तावांची टिप्पणी
३. मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक ०३ जुलै २०२० रोजीचे पत्र.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

**टिप :-** १) प्रत्येक सदस्याने आपल्या Android / Smartphone मध्ये Playstore वरुन AMC Corporator official What's App मध्ये निर्देश दिल्यानुसार ॲप डाउन लोड करुन घेणे.
२) वरिलप्रमाणे ॲप व्दारे प्रत्येक सदस्यांना मा.महासभेस उपस्थित राहता येईल.
३) मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक ०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये कळविले नुसार सदरची सभा ऑनलाईन ॲप व्दारे आयोजित केली असून, सदर ऑनलाईन सभेच्या प्रक्रिये संदर्भात अधिक माहितीसाठी सन्मा. सदस्यांनी महानगरपालिका सिस्टीम मॅनेजर श्री.अंबादास साळी मो.नं.९५६१००४६४४ यांचेशी संपर्क साधावा ही विनंती.

**अहमदनगर महानगरपालिका, अहमदनगर.**

सभा क्रमांक-१ बुधवार दिनांक - २९ / ०७ / २०२० रोजी दुपारी १.०० वाजता मा.उपसचिव, महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक ०३ जुलै २०२० रोजीचे पत्रान्वये ऑनलाईन ॲप व्दारे होणा-या सर्वसाधारण सभेची विषय पत्रिका.

| विषय क्र. | विषय |
|---|---|
| ०१ | गंगा उद्यान ते नविन जिल्हाधिकारी कार्यालया पर्यंतचा १५ मीटर रुंदीचा विकास रस्त्या बाबत. |
| ०२ | अहमदनगर महानगरपालिकेतील स्वच्छता ही सेवा (SHS) दिनांक १५/०९/२०१८ ते ०२/१०/२०१८ हा उपक्रम राबविणे बाबत... |
| ०३ | नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षासाठी रक्कम रु.७७.०० लक्षचा प्रस्ताव मंजूरीसाठी मा.महासभेपुढे मान्यतेसाठी सादर करणे बाबत |
| ०४ | घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील कचरा संकलन व वहातुकीचे कामांचे देयके १४ व्या वित्त आयोगातुन प्राप्त निधीतुन अदा करणे व अदा केलेबाबत मा.महासभेची कार्योत्तर मंजुरीकामी मिळणेबाबत...<br>संदर्भ :- मा.आयुक्त साहेब यांची दि.१९/०२/२०१९ रोजीच्या मंजूरीनुसार. |
| ०५ | **मनपा कर्मचा-यांचे वैद्यकीय खर्चाचे प्रतिपुर्ती देयक अदाई बाबत...**<br>श्री.रविंद्र तात्यासाहेब कोतकर पदनाम- बिगारी वॉचमन वैद्यकीय प्रतिपुर्ती देयक रक्कम रु. ३,५८,७२२/- |
| ०६ | एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम अंतर्गत नालेगांव स.नं. २२०,२२१ (फेज-१ वारुळाचा मारुती) व नालेगांव स.नं.४१/२ (फेज-२ काटवण खंडोबा) येथील बांधण्यात आलेल्या कम्युनिटी सेंटर सेवाभावी संस्थेस (एनजीओ) भाडेतत्वावर चालविणेस देणे बाबत |
| ०७ | पथदिवे देखभाल दुरुस्तीसाठी निविदा प्रक्रीया पार पाडणेसाठी नविन अंदाजपत्रकीय तरतूद निर्माण करणे बाबत... |
| ०८ | अहमदनगर महानगरपालिकेच्या फेज-२ या व्यापारी संकुलातील हॉल क्रमांक १ ते ९ औद्योगिक व कामगार न्यायालय, अहमदनगर या न्यायालयाचे इमारत भाडे व कर आकारणी बाबत... |
| ०९ | सिध्देश्वर भागवत प्रिंटर्स यांचे सन २००३-२००४ या आर्थिक वर्षातील छपाई टेंडर एफडीआर रिफंड बाबत... |
| १० | उत्पन्नाच्या वाढीसाठी खाजगीकरणाच्या माध्यमातुन BOT तत्वावर महालक्ष्मी उद्यान व सिध्दीबाग उद्यान चालविणेस देणेबाबत.. |
| ११ | दैनिक लोकमंथन, दैनिक पुण्यनगरी, दैनिक सामना, दैनिक नवामराठा, दैनिक सार्वमत, दैनिक समाचार, दैनिक नगरटाईम्स, साप्ताहिक लोक अंकुर, साप्ताहिक ज्ञानधारा या वृत्तपत्रातुन प्रसिध्द केलेल्या जाहिरातीच्या दिनांक २२/०६/२०१८ ते २७/१२/२०१८ या कालावधीतील बीले मा.महासभेकडे मंजुरीस्तव पाठविणे बाबत... |

| | |
|---|---|
| १२ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील आरक्षण क्रमांक २१६ अ (सार्वजनिक सुविधा) या आरक्षणाखाली जमिनीचे भुसंपादन करणे बाबत... |
| १३ | नगररचना योजना क्र.४, अंतिम भुखंड क्र.२६७ या जागेच्या मंजुर रेखांकना मधील खुली जागा क्षेत्र १३४१.५१ चौ.मी. या जागेवर वाचनालय विकसित करणेसाठी अहमदनगर जिल्हा वाचनालयास परवानगी देणे बाबत... |
| १४ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधुन वाहणा-या सिना नदी व मुख्य नाल्याची पुररेषा विकास योजना आराखड्यावर अंतर्भुत करुन त्याची अंमलबजावणी करणे बाबत. |
| १५ | अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधील सिना नदीमध्ये जाणा-या सात नाल्यांचे (Restoration) जिर्णोध्दार करणे करीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करणे बाबत.. |
| १६ | बुरुडगांव स.नं.३४ या ठिकाणी दैनंदिन ५० मे.टन क्षमतेचा कचरा कचरा खत प्रकल्प Processing plant ५० TPD at Burudgaon मशिनरी उभारणे व एक वर्षा करीता देखभाल दुरुस्ती कामी एकत्रित ई-निविदा मागविणे बाबत. |
| १७ | सावेडी येथील सर्व्हे नं.२८९ मधील अहमदनगर महानगरपालिकेचा कचरा डेपो इतरत्र हलवून त्या ठिकाणी स्मशानभुमी, उद्यान व मल्टीपर्पज क्रीडा संकुल विकसित करणे बाबत... |
| १८ | मा.सदस्य यांचे रजेचे अर्ज.. |

मा.महापौर सो, यांचे मान्यतेने.
दिनांक : २२ / ०७ /२०२०.

प्र.नगरसचिव,
अहमदनगर महानगरपालिका.

## अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.

**प्रस्ताव क्रमांक : ०१** **दिनांक : २९ / ०७ /२०२०.**

---

**प्रस्तावाचा विषय :** गंगा उद्यान ते नविन जिल्हाधिकारी कार्यालया पर्यंतचा १५ मीटर रुंदीचा विकास रस्त्या बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- १) मा.महापौर, अहमदनगर यांचे कडील दिनांक १०/१०/२०१७ चे पत्र.

२) मा.योगीराज गाडे सदस्य म.न.पा.यांची यादी दिनांक ०७/११/२०१७.

अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील मंजूर विकास योजनेतील गंगाउद्यान ते नविन जिल्हाधिकारी कार्यालया पर्यंतचा १५ मीटर रुंदीच्या विकास योजना रस्त्या साठी ॲड.श्री.निळकंठ नारायण सोले यांचे खाली दर्शविल्या प्रमाणे रस्त्या करीता क्षेत्र बाधीत होत आहे.

| अ.नं. | सर्व्हे नंबर | प्लॉट नंबर | बाधित होणारे क्षेत्र चौ.मी. |
|---|---|---|---|
| १ | सावेडी ९७/३/अ/२ | १० | ०९०.०० |
| | | ११ | १८५.०० |
| | | ३५ | ११७.०० |
| | | ३६ | १५०.०० |
| | | **एकूण** | **५४२.००** |

जमीन मालक श्री.सोले यांना इकडील कार्यालयीन दिनांक १७/०३/२०१७ चे पत्रान्वये वरील प्रमाणे बाधित होणा-या क्षेत्राची २.५० पट एवढा विकास हक्क हस्तांतरण (टी.डी.आर.) नियमाप्रमाणे देता येईल असे कळविण्यांत आलेले होते. त्याबाबत त्यांनी त्यांचे दिनांक ०१/०४/२०१७ चे पत्रान्वये टी.डी.आर. घेण्यास नकार देवून भू-संपादन कायद्यातील तरतुदी नुसार नुकसान भरपाईची रक्कम मिळावी असे इकडेस कळविलेले आहे.

या अनुषंगाने मा.महापौर यांचे कार्यालयात दिनांक १०/१०/२०१७ रोजी बैठक संपन्न झाली. या बैठकीस मा.आयुक्त, मा.योगीराज गाडे सदस्य, सहाय्यक संचालक, नगररचना व श्री.बल्लाळ सहा.नगररचनाकार उपस्थित होते. श्री.सोले यांना या जागेच्या मोबदल्यात टि.डी.आर घेणे बाबत सुचविण्यात आले तथापि त्यास त्यांनी नकार दिलेला आहे. व शासकीय मंजूर दरा प्रमाणे मोबदला घेणेस तयार असल्याचे सांगीतलेले आहे. त्याप्रमाणे कार्यवाही करणे बाबत मा.महापौर यांनी सुचना दिलेल्या आहेत.

विषयांकित रस्ता अत्यंत महत्वाचा रस्ता असुन मनमाड रस्ता व औरंगाबाद रस्ता यांना जोडणारा आहे. विषयांकित रस्ता पुर्णपणे अस्तीत्वात आल्या नंतर नगर मनमाड रस्ता व औरंगाबाद रस्ता यांना जोडणारी महत्वाची लिंक तयार होणार आहे. सध्या हा रस्ता जिल्हा स्तरीय मुलभूत सेवा सुविधा योजने अंतर्गत बांधणेचे काम प्रगती पथावर आहे. तथापि श्री.सोले यांचे भुखंडातून सदर रस्ता प्रस्तावित असल्याने श्री.सोले यांनी सदर रस्त्याचे काम थांबविले आहे. हा रस्ता पुर्ण पणे विकसीत करणे साठी श्री.सोले यांना योग्य ती नुकसान भरपाई देणे आवश्यक आहे. म्हणजेच हा रस्ता वाटाघाटीच्या माध्यमातुन अथवा अनिवार्य भू-संपादनाच्या माध्यमातुन म.प्रा.नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२६ अनवये संपादन करणे आवश्यक आहे.

उपरोक्त कलम १२६ (१ अ) अन्वये विकास योजनेतील आरक्षणे संपादन करण्याचे अधिकार मा.महासभेस असल्याने सदर प्रस्ताव मंजूरी साठी मा.महासभेस सादर करणे आवश्यक आहे.

वर नमुद रस्त्या खालील जागेची शासनाच्या वार्षिक मुल्यदर तक्त्या प्रमाणे खालील प्रमाणे अंदाजीत रक्कम येईल.

सन २०१७-२०१८ चे वार्षिक मुल्यदर तक्त्या प्रमाणे सदर जमिनीची प्रति चौरस मिटर रक्कम १३५३०/- रुपये इतकी येते. त्यानुसार श्री.सोले यांचे भू-संपादन करणेचे प्लॉटची किंमत रक्कम खालील प्रमाणे येईल. जागेचे वार्षिक मुल्यदर तक्त्या प्रमाणे रुपये १३,५३०/- चौ.मी. इतका दर आहे.

| | | | |
|---|---|---|---|
| अ) | किंमत - १) ५०० X १३५३० | = | ६७,६५,००० |
| | २) ४० X १३५३० X ०.९० | = | ४,८७,०८० |
| | एकुण | = | ७२,५२,०८० |
| | ३) सदर जागा वि.यो.रस्त्या पैकी | | ७२,५२,०८० X ०.८० |
| | असल्याने ८०% इतका दर | = | ५८,०१,६६४ |
| | एकुण किंमत | | ५८,०१,६६४/- |
| ब) | दिलासा रक्कम (सोले शिएम.) १००% | = | ५८,०१,६६४ |
| क) | मुळ किंमत + दिलासा रक्कम | = | १,१६,०३,३३८ |
| ड) | खाजगी वाटाघाटीने जागा संपादीत | | |
| | करावयाची असल्याने २५% वाढ = | | २९,००,८३२ |
| | आवश्यक एकुण रक्कम | = | १,४५,०४,१६०/- |

सदरची रक्कम ही अंदाजीत असून; अर्थात योग्य ती रक्कम ठरविण्याचा अधिकार उपरोक्त शासन निर्णया प्रमाणे मा.जिल्हाधिकारी यांचे अध्यक्षते खाली गठीत केलेल्या समितीस आहेत.

सबब वरील प्रस्ताव मंजूरी साठी मा.महासभेस सादर करणे आवश्यक आहे. मा.महासभेच्या मान्यतेनंतर सदर प्रस्ताव शासन निर्णय क्र.संकिर्ण /०३/२०१५/प्र.क्र.३४/अर२ दिनांक १२/०५/२०१५ मधील तरतुदीनुसार पुढील कार्यवाहीसाठी मा.जिल्हाधिकारी अहमदनगर यांना सादर करण्यांत येईल.

येथे नमुद करण्यात येते की, विषयांकित रस्त्यात इतर ही काही खाजगी भूखंड बाधीत होत आहेत. या भुखंड धारकांनी देखील बाधीत जागे बाबत योग्य ती कार्यवाही करणे बाबत इकडेस कळविलेले आहे. या भुखंड धारकांना हस्तांतरणीय विकास हक्क (टी.डी.आर.) घेणेबाबत सुचविण्यात आले असुन या भुखंडधारकांनी त्यास तोंडी संमती दिलेली आहे. याबाबत या विभागामार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे. तथापि यापैकी काही भुखंडधारकांनी टी.डी.आर. घेण्यास नकार दिल्यास त्यांच्या देखील रस्त्याखालील बाधीत होणा-या जागा भुसंपादन कायद्यान्वये अथवा उपरोक्त शासन निर्णयानुसार खाजगी वाटाघाटी करुन संपादीत कराव्या लागतील सबब विषयांकित रस्त्याकडील बाधीत भुखंड देखील भुसंपादन कायद्याचे माध्यमातुन अथवा शासन निर्णय क.संकिर्ण ०३/२०१५/प्र.क्र.३४/अर२ दिनांक १२/०५/२०१५ मधील तरतुदी प्रमाणे भुसंपादन करण्यास मा.महासभेची मंजुरी घेणे आवश्यक राहील. याबाबतचा प्रस्ताव मा.महासभेस मंजुरीस्तव सादर करणे योग्य होईल.

आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त श्री.मंगळे साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

**---*---**

**चर्चा :-**

**मा.महापौर साहेब :-** विषय क्रमांक १ चे वाचन करा. अजिंक्य बोरकर यांनी वेळोवेळी भेटुन ते स्वतः त्या रस्त्याच्या जवळ राहतात. हा रस्ता होणे नागरिकांच्या दृष्टीने अत्यंत महत्वाचा आहे असे सांगीतले. हा रस्ता खुला करणेबाबत सदस्यांना काही बोलायचे असेल तर बोलू द्या.

**मा.श्री.स्वप्नील शिंदे :-** हा रस्ता लवकरात लवकर चालू करायला पाहीजे.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** या भागाचे नगरसेवक यांनी भागातील रस्त्याची मागणी केली आहे. टीडीआर वगैरे देण्यास हरकत नाही.

**मा.श्री.स्वप्नील शिंदे :-** परत एकदा त्यांना बोलावून टीडीआर बाबत चर्चा करावी.

**मा.श्री.सुनिल त्रिंबके :-** बोरकर साहेबांनी वेळोवेळी पेपर जमा केलेले आहेत.

**मा.श्री.मुदस्सर शेख :-** अजिंक्य बोरकर यांचे घरासमोरील रोड होणे गरजेचे आहे. प्लॉट बाबत तुम्ही निर्णय घ्या. टी.पी.कडून मंजूरी देण्यांत यावी. टीडीआर चा विचार करुन मंजूरी घेण्यात यावी.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** गंगा उद्यान शेजारी रस्त्यासाठी शिलाताई शिंदे महापौर असतांना मुलभुत सोयी सुविधा निधी अंतर्गत आला होता. हा रस्ता ३ ठिकाणी अडवला आहे. भिंगारे, फकीर यांचे जमिनीमुळे हा रस्ता अडला आहे. माझे ७ नोव्हेंबर २०१७ चे पत्र जोडले आहे. हा रोड खुला झाला पाहिजे तो टीपी च्या रेडीरेकनर १३५३० हा कोणत्या हिशोबाने घेतला आहे. तीनही ठिकाणचा विषय मिटवला पाहिजे. इतर दोन प्लॉट धारक जर चर्चेला आलेच नाहीतर हा रस्ता होणार नाही. तिघांचाही विषय मिटवला पाहीजे.

**मा.महापौर साहेब :-** रस्ता संपूर्ण खुला झाला पाहीजेच. त्यांना टीडीआर मार्फत रस्ता खुला करण्याची मागणी करु. मा.शासनाच्या रेडीरेकनर दरानुसार त्यांना दर देणार आहोत. प्रथम टीडीआर ची रक्कम आकारुन नंतर इतर पर्यायांचा विचार करुन रस्ता खुला करुन घेवू.

**मा.श्री.उमेश कवडे :-** प्रथम कोरानात मृत्यूमुखी पडलेल्यांना सभागृहात श्रध्दांजली अर्पण करु महाराष्ट्राचे मुख्यमंत्री यांचा वाढदिवस झाला त्यांच्या अभिनंदनाचा ठराव सभागृहाचे वतीने करण्यांत यावा.

**मा.महापौर साहेब :-** ठीक आहे.

**मा.श्री.रविंद्र बारस्कर :-** मा.श्री.देवेंद्रजी फडणवीस साहेब यांचा वाढदिवस झाला आहे. त्यांचे अभिनंदनाचा ठराव सभागृहात मांडावा.

**मा.महापौर साहेब :-** दोन्ही ठराव अभिनंदनाचे सभागृहात घेवू.

**मा.डॉ.श्री.सागर बोरुडे :-** राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने उपमुख्यमंत्री मा.श्री.अजितदादा पवार साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त अभिनंदनाचा ठराव घेण्यांत यावा.

**मा.महापौर साहेब :-** ठिक आहे.

**मा.श्री.शेख नजीर अहमद अ.रज्जाक :-** कदम मॅडमचा रस्ता आमचे ४ नगरसेवकांचा आहे. त्यास अनुमोदन देतो.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** अहमदनगर शहरात कोरोना पॉझिटीव्ह रुग्ण सापडत आहेत. प्रशासन यावर काय काय उपाय योजना करीत आहेत.

**मा.महापौर साहेब :-** एकेक विषय होवू द्या. विषयपत्रिके वरील विषय होवू द्या.

**मा.श्री.विनीत पाऊलबुध्दे :-** या रस्त्या संदर्भात टिपणीमध्ये टीडीआर घेणे बाबत प्लॉट धारकांनी तोंडी संमती दिली आहे असा उल्लेख केलेला आहे. उद्या ते नाही म्हटले तर ?

**मा.महापौर साहेब :-** त्यांचेशी चर्चा करुनच टीडीआर घेणे संदर्भात सूचना केल्या. त्यांची काय मागणी असेल त्याप्रमाणे सुधारणा करता येतील.

**मा.श्री.विनीत पाऊलबुध्दे :-** त्यांची लेखी संमती घ्या.

**मा.महापौर साहेब :-** लेखी घेवू.

**मा.श्री.गणेश भोसले :-** माझा आवाज तिकडे क्लेअर जात नाही. पुढच्या वेळी मी कमी बोलेल प्रत्येक विषयावर प्रत्येकाला बोलण्याची सेधी द्या. कचरा डेपोच्या विषयावर मला बोलायचे आहे.

**मा.सौ.चितळे :-** पावसाचे पाण्यामुळे एक ते दिड फुट खड्डे रस्त्यामध्ये पडले आहेत. नागरिक जखमी होतात प्रशासनाने काय नियोजन केले आहे.

**मा.महापौर साहेब :-** संबंधित इंजिनियरला आजच पाहणी करायला लावू.

**मा.सौ.शीला चव्हाण :-** ॲड.सोले यांच्या प्लॉटमधून गेलेल्या रस्त्याचा टीडीआर घ्यायला नकार दिला आहे. रेडीरेकनर दर रुपये १३५००/- कशाच्या आधारे काढला. त्यांनी जर सन २०१९-२०२० प्रमाणे रेट मागीतला तर आपण देणार का. ही रक्कम मनपा फंडातून देणार का विकास भार निधी मधुन देणार.

**मा.महापौर साहेब :-** श्री.चारठाणकर चालू रेडीरेकर नुसार देणार का जुना रेडीरेकनरचा दर देणार ?

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** जुना रेट देणार आहोत. ज्या वेळेस संपादीत केला त्यावेळीचा रेट दिला जाईल.

**मा.महापौर साहेब :-** इथ जर मान्य झाले नाही तर कलेक्टर साहेबांकडे जाते.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** गंगाउद्यान शेजारील रस्त्यामधील प्लॉट धारक सोलें यांचेशी चर्चेचा विषय आता घेतला त्या ठिकाणी आणखी दोन प्लॉट धारक आहेत. श्री.सी.डी.फकीर व श्री. भिंगारे आहेत. सोलेंना टीडीआर माध्यमातुन देता आले तर ठिक आपण त्या रस्त्यास ३ कोटी टाकले असतांना १.५ कोटी शिल्लक आहे महानगरपालिकेचा निधी असतांना एकाचा प्लॉट घेतलात. व इतर दोघांचे जर खरेदी केले नाही तर रस्ता होवू शकत नाही. नगररचनाकार यांना सांगून इतर दोघांना बोलावून विषय प्राधान्याने मार्गी लावा. १४ व्या वित्त आयोगातुन आयुक्तांनी कीती रक्कम कोवीड साठी आली व कुठे खर्च केली याची माहिती द्या. आम्हाला प्रभागातुन फोन येतात.

**मा.महापौर साहेब :-** आयुक्त साहेब सांगतील.

**मा.आयुक्त साहेब :-** १४ व्या वित्त आयोगातुन आज मितीला कोव्हीड करीता १६ लाख रुपये आले होते. त्याअनुषंगाने डिझॉस्टर मॅनेजमेंट अंतर्गत आपण खर्च केले.

**मा.महापौर साहेब :-** कोरोनासाठी १६ लाख रुपये आले.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** कोरोना या आजाराकरीता जिल्ह्याला आपत्कालीन निधी आलेला आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** आपल्याकडे आतापर्यंत आपत्कालीन निधी अंतर्गत १६ लक्ष रक्कम आलेली आहे. कोव्हीड साठी प्राप्त झालेला आहे. महानगरपालिकेला १६ लाख डिझॉस्टर मॅनेजमेंट अंतर्गत प्राप्त झालेला निधी आहे.

**मा.श्री.अनिल शिंदे :-** कोव्हीड या आजाराकरीता आतापर्यंत किती खर्च झाला.

**मा.आयुक्त साहेब :-** १६ लाख खर्च झाला. कोव्हीड या आजाराकरीता झालेला खर्च मी सभागृहासमोर मांडणार आहे. याकरीता एक वेगळी बैठक घेवू त्यामध्ये या आजारावर किती खर्च झाला याची माहिती देण्यांत येईल.

**मा.महापौर साहेब :-** महासभेत झालेल्या चर्चेनुसार व मा.सौ.शोभाताई बोरकर यांनी दिलेल्या पत्रानुसार श्री.निलकंठ सोले सौ.अलका निकाळजे, श्री.फकीर व श्री.भिंगारे यांची सदर रस्त्यामध्ये जागा बाधीत होत असल्याने त्यांना टीडीआर देण्याबाबत कार्यवाही करावी. टीडीआर घेण्यास नकार दिल्यास भूसंपादन कायद्यान्वये रोख स्वरुपात रक्कम देणे बाबत कार्यवाही करावी.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट व महासभेत झालेली चर्चा व नगरसेविका श्रीमती.शोभाताई बोरकर यांचे पत्रानुसार अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील गंगा उद्यान ते नविन जिल्हाधिकारी कार्यालया पर्यंतचा १५ मीटर रुंदीचा विकास रस्त्या मध्ये श्री.निलकंठ सोले, श्री.भिंगारे, सौ.अलका निकाळजे व श्री.फकीर यांची सदर रस्त्यामधील जागा बाधीत होत असल्याने त्यांना टीडीआर देण्याबाबत कार्यवाही करावी. टीडीआर घेण्यास नकार दिल्यास भूसंपादन कायद्यान्वये, खाजगी वाटाघाटीने शासकीय बाजारमूल्य दर तक्ते दरानुसार रोख स्वरुपात रक्कम देणे बाबत कार्यवाही करावी. यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार आवश्यक ती कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्रीमती.शोभा सुधाकर बोरकर

अनुमोदक :- मा.श्री.स्वप्नील रोहीदास शिंदे

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ०२** **दिनांक : २९ / ०७ /२०२०.**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिकेतील स्वच्छता ही सेवा (SHS) दिनांक १५/०९/२०१८ ते ०२/१०/२०१८ हा उपक्रम राबविणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

**संदर्भ :-** नविन कुमार अग्रवाल, डायरेक्टर (SBM) यांचेकडील दिनांक १४/०९/२०१८ रोजीचा मेल.

महात्मा गांधी यांची १५० वी जयंती व स्वच्छ भारत अभियान (नागरी) या कार्यक्रमाची ४ थी वर्षपूर्ती हे "स्वच्छता ही सेवा" हा उपक्रम राबवुन साजरा करण्याचे केंद्र शासनाने ठरविले आहे.

सदर कार्यक्रम राबविण्यासाठी स्थानिक स्वराज्य संस्थांनी मोठया प्रमाणावर लोकसहभाग मिळविण्या करीता विविध स्वच्छता विषयक कार्यक्रमांचे आयोजन करावयाचे आहे. या कालावधी दरम्यान श्रमदान सार्वजनिक स्वच्छता, स्वच्छतेची शपथ, प्रभात फेरी यांचे आयोजन, विशेषतः झोपडपट्टयांवर लक्ष केंद्रीत करुन करावयाचे आहे.

सुयोग्य व प्रभावी अंमलबजावणी करीता खालील प्रमाणे कार्यवाही विहीत कालावधीत करणे आवश्यक राहील.

अ) सर्व स्थानिक स्वराज्य संस्था दि.०२/१०/२०१९ पर्यंत प्लास्टीक मुक्त होण्यासंदर्भात ठराव करणे.

ब) सर्व स्थानिक स्वराज्य संस्था दि.०२/१०/२०१९ पर्यंत मशिनव्दारे नाल्याची स्वच्छता करावयाची कृती आराखडयाला मंजुरी देणे.

क) सर्व औद्योगिक वसाहतीत स्वच्छता मोहीम राबविणे इ.

सदर उपक्रमांचे केंद्र व राज्य पातळीवर मुल्य मापन होणार असल्याने केंद्र शासनाने निश्चीत करुन दिलेल्या दिनांकास त्याचे आयोजन केले जाईल. याची दक्षता आपल्या स्तरावरुन घेण्यात यावी. आपण आयोजित केलेल्या उपक्रम / कार्यक्रमाचे डाक्युमेंटेशन उदा. फोटोग्राफ, व्हीडीओ व सविस्तर अहवाल स्वच्छता मंच www.swachhmanch.in या संकेत स्थळावर नियमित अपलोड करावयाचे आहे.

सदर उपक्रम राबविल्यास त्यास स्वच्छ सर्व्हेक्षणामध्ये ५ गुण मिळणार आहेत. सदरचा उपक्रम हा दिनांक १५/०९/२०१८ ते ०२/१०/२०१८ पर्यंत राबविणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने उपरोक्त (अ) नुसार सर्व स्थानिक स्वराज्य संस्था दिनांक ०२/१०/२०१९ पर्यंत प्लास्टीक मुक्त होण्या संदर्भात ठराव करणे आवश्यक असलेने अहमदनगर महानगरपालिका हद्दीमध्ये दिनांक ०२/१०/२०१९ पर्यंत संपुर्ण प्लास्टीक मुक्तीचा संकल्प करणेचा ठराव करणेस मा.महासभेपुढे ठेवणे कामी मा.नगरसचिव यांचेकडेस सदर प्लास्टीक मुक्त बाबतचा ठरावाचा विषय मा.महासभेपुढे ठेवणे कामीचा प्रस्ताव मान्यतेस सविनय सादर.

यावर मा.अति.आयुक्त यांचा अभिप्राय की, उपरोक्त अहवालामधील अ प्रमाणे मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :-**

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** कोव्हीड ला संपूर्ण जग सामोरे जात आहे. बरे होण्याची संख्या तेवढीच आहे. स्वॅबचे रिपोर्टस यायला वेळ लागतो. सिस्टमला अजून नागरिकांची साथ मिळाली पाहीजे माझ्या प्रभागामध्ये एकच सिस्टर आहे. तिला मदतीसाठी एक को-सिस्टर देण्यांत यावी. काहींचे पाच दिवसानंतर रिपोर्ट आले त्यामुळे ते इतरांच्या संपर्कात येत होते. त्यामुळे इतरांना संसर्ग होवू शकतो.

**मा.महापौर साहेब :-** आयुक्त सो म्हणणे मांडले ते लवकरात लवकर कसे प्राप्त होतील हे पाहू.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** थ्री स्टार मानांकनाबद्दल मी प्रशासनाचे अभिनंदन करते. हिच शीस्त महानगरपालिकेने यापुढे ठेवावी. प्रशासनाला विनंती ही मोहीम कायम राहीली पाहीजे.

**मा.महापौर साहेब :-** ऑफिस रिपोर्ट मंजूर.

---*---

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिकेतील स्वच्छता ही सेवा (SHS) दिनांक १५/०९/२०१८ ते ०२/१०/२०१८ हा उपक्रम राबविणेस ही सभा मान्यता देत आहे.

मागील वर्षी आपल्या शहराचे स्वच्छ सर्वेक्षण २०२० अंतर्गत भारता मध्ये ४० क्रमांक आले आहे. तसेच स्वच्छ सर्वेक्षण २०२० मध्ये शहर ओडीएफ ++ व शहर कचरा मुक्त (GFC) थ्री स्टार मानांकन मिळालेले आहे. त्यानुसार मागील वर्षाच्या सुचनेनुसार शहर ओडीएफ ++ करीता शहर हागणदारी मुक्त, शहर कचरा मुक्त (GFC) ५ स्टार मानांकन करीता व स्वच्छ सर्वेक्षण २०२१ तपासणी कामी व दर्जा मिळणे करीता तसेच महानगरपालिकेच्या सर्व स्वच्छता निरीक्षक, मुख्य स्वच्छता निरीक्षक, सहाय्यक स्वच्छता निरीक्षक यांनी पोलीस ड्रेसकोड प्रमाणे ड्रेस वापरावे व घनकचरा नियमांचे उल्लंघन करणा-याला दंडात्मक कारवाई करणेचे अधिकार देणेस ही महासभा मान्यता देत आहे. याबाबत प्रशासनाने पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

अहमदनगर महानगरपालिके मार्फत अमृत अभियान अंतर्गत पाणीपुरवठा योजनेचे काम प्रगतीपथावर आहे या योजनेमध्ये मुळाधरण ते वसंतटेकडी दरम्यान मुख्य जलवाहीनी प्रस्तावित आहे. सदरची जलवाहीनी विळद गावामधील वनविभागाच्या जागेतून टाकणे आवश्यक आहे. त्यामुळे वनविभागाच्या जागेतून पाईप लाईन टाकणेसाठी वनविभागाची परवानगी घेण्यांत यावी यासाठी आवश्यक प्रस्ताव संबंधित विभागाकडे सादर करण्यात यावा या परवानगीसाठी आवश्यक येणा-या खर्चा साठी व परवानगीसाठी ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.श्री.मनोज लक्ष्मण दुलम

अनुमोदक :- मा.श्री.रविंद्र रावसाहेब बारस्कर

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ०३** **दिनांक : २९ / ०७ /२०२०.**

---

**प्रस्तावाचा विषय :** नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत सन २०१८-२०१९ या आर्थिक वर्षासाठी रक्कम रु.७७.०० लक्षचा प्रस्ताव मंजूरीसाठी मा.महासभेपुढे मान्यतेसाठी सादर करणे बाबत

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- मा.उपजिल्हाधिकारी (महसुल) यांचेकडील पत्र क्र.नपा/कार्या ६अ/२९७७/२०१८ दिनांक ३१/१०/२०१८ प्रत्यक्ष प्राप्त ई-मेल दि.३१/०१/२०१९

उपरोक्त संदर्भीय पत्रान्वये विनंती रिपोर्ट की, जिल्हा वार्षिक अनुसुचित जाती उपयोजना सन २०१८-२०१९ या वित्तीय वर्षासाठी अर्थसंकल्पीय तरतुद व प्राप्त तरतुदीनुसार अहमदनगर महानगरपालिकेसाठी सन २०१८-१९ या आर्थिक वर्षासाठी मंजुर नियतव्यय रक्कम रु.१,१०,००,०००/- असुन प्राप्त तरतुद रुपये ७७,००,०००/-(अक्षरी रक्कम रुपये सत्त्याहत्तर लाख मात्र) आहे असे इकडेस कळविण्यात आलेले आहे.

शासन निर्णय क्र.विघयो-१०२०००/१५९२/प्र.क्र.१८९/नवि-४ दि.५ मार्च, २००२ अन्वये

**बाब क्रमांक ४** :- नुसार या योजने अंतर्गत नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या क्षेत्रातील अनुसूचित जाती तसेच नवबौध्दांसाठी आरक्षीत असलेल्या प्रभागामध्ये तसेच अनुसूचित जातीच्या राखीव प्रभागाशिवाय इतर प्रभागातील ज्या वस्तीतील अनुसूचित जाती व नवबौध्द (विशेष घटक) यांची लोकसंख्या ५०% किंवा त्यापेक्षा अधिक आहे. अशा वस्त्यांमध्ये या शासन निर्णयात खाली नमुद करण्यात आलेली नागरी सुविधा विषयक कामे हाती घेता येतील.

**बाब क्रमांक ५** :- नुसार शहरातील अनुसूचित जाती व नवबौध्द यांचेसाठी आरक्षीत प्रभाग तसेच अनुसूचित जाती व नवबौध्द नागरिकांचे प्रमाण जेथे तुलनेत अधिक असेल तेथे प्राधान्याने (उतरत्या क्रमाने) या योजने अंतर्गतची कामे हाती घेण्यांत यावीत.

**बाब क्रमांक ६ अ)** :- नुसार योजने अंतर्गत अनुज्ञेय असलेली कामे - रस्ते, पोच रस्ते, जोड रस्ते, रस्त्यांचे डांबरीकरण, सिमेंट्रीकरण (अत्यंत अपवादात्मक परिस्थितीत वस्त्यांकरीता कच्चे रस्ते), नाले बांधकाम, नाल्यांवर फरशी बांधणे, विहिर दुरुस्ती तसेच उघड्या विहिरींवर कठडे बांधणे, नदीच्या काठावर अथवा डोंगर उतारावर संरक्षक भिंती तसेच कठडे बांधणे, छोटे पुल, पिण्याच्या पाण्यासाठी, सोई सुविधा, (हापसा, पाण्याची टाकी) सार्वजनिक उपयोगासाठी मुता-या व शौचालये बांधणे, रस्त्यावरील विजेचे दिवे, बालवाडी, बगीचे बगीच्यांमध्ये पक्क्या स्वरुपाचे बसवायचे खेळाचे साहित्य, समाज मंदीर, वाचनालय, व्यायामशाळा, दवाखाने, सांस्कृतीक, केंद्र, दुकाने, स्मशानभुमीचा विकास ही व या सारखी सार्वजनिक हिताची अन्य कामे हाती घेता येतील.

वरिल कामांव्यतिरिक्त नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेस स्थानिक गरजेनुसार एखादे काम या योजने अंतर्गत हाती घ्यावयाचे असल्यास व ते योजनेच्या अटी व शर्तींची पुर्तता करीत असल्यास असे काम शासनाच्या पुर्व संमतीने घेता येउ शकेल.

**बाब क्रमांक ६ ब)** :- नुसार या योजने अंतर्गत कामे हाती घेतांना "पायाभुत सेवा सुविधाच्या" कामांचा प्राधान्य असणे आवश्यक राहील.

**बाब क्रमांक ६ क)** :- शहराच्या मंजूर विकास योजनेतील प्रस्तावानुसार अनुज्ञेय असलेली विकास योजने अंतर्गत कामे या योजने अंतर्गत हाती घेता येतील.

सदर योजने अंतर्गत खाली नमुद प्रभाग अनुसूचित जातीतील असुन या प्रभागामध्ये कामे प्रस्तावित करता येतील. प्रभाग क्र.१अ, ७अ, ८अ, ९अ, १०अ, ११अ, १५अ, १६अ व १७अ या प्रभागातील खाली नमुद कामे आवश्यकते नुसार प्रस्तावित करण्यात आलेली आहेत.

उक्तपैकी प्रभाग क्र.९ अ, १० अ, व ११ अ मध्ये अमृत गटार योजना, पाणी पुरवठा योजना प्रस्तावित असल्याने सद्यस्थितीत या प्रभागामध्ये कामे प्रस्तावित करण्यात आलेली नाहीत.

| अ.क्र. | प्रस्तावित कामांची नांवे | अंदाजित रक्कम (लक्ष) |
|---|---|---|
| १ | प्रभाग क्र.१ शिवराजनगर अंतर्गत व माउली फ्लोअर मिल ते डम्टी टप्टी नर्सरी, माउली मंदिर ते खाडे बंगल्यापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे | १५.०० |
| २ | प्रभाग क्र.५ मध्ये भिंगारदिवे मळा येथे रस्ते डांबरीकरण करणे. | ४.१० |
| ३ | प्रभाग क्र.७ साईनगर, श्रीरामनगर अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | १८.०० |
| ४ | प्रभाग क्र.१६ मध्ये नवीन गावठाण अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | १०.०० |
| ५ | प्रभाग क्र.१५ मध्ये अचानक वस्ती, वैराळ घर ते मुख्य रस्त्यापर्यंत जलनिस्सा:रण व्यवस्थेसह रस्त्याचे कॉक्रीटीकरण करणे. | ७.०० |
| ६ | प्रभाग क्र.१७ इंदिरानगर व विद्यानगर अंतर्गत रस्ते डांबरीकरण करणे. | ३०.०० |
| ७ | प्रभाग क्र.१७ मध्ये एरंडवाडी अंतर्गत रस्ते जलनिस्सा:रण व्यवस्थेसह डांबरीकरण करणे | ३०.०० |
| ८ | प्रभाग ६ मध्ये भिंगारदिवेमळा अंतर्गत रस्ता कॉक्रिटीकरण करणे | ४.५० |

मा.महासभेने प्रस्तावित कामांमधुन रु.७७.०० लक्षची कामे प्राधान्याने घेणेचे सुचित केल्यास त्यानुसार प्रशासकीय स्तरावर जा.क्र.साप्रवि ५८१ दिनांक २८/०९/२०१६ अन्वये मा.अति.आयुक्त, यांचे अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या पाहणी समितीकडून स्थळ पाहणी व प्रस्तावांची छाननी करुन या समितीने दिलेल्या अभिप्रायानुसार सदरचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, अ.नगर यांचेकडेस सादर करण्यांत येईल.

तरी रक्कम रु.७७.०० लक्ष पर्यंतची कामे प्रस्तावित करणेसाठी सदरचा ऑफिस रिपोर्ट मा.महासभेपुढे ठेवणेस मंजुरीस्तव सविनय सादर.

यावर शहरअभियंता यांचा अभिप्राय की, नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत सन २०१८-१९ करीता अ.नगर महानगरपालिकेस संदर्भीय पत्रान्वये रक्कम रु.७७.०० लक्ष अनुदान मंजूर करणेत आले आहे. शासनाचे दिनांक ०५/०३/२००२ चे निर्णयातील बाब क्र.७ अ नुसार कामाची "निवड निश्चीती" करणारा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या सर्वसाधारण सभेच्या ठरावाची आवश्यकता आहे. प्रशासकीय स्तरावर उक्त नमूद कामे सुचविलेली आहेत.

तथापि कामाची "निवड निश्चीती" करणारा सर्वसाधारण सभेचा ठराव आवश्यक असलेने कामाची निश्चीती करीता प्रसताव मा.महासभेकडे सादर करणे मान्यतेस्तव सादर.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, मा.मुलेअ यांचे अभिप्राय घेण्याचे अधिन राहुन नागरी दलित वस्ती सुधारणा योजने अंतर्गत जिल्हा वार्षिक योजना (अनुसूचित जाती उपयोजना) अहमदनगर सन २०१८-१९ जिल्हाधिकारी आदेश क्र.६अ/२९७७ दिनांक ३१/१०/२०१८ अन्वये रक्कम रु.७७,००,०००/- अनुदान अनुज्ञेय केले असुन त्यानुसार नगरविकास विभागाचे शा.नि.दिनांक ५ मार्च २००२ मधील ना.द.व पु. योजना मार्गदर्शक तत्वे अ.क्र.१ ते ६ व ७ अ नुसार मा.महासभेची मान्यता घेणे आवश्यक असुन ७ अ नुसार सदर कामाचे विषयक कामासाठीचे रेखांकन व नकाशे सहा.संचालक. नगररचनाकार मंजूर करणे टी.- वरील अनु क्र.१ ते ८ कामाबाबत शा.नि. दिनांक ५ मार्च २००२ मधील अ.नं.६अ मधील कामा ७ अ प्रमाणे उचित निर्णयास्तव मा.सभेची मान्यता घेणे उचित राहील.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, पृष्ठ क्रमांक टी-२ वरील अ नुसार मान्यतेस्तव सादर.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, सोबतच्या अहवालामधील पा.क्र.टी-२ वरील अनु.क्र.१ ते ८ मधील कामे घेणेकरीता प्रस्ताव मा.महासभेकडे सादर करणेस हरकत नाही.

---*---

**चर्चा :-**

**मा.सौ.आशाताई कराळे** :- वैदूवाडी रेणाविकर कॉलनी नियोजीत व्यायाम शाळेबाबत काय झाले. मुलभूत सुविधा विकास योजनेतून मंजूर रक्कम रु.१०.०० कोटी मधून ८,५५,६२,८५६/-खर्चाचा प्रस्ताव शासनाकडेस सादर करण्यांत आलेला आहे. उर्वरीत शिल्लक रुपये १,४४,३७,१४४/- या शिल्लक रक्कमेतून प्रभाग क्रमांक ५ मधील वैदुवाडी, रेणाविकर कॉलनी, सहकार नगर व प्रेमदान हडको येथील नियोजित व्यायाम शाळेसाठी व्यायाम साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव मा.शासनाकडे मंजूरीसाठी सादर करण्यांत यावा.

**मा.महापौर साहेब :-** मुलभूत सोयी सुविधा निधी अंतर्गत १० कोटी रुपये मंजूर आहेत. त्यापैकी ८.५६ कोटींचा प्रस्ताव शासनास सादर केला आहे. उर्वरीत शिल्लक रक्कमेतुन वैदूवाडी व्यायाम शाळे करीता व्यायाम साहित्य खरेदीसाठी प्रस्ताव शासनाकडे पाठविण्यांत येईल.

**मा.श्री.अमोल येवले :-** विषयात एखादे काम घेता येईल का.

**मा.महापौर साहेब :-** विषय मंजूर आहे. आधीच खर्च झालेला आहे.

**मा.श्री.अमोल येवले :-** पेशंट सापडला तर त्या ठिकाणी एरिया सॅनिटायझर करायला उशीर होतो.

**मा.महापौर साहेब :-** तात्काळ कारवाई करायला सांगू. आयुक्त शहरात परत एकदा फवारणी करा.

**मा.सौ.संध्या पवार :-** पद्मानगर भाग त्यामध्ये समाविष्ट करायला पाहीजे होता.

**मा.महापौर साहेब :-** हा विषय संदर्भामध्ये मा.शासनाकडून वाढीव निधी आला. तेंव्हाच हा विषय मंजूर करण्यांत आला.

**मा.सौ.सुवर्णा जाधव :-** लोखंडी पुला शेजारील नविन पुलाचे काम केले. व रस्ता चालू झाला. काही ठिकाणी काम अर्धवट आहे. साईड पट्टया राहिल्या आहेत. शेजारील अमरधाम मध्ये जाणेसाठी रस्ता करुन घेण्यात यावा.

**मा.महापौर साहेब :-** मी रोज भेट देवून पुल ब-यापैकी पूर्ण केला आपण त्या ठिकाणी राहिलेल्या पुलाचे काम व अमरधाम कडे जाणारा रस्ता बाबत नोटीस देवून करुन घेवू.

**मा.सौ.सुवर्णा जाधव :-** पुलावर लाईट बसवा, अमरधाम पासून शिवनेरी चौका पर्यंत रस्ता करण्यात यावा. ब-याच ठिकाणी लाईटचे मटेरियल नाही. गांधीनगर भागात अंधार आहे.

**मा.महापौर साहेब :-** मेहेत्रेंना सांगीतले आहे.

**मा.सौ.सुवर्णा जाधव :-** माझ्या प्रभागामध्ये दलित वस्ती सुधार योजना अचानक वस्ती येथे भेट द्यावी त्या ठिकाणी ७ लाख ऐवजी २५ लाख निधी द्यावा.

**मा.महापौर साहेब :-** ठीक आहे.

**मा.श्री.अजय उनवणे :-** प्रभाग क्रमांक १० दलित वस्तीसाठी निधी मिळावा. प्रभाग क्रमांक १० मध्ये सिव्हील हॉस्पीटल आहे. दररोज ५००-६०० पेशंट येतात. सारीरोग आला आहे. कचरा ठेकेदार फोन उचलत नाही. कचरा उचलत नाही. लालटाकी गवळी वाडा सिल केला आहे. त्याठिकाणी गरज आहे. त्या ठिकाणी येत नाही.

**मा.महापौर साहेब :-** पॉलिटेक्नीकमध्ये १०० खाटांची व्यवस्था करतो. नटराज हॉटेल ताब्यात घेत आहोत.

**मा.श्री.अजय उनवणे :-** पालिकेकडे जे कोरोनाची टेस्ट रिपोर्ट मिळणेसाठी १५ दिवस लागतात.

**मा.महापौर साहेब :-** प्रश्न यापुर्वी अनेक सदस्यांनी उपस्थित केला मा.आयुक्त साहेब अजून एक सेंटर उभारुन लवकरात लवकर रिपोर्ट कसा लवकर येईल याची व्यवस्था करु.

**मा.आयुक्त साहेब :-** मा.महापौर साहेब आपल्या सूचनावर काय कार्यवाही करता येईल याची व्यवस्था करु. सिव्हील मध्ये बेड फूल झाले आहेत.

**मा.श्री.अजय उनवणे :-** सिव्हील फूल झाले आहे. खाजगी दवाखान्यात ताप थंडीचे पेशंट घेतले पाहीजेत. जे खाजगी डॉक्टर पेशंट घेणार नाहीत त्यांचेवर गुन्हे दाखल करण्यांत यावेत.

**मा.महापौर साहेब :-** आनंद लॉनला जागा शिल्लक आहे. तेथे पाठवा आपण त्यांच्यावर कारवाई करु. दलित वस्तीसाठी वाढीव निधी आल्यामुळे त्यावेळेसच या विषयाला मंजूरी देण्यांत आली आहे.

**मा.सौ.गौरी नन्नवरे :-** मुलभूत सोयी सुविधा १० कोटीतुन १ कोटी घेण्यात यावी.

**मा.महापौर साहेब :-** विषय घेतला.

**मा.सौ.गौरी नन्नवरे :-** प्रभाग क्रमांक १७ मोठा असल्याने येथे कोव्हीड सेंटर उभारण्याची परवानगी का मिळत नाही.

**मा.महापौर साहेब :-** मी आयुक्त साहेबांना सांगतो. त्या ठिकाणी काही मुख्य सुविधा करता येती का.

**मा.श्री.गणेश भोसले :-** कोणता विषय चालू आहे.

**मा.महापौर साहेब :-** तुम्हाला कोणत्या विषयावर बोलायचे त्यावर बोला. ३ नंबरचा विषय आधीच झाला नगरसचिव कार्यालयाकडून चुकीने घेतला गेला.

**नगरसचिव श्री.तडवी :-** संबंधित विभागाने महापौरांकडे सादर केला त्यांच्याकडून नगरसचिव विभागाकडे आला त्यानुसार विषय घेतला महापौर साहेबांनी घेतला.

**मा.श्री.गणेश भोसले :-** असा कसा विषय घेतला.

**नगरसचिव श्री.तडवी :-** शहर अभियंता यांनी आमच्याकडे विषय पाठवला.

**मा.महापौर साहेब :-** ७७ लाखा ऐवजी वाढीव निधी प्राप्त झाला तो मंजूर करण्यांत आला. विषय नगरसचिव विभागाकडे तसाच राहिल्यामुळे हा विषय घेतला.

**---*---**

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट व मा.सदस्यांची सभेतील चर्चा पाहता सदर योजने करीता मा.शासनाकडून जादा रक्कम प्राप्त झाल्यानंतर त्यास मा.महासभेच्या मान्यतेने मंजूरी देण्यांत आलेली आहे.

मा.सौ.आशाताई कराळे यांनी मांडलेल्या सूचनेनुसार मुलभूत सुविधा विकास योजनेतून मंजूर रक्कम रु.१०.०० कोटी मधून ८,५५,६२,८५६/-खर्चाचा प्रस्ताव शासनाकडेस सादर करण्यांत आलेला आहे. सदर योजनेतील प्रभाग क्रमांक ५ व ६ मधील प्रस्तावित करण्यांत आलेल्या विविध ठिकाणी असलेल्या स्ट्रीट लाईट दुरुस्ती करणेकरीता विद्युत साहित्य बसविणेचे काम दुरुस्ती स्वरुपाचे असल्याने सदर प्रस्ताव रद्द करुन सदर कामाच्या शिल्लक रक्कमेसह उर्वरीत शिल्लक रुपये १,४४,३७,१४४/- या शिल्लक रक्कमेतून प्रभाग क्रमांक ५ मधील वैदुवाडी, रेणाविकर कॉलनी, सहकार नगर व प्रेमदान हडको येथील नियोजित व्यायाम शाळेसाठी व्यायाम साहित्य खरेदीची कामे प्रस्तावित करण्यास व सदरचा प्रस्ताव मा.शासनाकडे पाठविण्यांस ही सभा मान्यता देत आहे. तसेच सदर योजनेतील सर्व कामाच्या निविदा मंजूर रक्कमेपेक्षा जादा दराने (दरसूचीतील भाववाढ व बांधकाम साहित्यातील

दरवाढ) योग्य त्या कारणमिमांसेसह मंजूर करणे आवश्यक असल्यास त्यास सक्षम प्राधिकरण मान्यता देईल. मंजूर निधीपेक्षा जादा खर्च हा महानगरपालिका फंडातुन करण्यांत यावा. मंजूर निधीपेक्षा जादा खर्च अहमदनगर महानगरपालिकेच्या शासकीय योजनांवरील अधिक्याचा खर्च या लेखाशिर्षातुन भागविण्यांत यावा यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ.आशा शिवाजीराव कराळे
अनुमोदक :- मा.श्री.मनोज लक्ष्मण दुलम

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ०४** **दिनांक : २९ / ०७ /२०२०.**

---

**प्रस्तावाचा विषय :** घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील कचरा संकलन व वहातुकीचे कामांचे देयके १४ व्या वित्त आयोगातुन प्राप्त निधीतुन अदा करणे व अदा केलेबाबत मा.महासभेची कार्योत्तर मंजुरीकामी मिळणेबाबत...

संदर्भ :- मा.आयुक्त साहेब यांची दि.१९/०२/२०१९ रोजीच्या मंजूरीनुसार.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, घनकचरा व्यवस्थापन विभागाकडेस कचरा संकलन व वाहतुक करणेकामी खाजगी तत्वावर कंत्राटी वाहन चालक, भाडोत्री डंपर, भाडोत्री डंपर, भाडोत्री ट्रॅक्टर ट्रॉलीसह इत्यादी कामे कचरा संकलन व वाहतुकीची कार्यवाही करण्यात येत आहे. त्यानुसार खालील प्रमाणे केलेल्या कामांचे देयके अदा करणे अर्थ विभागाकडे सादर करण्यात आले होते. त्यानुसार त्यांनी मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांच्या मंजुरीकामी प्रस्ताव सादर केले असता सदरील घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील सोबत जोडलेल्या आदर्श सर्व्हीसेस, नाशिक यांचे देयके १४ व्या वित्त आयोगातुन प्राप्त निधी अदा करणे बाबत सुचना दिलेनुसार घनकचरा व्यवस्थापन विभागाकडे संदर्भीय पत्रानुसार कळविले आहे. त्यानुसार खालील प्रमाणे देयके १४ व्या वित्त आयोगातुन अदा करणे उचित राहील.

| अ.क्र. | केडीएमसी क्रमांक | रक्कम | दिनांक |
|---|---|---|---|
| १ | ६७८० | ७५००० | ०५/०४/२०१८ |
| २ | ८४१७ | ३६८९०० | ०३/०४/२०१८ |
| ३ | १८८० | ८५५००० | ०६/०९/२०१८ |
| ४ | १८८१ | ३४७२०० | ०६/०९/२०१८ |
| ५ | १८८२ | ३७२००० | ०६/०९/२०१८ |
| ६ | १९४८ | २३५६०० | ११/०९/२०१८ |
| ७ | १३७३ | ७५००० | ०६/०८/२०१८ |
| ८ | १३७५ | ७५००० | ०६/०८/२०१८ |
| ९ | १३७४ | ७५००० | ०६/०८/२०१८ |
| १० | १७०८ | ८२५००० | २८/०८/२०१८ |
| ११ | १७०९ | ८२५००० | २८/०८/२०१८ |
| १२ | २१३८ | ८२५००० | २६/०९/२०१८ |
| १३ | २१६१ | ७५०००० | २८/०९/२०१८ |
| | **एकुण** | **५०,७३,७००/-** | **---** |

सबब मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त सुचनेनुसार व मा.मुख्यलेखाधिकारी, अर्थ विभाग यांच्या संदर्भीय पत्रानुसार व मनपा फंडात एवढा निधी शिल्लक नसलेबाबत १४ व्या वित्त आयोगातुन ठेकेदाराचे देयक अदा करणे बाबत आदेशीत केले आहे. त्यानुसार अत्यावश्यक सेवेतील काम असल्याने १४ व्या वित्त आयोगातुन आदर्श सर्व्हीसेस यांची वरील प्रमाणे रक्कम अदा करणेकामी अर्थ विभागा मार्फत देयक अदा करणेकामी मंजूरीस्तव आदेशार्थ सविनय सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे मंजूरीस्तव सादर.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, १) सदर प्रस्तावाचे अवलोकन केले असता माहे जानेवारी २०१६ ते फेब्रुवारी २०१६ चे देयक प्रलंबित बाबत विभागाची जबाबदारी निश्चीत करावी. २) माहे मे,जुन, जुलै, ऑगष्ट, सप्टेंबर २०१६ या घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील कचरा संकलन व वाहतुकीचे कामाचे देयक रु.५०,७,३,७००/- व रु.३९,३९,५२६/- अशी एकुण रु.९०,१३,२८६/- थकीत दिसुन येते याबाबत विभागाने खुलासा केलेला दिसुन येत नाही. व मा.मु.ले.अ. यांनी सदरचे देयके प्रलंबित का ठेवली याबाबत अभिप्राय स्पष्टपणे दिसुन येत नाही. ३) यापुर्वी मागीलवर्षी घनकचरा संकलन वाहतुकीचे क्षेत्र सणासुदीच्या (दसरा,दिवाळी) च्यावेळी संबंधित ठेकेदाराने देयके अदा न केल्याने संबंधित ठेकेदाराने सणासुदीच्या काळात नगर शहरातील घनकचरा संकलन व वाहतुक बंद करण्याचे पत्र दिले होते त्यावेळी सुध्दा विशेष बाब म्हणुन दसरा व दिवाळी सण असल्याने व शहरात पाउस असल्याने कचरा संकलन व वाहतुक बंद पाडल्यास शहरात रोगराई पसरण्याची शक्यता विचारात घेवून विशेष बाब म्हणुन १४ वे वित्त आयोगातुन थकीत बिलापोटी रक्कम अदा केली आहे. त्या रक्कमास अद्यापही मा.महासभेची मान्यता घेतली किंवा कसे यांच्या टिप्पणीत बोध होत नाही. त्याचप्रमाणे मा.मु.ले अ हेही सदरच्या प्रकरणा बाबत कोणतेच अभिप्राय नमुद करीत नाही. व शासन नियमांचे पालन होते किंवा कसे याची देखील खात्री केल्याचे दिसुन येत नाही. त्यामुळे या प्रकरणी नगरविकास विभागाचे शासन निर्णय दिनांक ०३/०८/२०१५ नुसार १४ व्या केंद्रीय वित्त आयोगाच्या शिफारशीनुसार राज्यातील ना.स्थानिक स्वराज्य संस्था करीता प्राप्त अनुदानाच्या वितरण विनियोगा बाबत कार्यपध्दती निश्चीत केली आहे. त्यानुसार अभिप्राय स्पष्टपणे नोंदविलेले दिसुन येत नाही, १४ वे वित्त आयोगाचे शासन निर्णय दि.०३/०८/२०१५ मधील (II) अ-ब प्रमाणे (III) मधील (२) नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने सर्वसाधारण सभेच्या ठरावान्वये संबंधित कामाची शिफारस केली असावी याची खात्री करुनच विभागाने प्रस्तावित केले प्रमाणे अ बाबत उचित निर्णय घेता येईल.

मुख्य स्वच्छता निरीक्षक यांचेकडुन फेर सादर रिपोर्ट की, मा. मुख्यलेखा परिक्षक यांच्या दिनांक १६/१०/२०१८ रोजीच्या आक्षेपा नुसार अनुपालन सादर करण्यांत येते की, सदरील देयक अदा प्रस्तावामध्ये पी.एच.जाधव यांनी केलेल्या कामाचे माहे जानेवारी २०१६ ते फेब्रुवारी २०१६ अखेरचे देयक त्या वर्षीच घनकचरा व्यवस्थापन विभागाकडून देयक मागणीनुसार वरिष्ठांची मंजुरी घेवुन दिनांक १३/१२/२०१७ रोजी केडीएमसी करुन अर्थ विभागात देयक अदा करणेकामी सादर केलेले आहे. त्याचप्रमाणे यापुर्वी घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील थकीत देयक १४ व्या वित्त आयोगातुन अदा करतांना मा.महासभेच्या मान्यतेने प्राप्त निधीतुनच थकीत देयके मा.आयुक्त यांच्या मंजुरीने अदा करण्यात आलेले आहे. तसेच शासन निर्णयानुसार महासभेची मंजुरी घेणे आवश्यक आहे. मात्र घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील काम अत्यावश्यक सेवेतील असल्याने सध्या मनपाची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने मा.मुख्य लेखाधिकारी यांची मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांच्या सोबत झालेल्या चर्चेनुसार घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील देयके १४ व्या वित्त आयोगातुन प्राप्त निधीतुन अदा करणे बाबत सुचना आहे. त्याकरीता अदा करण्यात येणा-या सर्व देयकांचे एकत्रित मा.महासभेची मंजुरीकामी प्रस्ताव सादर करण्यांत येणार आहे. तरी वरील प्रमाणे मुद्दा क्र.१ ते २ आक्षेपांचे अनुपालन सादर करण्यात येत आहे.

सबब प्रस्तावित नुसार मंजुरीस्तव आदेशार्थ सविनय सादर.

यावर आरोग्य अधिकारी यांचा अभिप्राय की, प्रस्तावाप्रमाणे मंजूरीस्तव सादर.

यावर मुख्यलेखाअधिकारी यांचा अभिप्राय की, १) मा.मुख्य लेखापरीक्षक यांनी अहमदनगर महानगरपालिकेचे लेखे तपासले असतीलच त्यानुसार त्यांना मनपाची परिस्थिती सक्षम आहे की नाजूक ह्याबाबत ज्ञात असावे. असे असतांना कशाच्या आधारे विभागाने जबाबदारी निश्चीत करावी ह्याचा बोध होत नाही. कृपया मा.मुलेप ह्यानी याबाबत मार्गदर्शन करावे. २) मा.मुलेप ह्यांच्या टिपणीवरील मुद्दा क्र.२ चे अभिप्राय वरील प्रमाणेच. ३) मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त ह्यांनी एकदा आदेशीत केल्यानंतर संबंधीत विभाग त्यावर योग्य ती कार्यवाही करणार आहे. असे संबंधीत विभागाने नमूद केले असतांना देखील मा.मुख्यलेखापरीक्षक ह्यांना काय अभिप्रेत आहे ते समजून येत नाही. कृपया

मा.मुलेप ह्यानी जर/तर उचित निर्णय असे सांकेतीक शब्द न वापरता सुस्पष्ट अभिप्राय दिले तर त्यांचे मार्गदर्शनाखाली मनपातील सर्व विभाग लेखा विषयक बाबीची काटेकोरपणे अंमलबजावणी करतील. वास्तविक हीच अपेक्षा सर्व विभागांची मा.मुलेप ह्यांचेकडून आहे.

संबंधित विभाग नियमानुसारच योग्य ती कार्यवाही करतील आणि योग्य त्या प्राधिकाराची मंजूरी घेतील असे गृहीत धरुन प्रस्ताव मान्यतेस हरकत नाही. तथापि मार्गदर्शनार्थ तथा आदेशार्थ सविनय सादर.

यावर मुख्य लेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त यांच्या बरोबर झालेल्या चर्चा वेळी मा.मु.ले.अ यांनी नगर विकास विभागाचे दि.०३/०८/२०१५ चे १४ वे वित्त आयोगाच्या मार्गदर्श सुचना नुसार सदर खर्च करण्यापुर्वी मा.महासभाची मान्यता घेणे आवश्यक असुन त्या नुसार कार्यवाही करणे हे वित्तीय नियमानुसार असुन त्या नुसार मा.मु.ले.प यांचे दिनांक १६/१०/२०१८ चे अभिप्राया नुसार मा.मुलेप यांचे दिनांक १६/१०/२०१८ चे अभिप्राया प्रमाणे विभागाला उचित निर्णय घेता येईल.

यावर उपायुक्त सा यांचा अभिप्राय की, मुलेप यांच्या अभिप्रायानुसार मान्यतेस्तव सादर.

यावर अतिरिक्त आयुक्त यांचा अभिप्राय की, सोबतच्या अहवालामधील पान क्र. टी-३ वरील पान क्र.टी-७ वरील मुलेप यांचे अभिप्रायानुसार मा.महासभेची मान्यता घेणेस हरकत नाही.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, मा.महासभेची कार्योत्तर मंजूरी घ्यावी लागणार आहे.

---*---

**चर्चा :-**

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** १४ वा वित्त आयोगातून जो निधी देता त्याबद्दल धन्यवाद. परंतू नगरसेवकांनी अनेक दिवसापासून रोख निधीची तरतुद करा अशी वेळोवेळी मागणी केली होती. वॉर्डातील चेंबर दुरुस्ती, चेंबर वरील झाकणे, लाईट दुरुस्तीला ५ लाख रोख निधीची तरतुद करण्यांत यावी. राष्ट्रवादी कॉग्रेस नगरसेवकांनी निवेदन दिले तातडीची कामे करावीत.

**मा.आयुक्त साहेब :-** फाईल पुटअप करायला लावली आहे. सध्याचे निधीचे अनुषंगाने मी ते करतो.

**मा.महापौर साहेब :-** आपण रोख निधीची तरतुद करु.

**मा.श्री.प्रकाश भागानगरे :-** महापौर हे तुमचे रुलिंग आहे का.

**मा.महापौर साहेब :-** हो. आपण निधीची तरतुद करु (रोख निधी)

**मा.सौ.पुष्पा बोरुडे :-** कोव्हीड साथ पसरली रोज १७००-१८०० रुग्ण बरे होतात. प्रशासन यावर काय उपाययोजना करते. दिपक, सिव्हील, विळद येथील हॉस्पीटल मधील कॉट फुल झाल्या. याबाबत काय नियोजन, २ ॲम्ब्युलन्स आहेत. रिपोर्ट लवकर येत नाहीत.

**मा.महापौर साहेब :-** रिपोर्ट बाबत आयुक्तांनी सांगीतले ॲम्ब्युलन्स महानगरपालिकेत लावल्या जातील. रिपोर्ट सुध्दा लवकरात लवकर मिळण्याबाबत कार्यवाही केली जाईल.

**मा.सौ.पुष्पा बोरुडे :-** ॲम्ब्युलन्स येण्यासाठी वेळ लागतो. रुग्णाला अशक्तपणा आलेला असतो. वेळेत रुग्णवाहीका आली पाहीजे. सेंटरवर रुग्णांना वेळेवर जेवण मिळत नाही. अशा तक्रारी येत आहेत.

**मा.महापौर साहेब :-** ॲम्ब्युलन्स चालू करा. महानगरपालिकेचे आनंद लॉन, तंत्र निकेतन येथे आपली यंत्रणा चालू करणार आहोत. गैरसोय होणार नाही याची दक्षता घेतली जात आहे.

**मा.सौ.पुष्पा बोरुडे :-** शिवाजीनगर कल्याण रोड येथे रोड नाही.

**मा.महापौर साहेब :-** पंधरा दिवसात कामे सुरु करु. पाण्याचा काही मार्ग काढता येईल का ते पाहतो.

**मा.सौ.वंदना ताठे :-** वाघमळा, ताठेनगर येथे मुरुमाची तातडीने सोय करा.

**मा.महापौर साहेब :-** ठीक आहे.

**मा.सौ.वंदना ताठे :-** पुर्वी २२ आटयांवर पाणी सोडण्यांत येत होते आता ते १५ आटयांवर सोडण्यात येते. आटे वाढवायला सांगा. मोकाट कुत्र्यांचा बंदोबस्त करण्यांत यावा.

**मा.सौ.रुपाली पारगे :-** कामे तातडीने सुरु करा. हेरटेज अपार्टमेंट मध्ये चेंबर भरले आहे लोकांच्या घरात पाणी जाते आहे.

**मा.महापौर साहेब :-** मी काल परवा भेट दिली. निंबाळकर इंजिनियर यांना सांगीतले.

**मा.सौ.रुपाली पारगे :-** अमृत योजना मधून काम मंजूर आहे. लवकरात लवकर सुरु करायला सांगा.

**मा.महापौर साहेब :-** लवकरात लवकर चालू करु.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** ४ नंबरचा विषय बाबत मी आपल्याला दिनांक ७ सप्टेंबर, २५ सप्टेंबर कचरा संकलन ई -निविदा रद्द करणे बाबत पत्र दिले. आपण संबंधित अधिका-यांना माहिती देणे बाबत आदेशीत केले पण ती अद्याप माहिती मिळालेली नाही.

**मा.महापौर साहेब :-** ती माहिती आपल्याला लवकरात लवकर देण्यांत येईल.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** कोवीड उपाय योजना हॉस्पीटल ताब्यात घेण्यासाठी आपण काय उपाय योजना करीत आहोत.

**मा.महापौर साहेब :-** काही हॉस्पीटल व काही हॉटेल्स ताब्यात घेण्यांत आलेले आहेत.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** दफन विधीसाठी टिम कमी पडते २-३ टीम वाढवावी.

**मा.महापौर साहेब :-** आपली मागणी योग्य आहे त्याबाबत विचार करु.

**मा.श्री.आसीफ सुलतान :-** बकरी ईद संदर्भात काय उपाययोजना केली आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** आपण क्रीयाकर्म पुर्ण जिल्ह्याचे करतो. मोठया प्रमाणावर क्रीयाकर्म करतो. संबंधित कामाचे ठेकेदार यांना सुध्दा सांगीतले आहे कशी मदत लागणार ते सांगा. त्यांचा बीलाचा प्रश्न होता. बील जुन्या रेटचे होते. सध्या या कामात कोव्हीड अंतर्गत मास्क, सॅनिटायझेशन इत्यादी आलेले आहे. पीपीटी कीट घालून जावे लागते. जुन्या रेटने मला काम परवडत नाही असे ठेकेदाराने सांगीतले. त्यामुळे मी रेट वाढवून देतो असे त्यांना सांगीतले. ॲम्ब्युलन्स मी वाढवतो. हॉस्पीटल संदर्भात कारवाई चालू आहे. आनंदधाम, तंत्रनिकेतन, नटराज हॉटेल वगैरे चालू केले अजुन काही कॉलेज वगैरे घेण्याचा प्रयत्न करतो.

**मा.महापौर साहेब :-** घनकच-याचे बीला बाबत अनेक तक्रारी आहेत. संबंधित अधिकारी तक्रारीत किती तथ्य आहे. याची तपासणी करतील. संबंधीत अधिका-याची जबाबदारी असते त्यांची सही आहे.

**मा.श्री.अमोल येवले :-** त्यांचे तक्रारीचे अद्याप निरसन झालेले नाही.

**मा.महापौर साहेब :-** १४ व्या वित्त आयोगातून घ्यावा असे शासनाचे निर्देश आहेत. ज्याच्या तक्रारी आहेत ते बिल थांबवण्यांत येईल. तक्रारीत तथ्थ्य असेल तर बील थांबवण्यांत येईल.

**मा.श्री.अमोल येवले :-** मी याबाबत आयुक्तांना दोनदा पत्र दिले. तरीही त्यांचे पार्ट पेमेंट देण्यांत आले.

**मा.महापौर साहेब :-** महासभा फक्त मंजूरी देते संबंधित अधिकारी यांनी कामांची पाहणी करुन काम व्यवस्थीत झाले किंवा नाही. याची तपासणी करण्याचे काम संबंधित अधिकारी यांचे असते. ठेकेदाराच्या तक्रारी आहेत माती भरुन कच-याचे वजन दाखविले आहे. महानगरपालिकेची फसवणूक झाली असेल तर त्याची शहानिशा करण्यात येईल.

**मा.श्री.अमोल येवले :-** बील थांबवण्यांत यावे.

**मा.आयुक्त साहेब :-** परत एकदा पाहणीत चौकशी करायला लावून मग करायला लावू.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** डॉ.बोरगेंना प्रश्न वाचारायचे आहेत.

**मा.महापौर साहेब :-** महासभेत उपस्थित नाहीत.

**मा.आयुक्त साहेब :-** रात्री ८.०० ते सकाळी ८.०० पर्यंत ड्युटी लावली. कलेक्टर साहेबांकडे व्ही.सी.लागली कलेक्टर साहेबांनी मला उपस्थित राहायला सांगीतले पण मी बोर्ड असल्याने मला येता येत नाही. बोरगेंना पाठवतो सांगीतले.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** घनकच-याच्या बीलासंदर्भात चौकशी समिती नेमणे बाबत मा.आयुक्त साहेब यांना दोन तीन वेळा पत्र दिले.

**मा.आयुक्त साहेब :-** चौकशी समितीचे कामकाज मुख्यलेखाधिकारी यांचेकडे सोपविण्यांत आले होते. त्यांनी चौकशीचे कामकाज करण्यास नकार दिला आहे. आयुक्त हे त्यांचे नियंत्रण अधिकारी नाहीत. असे त्यांनी लेखी कळविले आहे. याबाबत आस्थापना विभागामार्फत त्यांना नोटीस देण्यांत आलेली आहे. त्यामुळे चौकशीचे काम प्रलंबित आहे.

**मा.महापौर साहेब :-** चौकशी अहवाल सभागृहासमोर ठेवण्यांत येईल. सभागृह त्यावर निर्णय घेईल.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** घनकच-याचे बोगस बील लावले ते समोर आणायचे आहे. यागोष्टी गांभीर्याने घेणे गरजेचे आहे.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** बायो मायनिंग मध्ये थ्री स्टार चे मानांकन यामध्ये किती टक्के काम झाले याची माहिती द्यावी.

**मा.महापोर साहेब :-** डॉ.बोरगे आल्यानंतर उत्तर देतील.

**मा.आयुक्त साहेब :-** मला ज्या त्यातील त्रुट्या निदर्शनास आल्या त्या पॉईट आउट केल्या. ती बाब त्यांच्याकडून सुटलेली आहे. ही यंत्रणा महानगरपालिकेकडे असतांना मार्कींग केले नाही ते निदर्शस आलेले नाही ते निदर्शनास आणुन दिले.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** बायो मायनिंग वर किती टक्के काम झाले याचे मला लेखी उत्तर देण्यांत यावे.

**मा.आयुक्त साहेब :-** कोव्हीड-१९ चा प्रादुर्भावाच्या अनुषंगाने कामे चालू आहेत इतर कामात चौकशी झालेली नाही. परत सभागृहाकडे पाठवणार आहे. मी नोटीस दिली. बीलाच्या अनुषंगाने आपण मिनीमम बील दिले. बीलाच्या ३०% बील आपण दिले आहे.

**मा.श्री.आसिफ सुल्तान** - घनकच-याची माहिती कधी मिळेल.

**मा.महापौर साहेब** - डॉ.बोरगांना सांगतो. मा.सदस्यांना लवकरात लवकर माहिती देणेबाबत सांगतो. डॉक्टरांनी लवकरात लवकर माहिती दयावी.

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे -** उदयाच माहिती देतो.

**मा.श्री.शाम नळकां**डे - आपल्याला जे थ्री स्टार मानांकन मिळाले आहे . फेरतपासणीत काय सुधारणा केल्या त्यामुळे आपल्याला ३ स्टार मानांकन मिळाले.

**वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ.बोरगे** - ३ स्टार मिळाले आहे. काही पॉईंटचे मार्क दयावयाचे राहिले होते.

**मा.श्री.शाम नळकांडे** - एप्रिलमध्ये १ स्टार नामांकन मिळाले त्यानंतर ३ स्टार मिळाले.

**मा.आयुक्त साहेब** - तुम्ही फिल्डवर्क केले जी साधने उपलब्ध करून दिले त्याची माहिती त्यांचेकडे त्यावेळी नव्हती याची पाहणी करणे बाबत निदर्शनास आणणे बाबत मी सांगितले. जिल्हाधिकारी साहेब यांनी याबाबत पत्र दिले. तेथील यंत्रणेने पुन्हा समक्ष पाहणी करून येथील यंत्रणा कार्यान्वीत झाल्याची पाहणी करून व फोटोपोर्टलवर टाकणे बाबत सुचना केल्या.

**मा.श्री.शाम नळकांडे** - एप्रिल मध्ये ३० ते ४० टक्के काम झाल्याची माहिती मिळाली आपल्यास त्यानंतर किती टक्के काम झाले त्यामुळे ३ स्टार नामांकन मिळाले.

**मा.आयुक्त साहेब** - सिस्टीम पॉईट करून दाखवले. व त्यामुळे तुमचे मानांकनात गुण वाढू शकतात.

**मा.श्री.शाम नळकांडे** - इंजिनिअर यांची नियुक्ती कोवीडसाठी केले. इंजिनिअरना काम दिले त्यांच्या कामाचा लोड कमी करून कामे देण्यात यावी.

**मा.महापौर साहेब** - पाउलबुधेनेही विषय मांडला. तुम्ही जे मांडले ते एकदम महत्वाचे आहे.

**मा.श्री.शाम नळकांडे** - आयुक्त साहेब आदेश काढावा.

**मा.महापौर साहेब** - चालेल

**मा.श्री.पाउलबुधे** - खाजगी लॅबमध्ये स्वॅब तपासणी करिता सेवानिवृत्त अधिकारी मानधनावर घेतला. आपल्याकडे १४ , १५ मेडीकल ऑफिसर आहेत.

**मा.आयुक्त साहेब** - महानगरपालिकेचे ७ आरोग्य केंद्र आहेत. त्याठिकाणी वैद्यकीय अधिकारी नेमण्यांत आलेले आहेत. कोव्हीड सेंटर चालू केल्यामुळे २ डॉक्टर त्याठिकाणी नेमण्यात आले आहेत. NUHM अंतर्गत मानधनावर अर्थवेळ व पूर्णवेळ अशा सगळयांची मिळून टिम करून ट्रेसिंग वगैरे करतो. स्वॅब जर त्यांचेकडे दिला तर सॅम्पलिंग करिता १५०० रूपये देतो.

मा.श्री.पाउलबुधे - यावर मोठया प्रमाणात खर्च होतो.

**मा.आयुक्त साहेब** - आपणही याबाबत पुढाकार घ्यावा. रोटरी क्लबचे पदाधिकारी मला भेटले. मी त्यांचे समोर प्रस्ताव ठेवला होता. आपण नगरचे दानशूर व्यक्ती श्री.फिरोदिया परिवाराकडे संपर्क केला तुम्ही सांगा मी या भागात नविन आहे.

**मा.श्री.पाउलबुधे** - महापौर साहेब आपल्या सोबत आहेत

**मा.महापौर साहेब** - आवश्य.

**मा.श्री.असिफ सुल्तान** - बकरी ईद बाबत मनपाची काय तयारी आहे. ३० तारखेला मा.आयुक्तांना निवेदन दिले. वॉर्डातील समस्या बाबत पाहणी करणार होते.

**मा.महापौर साहेब** - तुम्ही सांगा सोमवारी किंवा मंगळवारी जावू

**मा.श्री.मनोज कोतकर** - जुन्या १०-१५ वर्षापूर्वी रो हौसिंग झाल्या त्याच्या मधली जागा ही खाजगी जागा आहे असे इंजिनिअर सांगतात तिथल्या ड्रेनेज लाईन खराब झाल्या आहेत. मधली जागा खाजगी जरी असली तरी त्या ठिकाणी पाईप टाकायला मंजूरी मिळावी.

**मा.महापौर** - चालेल

**मा.श्री.मनोज कोतकर** - माझ्या भागामध्ये शेतमळे, लोकवस्त्या आहेत त्या ठिकाणी जाण्यासाठी रस्ता नाही. त्या ठिकाणी डांबरीकरणाला परवानगी मिळावी

**मा.महापौर साहेब** - बर चालेल मनपाची मालकी पाहिजे किंवा डीपी रस्ता पाहिजे. पर्याय काढू रस्ते कसे होतील, ते रस्ते कसे घेता येतील ते पाहू.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** सत्य जे आहे घोटाळे जनतेसमोर आणायचे आहेत.

**मा.आयुक्त साहेब :-** सभागृहापुढे आणणार.

**डॉ.श्री.बोरगे :-** थ्री स्टार कसे मिळाले नळकांडेनी प्रश्न केला .

**मा.श्री.शाम नळकांडे :-** स्वच्छ सर्व्हेक्षणची फेरतपासणीत किती टक्के काम बायोमायनिंग मध्ये झाले.

**डॉ.श्री.बोरगे :-** बोयोरेमेडीयन म्हणून बायोमायनिंग ऐवजी थ्री स्टार मानांकनासाठी पार्टी प्रिपरेशन मध्ये विविध तपासण्या झाल्या.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** मला स्पष्टीकरण नको. किती टक्के काम झाले एवढेच सांगा.

**डॉ.श्री.बोरगे :-** स्वच्छ सर्व्हेक्षण २०२० मध्ये दोन कंम्पोस्ट होते. थ्री स्टार साठी ईएसपी त्या साठी असणारी प्रकल्प याची तपासणी यंत्रणेने करणे आवश्यक होते. जानेवारी २०२० मध्ये करणे आवश्यक होते. त्यांनी ज्या ज्या तपासण्या केल्या त्या जानेवारी २०२० मध्ये त्यासाठी जास्त गुण मिळाले. त्यापैकी रितसर काम झाल्यामुळे त्यावेळी

सर्व कंमोनंट मध्ये चांगले मार्क होते. बायोरेमेडेशन एमईएस मध्ये ठरवून दिले ज्या वेळेस इन्स्पेक्शन झाले. उपलब्ध असणारा कचरा व त्यावर झालेली प्रक्रीया याची तपासणी झाली.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** त्यांनी जो कचरा पाहिला तो किती क्युबीड मध्ये होता.

**डॉ.श्री.बोरगे :-** O मार्क होते या मुल्यांचे मार्कच मिळाले नव्हते त्यासाठी आपण ऑब्जेक्शन घेतले व ते मंजूर झाले.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** अगोद O मार्क होते नंतर किती टक्के काम झाले याचे उत्तर मला मिळावे.

**डॉ.श्री.बोरगे :-** किती काम झाले याचा विषय नव्हता आपण ऑब्जेक्शन घेतले.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** ते चुकले म्हणजे काय चुकले.

**मा.महापौर साहेब :-** पेपरमध्ये कमी मार्क पडल्यावर आपण फेरतपासणी करतो त्यानुसार केले.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** त्या टिमने किती टक्के मार्क दिले याची माहिती द्या.

**डॉ.श्री.बोरगे :-** आपण त्यांना म्हटले काय काय तपासणी करावी हे त्यांनी सांगीतले. ३० मार्क पाहिजे होते २८.५ दिले. त्याचा आपल्याला फायदा झाला.

**मा.महापौर साहेब :-** ३० टक्के पाहीजे ते २८% मिळाले. फेरतपासणीत ३० च्या वर गेलो यात काय अडचण आहे. यातुन आपल्याला काय साध्य करावयाचे आधी २८.५% होते फेरतपासणी नंतर ३०% पडले असतील म्हणून थ्री स्टार मिळाले.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** त्यांच्या तोंडी नोंदवून घ्या व विषय संपवा.

**मा.महापौर साहेब :-** ठिक आहे.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** पूणे महानगरपालिकेने कुठल्या सेंटरमध्ये किती व्हॅकॅन्सी आहे या धर्तीवर बेडची किती व्हॅकॅन्सी आहे याबाबत नागरिकांना नंबर प्रसिध्द करावे. संपूर्ण माहिती पालिकेत मिळत नाही. खाजगी कोव्हीड सेंटरवर पालिकेचे काही नियंत्रण आहे की नाही त्यांची बीले अवास्तव आहेत. फवारणी नियोजन करावे. माईल्ड पेशंट वेगळया ठिकाणी ठेवावे. वैयक्तीक लक्ष देवून नियोजन करावे कोव्हीड सेंटरमध्ये किती व्हॅकॅन्सी आहे हेल्पलाईन नंबर प्रसिध्द करावेत.

**मा.आयुक्त साहेब :-** कोणत्या रुग्णालयात किती बेड उपलब्ध आहेत हे पोर्टल डेव्हलप केले आहे याबाबतची माहिती वेब पोर्टलवर टाकण्यांत येईल. अहमदनगर महानगरपालिकेच्या नोडल अधिकारी बलभिम पठारे आहेत. प्रत्येक हॉस्पीटल मध्ये सकाळी ८ व रात्री ८ वाजता हॉस्पीटल मधील बेडची उपलब्धता याबाबतची माहिती अपडेट करणेस सांगीतले आहे. शासनाच्या गाईड लाईनच्या अनुषंगाने ऑडीटर नेमणे बाबत उद्या पर्यंत आदेश निर्गमीत करण्यांत येतील. बिलींगची कार्यवाही बाबत आमचा अधिकारी वाढीव बिलींग होणार नाही याची दक्षता घेईल.

**मा.श्री.विनीत पाउलबुधे :-** घनकचरा व्यवस्थापन संदर्भात गाडया उपलब्ध झाल्या पाहिजेत. मा.आमदार संग्राम भैय्या यांनी या वाहना बाबत आक्षेप घेतले ती बी.एस.-४ घेतली आहे.

**मा.महापौर साहेब :-** होय, रद्द करण्याच्या आधी घेण्यांत आल्या.

**मा.श्री.विनीत पाउलबुधे :-** गाड्या ताब्यात येण्यापूर्वी रद्द झाले. बी.एस.४ चे नामांकन कधी रद्द झाले.

**मा.महापौर साहेब :-** संबंधित अधिकारी तुम्हाला माहिती देतील लेखी स्वरुपात माहिती मिळेल.

**मा.आयुक्त साहेब :-** जी जुजबी माहिती माझ्या समोर आहे त्या अनुषंगाने माहिती देतो. विषय पटलावर विषय नसल्याने त्याची इत्यंभूत माहिती येथे उपलब्ध नाही. बी.एस.४ गाडयाचे प्रॉडक्शन होणार नाही. रजि. कालावधी ३१ मार्च २०२० ठरवून दिली त्याच्या अनूषंगाने माझाही मुद्दा होता. सगळी प्रोसेस पूर्ण झालेली होती. डीलिव्हरी माझ्या कालावधीत घेतली. कोर्टाच्या आदेशाच्या मुदतीमुळे डिलीव्हरी आली आहे.

**मा.श्री.विनीत पाउलबुधे :-** एक कमिटी नेमलेली आहे त्या कमिटी समोर टेस्टींग झाली का.

**मा.आयुक्त साहेब :-** नाही.

**मा.श्री.विनीत पाउलबुधे :-** पुढच्या महासभेत हा विषय घ्या. तुम्ही जर आता विषयाबाबत काही माहिती देता येत नसेल तर पुढच्या सभेत विषय घ्या.

**मा.महापौर साहेब :-** चालेल पुढच्या वेळेस घेवू.

**मा.श्री.गणेश भोसले :-** आउटडेट झालेल्या गाड्या आपण घेतो. यामागे काहीतरी काळेबेरे वाटते. इंजिनिअरचा रिमार्क काय येतो. मॅकेनिकल इंजिनियर यांनी कशी घ्यायला मान्यता दिली. यागाड्या फेगून द्यायच्या त्या तुम्ही रोडवर चालवायला घेतात चुकीचे काम कसे करतात.

**मा.महापौर साहेब :-** लिलाव बंद होण्याच्या आधी घेण्यात आल्या आहेत.

**मा.श्री.गणेश भोसले :-** चुकीचे काम केले. पाउलबुधे साहेबांना माहिती देण्यात यावी. रोख ५ लाख निधीचे काय झाले.

**मा.आयुक्त साहेब :-** फाईलच्या संदर्भात विचारले, फाईल माझ्याकडे आली आहे. आज किंवा उद्या होवून जाईल.

**मा.श्री.गणेश भोसले :-** कोवीडच्या नावाखाली दुसरे काम होत नाही. चेबरवर झाकण टाकले जात नाही. लाईट लागत नाही. कोवीड करोना बरोबर जगावे लागणार आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** छोटी छोटी कामे करण्यासाठी निधी मंजूर करीत आहोत. अपेक्षा अशीच आहे छोटी छोटी कामे करण्यासाठी हा निधी मंजूर करीत आहोत.

**मा.श्री.गणेश भोसले :-** दोन दिवसात जर प्रश्न मार्गी लागला नाही तर तुमच्या दालनात आम्ही बसून आंदोलन करु.

मा.महापौर साहेब :- विषय मंजूर करण्यांत येत आहे.

**---*---**

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट घनकचरा व्यवस्थापन विभागाकडील कचरा संकलन व वहातुकीचे कामांचे देयके १४ व्या वित्त आयोगातुन प्राप्त निधीतुन अदा करणे व अदा केलेबाबतच्या प्रस्तावास ही सभा मान्यता देत आहे.

शहराचा मिळविलेला ODF दर्जा टिकविणे व त्यापुढील ODF + दर्जा प्राप्त करुन घेण्यासाठी पुढील वाटचाल व कार्यवाही करणे तसेच कचरा मुक्त शहरांच्या तारांकित मानांकनामध्ये अहमदनगर महानगरपालिकेस ३ स्टार मानांकन प्राप्त करुन घेणे आवश्यक असल्याने, प्रशासनाने प्रस्तावित केल्यानुसार स्वच्छ सर्वेक्षण २०२० अंतर्गत अहमदनगर महानगरपालिकेस ५ स्टार मानांकन व ODF + दर्जा प्राप्त करुन घेण्यासाठी महानगरपालिकेचे सामुदायिक शौचालय दुरुस्ती करणे आवश्यक होते. १४ व्या वित्त आयोगाच्या अनुदानातुन सामुदायिक शौचालय दुरुस्ती करीता रक्कम रुपये १२ लाखाची तरतुद करण्यांत आली होती. त्या देयकातील उर्वरीत रक्कम रु.२,९९,६४९/- अदा करण्यांस तसेच महानगरपालिकेचे सार्वजनिक शौचालय दुरुस्तीचे वाढीव काम झाल्याने रक्कम रु.५,६२,९१८/- १४ व्या वित्त आयोग निधीतुन अदा करण्यांस ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ.आशा शिवाजीराव कराळे

अनुमोदक :- मा.श्री.मनोज लक्ष्मण दुलम

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ०५** **दिनांक : २९ / ०७ /२०२०.**

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

**प्रस्तावाचा विषय : मनपा कर्मचा-यांचे वैद्यकीय खर्चाचे प्रतिपुर्ती देयक अदाई बाबत...**

श्री.रविंद्र तात्यासाहेब कोतकर पदनाम- बिगारी वॉचमन वैद्यकीय प्रतिपुर्ती देयक रक्कम रु. ३,५८,७२२/-

**---*---**

**प्रस्तावाचा मजकुर :-**

नांव :- श्री.रविंद्र तात्यासाहेब कोतकर पदनाम :- बिगारी / वॉचमन

रुग्णाचे नांव व नाते :- श्री.तात्यासाहेब बाबुराव कोतकर (वडिल)

हॉस्पीटलचे नांव :- सह्याद्री हॉस्पीटल, पुणे

अंतररुग्ण कालावधी :- दिनांक २१/१२/२०१७ ते ०७/०१/२०१८

अ)

| **औषधाचा खर्च** | |
|---|---|
| एकुण खर्च | एकूण खर्चाच्या ९०% |
| रु.१,३२,१७९/- | रु.१,१८,९६१/- |

ब)

| **वास्तव्याचा खर्च** | **वास्तव्याच्या खर्चाच्या ९०%** |
|---|---|
| एकुण खर्च रु.२,२६,५१३/- जनरल वॉर्ड (सर्व साधारण) | २,०३,८६१/- |
| २००० x १६ = ३२००० x ९५% अतिदक्षता कक्ष | ३०,४००/- |
| ५५०० x १ = ५५०० १०० % | ५,५००/- |
| **एकुण** | **२,३९,७६१/-** |

एकुण खर्च अ + ब

रु.३,५८,७२२/- = १,१८,९६१/- + ३,३९,७६१/-

अक्षरी रुपये तीन लाख अठ्ठावीस हजार सातशे बावीस मात्र इतकी रक्कम मान्यतेस्तव सादर.

लेखाशिर्ष :- वैद्यकीय प्रतिपुर्ती खर्च (२०१९-२०२०)

तरतुद रक्कम :- ५०,००,०००/-

आतापर्यंत झालेला खर्च :- ५५,००५/-

उपलब्ध शिल्लक :- ४९,४४,९९५/-

अपेक्षित खर्च :- ३,५८,७२२/-

लेखाशिर्ष :- वैद्यकीय प्रतिपुर्ती खर्च (२०१८-२०१९)

तरतुद रक्कम :- १,००,००,०००/-

आतापर्यंत झालेला खर्च :- १३,५०,३५२/-

उपलब्ध शिल्लक :- ८६,४९,६४८/-

अपेक्षित खर्च :- ३,५८,७२२/-

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, मु.ले.प यांचा अभिप्राय घेण्यात यावा.

यावर मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, इमर्जन्सी सर्टी. पूर्ण भरले नाही., -- शिधा पत्रिकेत रुग्णाचे नाव नाही. -- कुटुंब प्रमाणपत्रात रुग्णाचे नांव नाही. -- बॉम्बे नर्सिंग होम्स रजिस्ट्रेशन ॲक्ट नुसार हॉस्पीटल नोंदणी नूतनीकरण प्रमाणपत्र जोडले नाही. -- नस्तीवर पृष्ठक्रमांक नाहीत.

यावर आस्थापना विभाग दिनांक २०/०३/२०१९ रोजी फेरसादर रिपोर्ट की,
दिनांक १४/०९/२०१८ रोजीचे शेरांकणानुसार त्रुंटींची पुर्तता केली आहे.

यावर जा.क्र.आस्थापना ४३४ दिनांक २०/०३/२०१९ अन्वये मुख्यलेखापरिक्षक यांचेकडे

यावर मुख्यलेखापरिक्षक B दिनांक २२/०३/२०१९ अन्वयेअभिप्राय की, दिनांक २५/०३/२०१९ पृष्ठ क्रमांक ११,१३,१५,१९,३१ वरील वैद्यकीय अधिकारी व पृ.क्र.३५,६५,६७,६९ वरील सह्यांमध्ये तफावत आहे. विभागाने खात्री करावी.

यावर आस्थापना विभाग जा.क्र.२१ दिनांक २५/०४/२०१९ अन्वये फेरसादर रिपोर्ट की, आपले दिनांक २५/०३/२०१९ रोजीचे शेरांकणानुसार सह्याद्री हॉस्पीटल वैद्यकीय अधिकारी यांचे स्वाक्षरी मध्ये तफावती बाबत खाजगी रुग्णालयामध्ये वेगवेगळया विभागासाठी वैद्यकीय अधिका-यांच्या नियुक्ती केली असल्याने स्वाक्षरीमध्ये तफावत आहे. तरी सदरचे देयक अदा करणेस हरकत नाही.

यावर मुख्यलेखापरिक्षक B दिनांक २५/०४/२०१९ अन्वयेअभिप्राय की, सदर वैद्यकीय प्रतिपूर्ती देयकातील आजाराबाबत व एकूण रक्कम रु.३,५८,७२२/- मंजूरीबाबत मा.वैद्यकीय अधीक्षक, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय घेणे उचित वाटते. तसेच आस्थापना प्रमुख यांचे प्रस्तावाप्रमाणे व शासन निर्णय दिनांक १६ मार्च २०१६ प्रमाणे व महासभा ठराव क्रमांक ९ दिनांक २६/०५/२०१२ चे ठरावानुसार वैद्यकीय प्रतिपूर्ती देयक महासभेपुढे ठेवणे आवश्यक ठरेल.

---*---

**चर्चा :-**

**मा.महापौर साहेब :-** ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजुर. अहमदनगर महानगरपालिका कर्मचारी श्री.रविंद्र तात्यासाहेब कोतकर, बिगारी/वॉचमन यांच्या वैद्यकीय खर्चाच्या प्रतीपुर्ती देयकाबाबत प्राप्त झालेल्या कार्यालयीन प्रस्तावास व सदरच्या खर्चास ही सभा मान्यता देत आहे. सदरच्या प्रकरणात अंतिम कार्यवाही करतांना मा.आयुक्त यांची प्रतिस्वाक्षरी घेण्यात यावी.

नियमानुसार पुढील कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक :- मा.सौ.मालन सुरेश ढोणे,

अनुमोदक :- मा.श्री.मनोज शंकर कोतकर,

ठराव सर्वानुमते मंजूर

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ०६** **दिनांक : २९ / ०७ /२०२०.**

---

**प्रस्तावाचा विषय :** एकात्मिक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम अंतर्गत नालेगांव स.नं. २२०,२२१ (फेज-१ वारुळाचा मारुती) व नालेगांव स.नं.४१/२ (फेज-२ काटवण खंडोबा) येथील बांधण्यात आलेल्या कम्युनिटी सेंटर सेवाभावी संस्थेस ( एनजीओ ) भाडेतत्वावर चालविणेस देणे बाबत

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

उपरोक्त संदर्भीय विषयाबाबत सादर करण्यांत येते की, एकात्मीक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम अंतर्गत नालेगांव स.नं.२२०,२२१(फेज-१ वारुळाचा मारुती) व नालेगांव स.नं.४१/२ (फेज-२ काटवण खंडोबा) येथील बांधण्यात आलेल्या कम्युनिटी सेंटर बाबत प्रस्ताव प्रकल्प विभागामार्फत मार्केट विभागाकडे पुढील कार्यवाहीसाठी संदर्भीय पत्रान्वये पाठविण्यात आला आहे. एकात्मीक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम अंतर्गत नालेगांव स.नं.२२०,२२१ (फेज-१ वारुळाचा मारुती) व नालेगांव स.नं.४१/२ (फेज-२ काटवण खंडोबा) असे दोन्ही ठिकाणी कम्युनिटी सेंटर बांधण्यात आले आहे. सदर कम्युनिटी सेंटरचा तळ मजला व पहिला मजला असून एकुण बांधकाम क्षेत्रफळ ४५५ चौ.मी. इतके आहे. या कम्युनिटी सेंटर मध्ये खालील बाबींचा समावेश आहे.

**अ) तळ मजला :-**

१) पाळणाघर व प्रसाधगृह
२) वाचनालय व स्टोअर रुम
३) दवाखाना व कन्सल्टींग रुम (स्त्री व पुरुषांसाठी प्रसाधनगृह)
४) महिलांसाठी कन्सल्टींग रुम
५) दुकानासाठी गाळे -संख्या -२

**ब) पहिला मजला :-**

१) बहुउद्देशीय हॉल पुरुष व स्त्रियांकरीता स्वतंत्र खोल्या व प्रसाधनगृह.
२) सोसायटी ऑफिस.

त्यानुसार वरील एकात्मीक गृहनिर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रम अंतर्गत नालेगांव स.नं.२२०,२२१ (फेज-१ वारुळाचा मारुती ) व नालेगांव स.नं.४१/२ ( फेज-२ काटवण खंडोबा ) अशा दोन्ही ठिकाणी सहाय्यक संचालक, नगररचना मनपा यांनी कम्युनिटी सेंटरचे मासिक भाडे मुल्य व अनामत रक्कम खालील प्रमाणे निश्चित करुन दिले आहे.

| अ.क्र. | ठिकाण | अनामत रक्कम | मासिक भाडे |
|---|---|---|---|
| १ | नालेगांव स.नं.२२०,२२१ (फेज-१ वारुळाचा मारुती) | २,५१,०००/- | ४१,८००/- |
| २ | नालेगांव स.नं.४१/२ (फेज-२ काटवण खंडोबा ) | २,५०,८००/- | ४८,०००/- |

सदर बाबत सहाय्यक संचालक नगररचना यांनी ठरवून दिलेले मासिक भाडे व अनामत रक्कम ही किमान आधारभुत रक्कम गृहीत धरुन त्यावर खाजगी सेवाभावी संस्थेची (एनजीओ) नियुक्ती करणे करीता निविदा मागविणे आवश्यक आहे. सदर निविदेच्या अटी व शर्ती मध्ये खालील बाबींचा समावेश करणे आवश्यक आहे.

अटी व शर्ती :-

१) निविदाधारक संस्था (एनजीओ) म्हणुन नोंदणीकृत असेणे आवश्यक आहे.
२) निविदाकार संस्थेची वार्षिक उलाढाल ५ लक्ष असणे आवश्यक आहे.

३) निविदेमध्ये यशस्वी होणा-या संस्थेने कम्युनिटी सेंटरच्या ठिकाणी स्वखर्चाने विज मिटर व पाण्याची व्यवस्था करणे आवश्यक आहे.

४) यशस्वी निविदाकार संस्थेने संपुर्ण इमारतीची देखभाल व दुरुस्ती स्वखर्चाने करणे आवश्यक आहे.

५) करारनाम्याचा कालावधी पुर्ण झाल्यानंतर संबंधित संस्थेने संपुर्ण इमारत सुस्थितीत मनपाकडेस हस्तांतरीत करणे आवश्यक आहे.

६) इमारतीमधील वापरासाठी जे घटक नमूद केले आहेत. त्याप्रमाणेच त्याचा वापर करण्यांत यावा. अन्यथा आपल्या समवेत करण्यात आलेला करारनामा रद्द करुन संस्थेने मनपाकडेस जमा केलेली अनामत रक्कम जप्त करण्यात येईल.

तरी वरील प्रमाणे अटी व शर्तीचा समावेश करुन नालेगांव स.नं.२२०,२२१ (वारुळाचा मारुती) नालेगांव स.नं.४१/२ (फेज-२ काटवण खंडोबा ) या दोन ठिकाणी मा.सहाय्यक संचालक नगररचना यांनी निश्चित केलेले मासिक भाडे व अनामत रक्कम आधारभुत किंमत धरुन खाजगी सेवाभावी संस्थेची (एनजीओ) नियुक्ती करणे करीता ई-निविदा मागविणेच्या प्रस्तावास मंजूरी मिळणेस्तव ऑफिस रिपोर्ट सविनय सादर.

यावर उपायुक्त कर यांचा अभिप्राय की, भाडे तत्वावर चालविणेस देणेकामी सक्षम प्राधिकरण (महासभा/स्थायी समिती) यांची पूर्व मान्यता घेणे आवश्यक आहे का ? मु.ले.प.यांचे अभिप्राय घेवून सादर करावे.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, प्रास्ताविक अ प्रमाणे अटी व शर्ती यांना अधिन राहून मंजूरी देणे योग्य होईल.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ मधील कलम ७९ मधील (ड)(ई) नुसार विभागाने उचित निर्णय घ्यावा.

यावर मा.उपायुक्त कर यांचा अभिप्राय की, मु.ले.प. यांचे अभिप्रायानुसार व अधिनियमामधील कलम ७९ (क) नुसार प्रस्तावित केलेनुसार महासभेची मान्यता घेणेकामी सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

**---*---**

**चर्चा :-**

**मा.श्री.अविनाश घुले :-** तेथील रहिवासी संघ अथवा रहिवासी सोसायटी यांनी आपल्याला भाडे तत्वावर मागणी केली आहे. याचा विचार करावा.

**मा.महापौर साहेब :-** ना नफा ना तोटा या तत्वावर देण्यांत येईल. तिथल्याच लोकांना देवू.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** पथदिव्या संदर्भातील एलईडी लावले ते बंद आहेत. ते दुरुस्ती करुन घेण्यांत यावेत. कम्युनिटी सेंटरचा तिथल्या स्थानिक नागरिकांना त्या बद्दल लाभ मिळाला पाहीजे.

**मा.महापौर साहेब :-** पूर्ण शहराचे लाईट बंद आहेत. एलईडी दुरुस्त होत नाही. लवकरात लवकर लाईट चालू होतील. पूर्ण लाईट बदलणे, देखभाल दुरुस्ती त्यांचेकडेच राहणार आहे. एकात्मीक झोपडपट्टी नालेगांव व काटवन खंडोबा या ठिकाणी त्याचा लाभ झाला. स्थानिक लोकांनाच काम द्यायला पाहीजे.

**मा.श्री.स्वप्नील शिंदे :-** विषय मंजूर करण्यांत यावा. कल्याण रोड येथे ड्रीम सिटी वसाहत असुन त्या वसाहतीतील नागरिक महानगरपालिकेचे सर्व कर भरत आहेत. परंतु त्यांना पिण्याचे पाण्याची व्यवस्था करणेत आलेली नाही. याबाबत त्यांनी महानगरपालिकेकडे अर्ज करुन पिण्याचे पाण्याचे कनेक्शन मिळणे बाबत मागणी केलेली आहे. पिण्याचे पाणी ही जीवनावश्यक बाब असल्याने शहर पाणीपुरवठा योजना फेज-२ चे काम या परिसरात झालेले आहे. पिण्याच्या पाण्याच्या टाकीतुन पुर्णक्षमतेने या परिसरात पाणी पुरवठा सुरु होईपर्यंत त्यांना पिण्याच्या पाण्याचे एक इंची कनेक्शन तात्पुरत्या स्वरुपात देण्याची कार्यवाही करावी.

**मा.महापौर साहेब :-** अहमदनगर महानगरपालिके मार्फत एकात्मीक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमा अंतर्गत नालेगांव स.नं.२२०, २२१ (फेज-१ वारुळाचा मारुती) व नालेगांव स.नं.४१/२(फेज-१ काटवन खंडोबा) येथील बांधण्यात आलेल्या कम्युनिटी सेंटर हे स्थानिक रहिवाशांचे नोंदणीकृत रहिवासी संघ अथवा रहिवासी सोसायटीला ना नफा ना तोटा या तत्वानुसार भाडे तत्वावर चालविण्यांस देण्यांत यावे. तसेच सद्यस्थितीत दोन्ही कम्युनिटी सेंटरच्या ठिकाणी अतिक्रमण झाले असलेचे आढळून आल्यास त्याबाबत अतिक्रमण निर्मुलन विभागा मार्फत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी व इमारतीमध्ये दुरुस्तीची आवश्यकता असल्यास बांधकाम विभागामार्फत ती दुरुस्ती करुन घेण्यात यावी. व कल्याण रोड येथील ड्रीम सीटी वसाहतीला पिण्याच्या पाण्याचे एक इंची कनेक्शन तात्पुरत्या स्वरुपात देण्याबाबत कार्यवाही करावी. अमृत योजने अंतर्गत पाणीपुरवठयाचे काम व शहर पाणीपुरवठा योजना फेज-२ चे काम होईपर्यंत त्यांना पाणी कनेक्शन तात्पुरत्या स्वरुपात देण्यांत यावे.

**---*---**

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट पाहता अहमदनगर महानगरपालिके मार्फत एकात्मीक गृह निर्माण व झोपडपट्टी विकास कार्यक्रमा अंतर्गत नालेगांव स.नं.२२०, २२१ (फेज-१ वारुळाचा मारुती) व नालेगांव स.नं.४१/२(फेज-१ काटवन खंडोबा) येथील बांधण्यात आलेल्या कम्युनिटी सेंटर बाबत मार्केट विभागाने नगररचना विभाग व वैद्यकीय आरोग्याधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली निविदा अटी व शर्ती ठरवून घ्याव्यात. व पुढील कार्यवाही करावी. तसेच सद्यस्थितीत दोन्ही कम्युनिटी सेंटर्स ही स्थानिक रहिवाशांच्या नोंदणीकृत रहिवासी संघ अथवा रहिवासी सोसायटीला ना नफा ना तोटा या तत्वावर चालविण्यांस देण्यांत यावी. सदर ठिकाणी अतिक्रमण झाले असलेचे आढळून आल्यास त्याबाबत अतिक्रमण निर्मुलन विभागा मार्फत त्वरीत कार्यवाही करण्यात यावी व इमारतीमध्ये दुरुस्तीची आवश्यकता असल्यास बांधकाम विभागामार्फत ती दुरुस्ती करुन घेण्यात यावी. यास ही सभा मान्यता देत आहे.

कल्याण रोड येथे ड्रीम सिटी वसाहतीतील नागरिक महानगरपालिकेचे सर्व कर भरत आहेत. परंतु त्यांना पिण्याचे पाण्याची व्यवस्था नाही. याबाबत त्यांनी महानगरपालिकेकडे अर्ज करुन पिण्याचे पाण्याचे कनेक्शन मिळणे बाबत मागणी केलेली आहे. मा.शासनाच्या अमृत योजने अंतर्गत पाणी पुरवठा विषयक काम प्रगतीपथावर आहे. तसेच शहर पाणी पुरवठा योजना फेज-२ काम ब-यापैकी या परिसरात झालेले आहे. या परिसरातील पिण्याचे पाण्याच्या पाण्याची टाकी पुर्ण क्षमतेने सुरु होईपर्यंत त्यांना पाणी कनेक्शन देण्यास हरकत नाही. पिण्याचे पाणी ही जीवनावश्यक बाब असल्याने त्यांना पिण्याचे पाण्याचे एक इंची कनेक्शन तात्पुरत्या स्वरुपात देण्याबाबत प्रशासनाने कार्यवाही करावी यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.स्वप्नील रोहीदास शिंदे

अनुमोदक : मा.श्री.संपत विजय बारस्कर

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ०७** **दिनांक : २९ / ०७ /२०२०.**

---

**प्रस्तावाचा विषय :** पथदिवे देखभाल दुरुस्तीसाठी निविदा प्रक्रीया पार पाडणेसाठी नविन अंदाजपत्रकीय तरतूद निर्माण करणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

वरिल विषयान्वये अहवाल की, अहमदनगर महानगरपालिकेची मुख्य इमारतीसह व प्रभाग कार्यालये पालिका मालकीचा इतर इमारती व शहरामध्ये अंदाजे ५० हजार पथदिवे बसविलेले आहेत.

त्याची देखभाल दुरुस्तीसाठी विद्युत अभियंते व तांत्रिक कर्मचारी यांची संख्या अपुरी आहे. तक्रारीचे प्रमाण जास्त असुन त्याचा वेळेवर निपटारा करणेसाठी अपुरा कर्मचारी वर्ग व विद्युत साहित्य वेळेवर उपलब्ध होत नसल्यामुळे नागरिकांच्या रोषास सामोरे जावे लागत आहे.

याबाबत इतर महानगरपालिकांची माहिती घेतली असता त्यांच्याकडे सक्षम अधिकारी व कर्मचारी उपलब्ध आहेत. मात्र मालेगाव महानगरपालिकेने देखभाल व दुरुस्ती करणेचे काम ठेकेदारास दिलेले आहे. त्यांच्या निविदा प्रक्रीयापार पाडून संपूर्ण शहराचे अथदिवे चालू करणे व दुरुस्त करणेचे काम ठेकेदारास दिलेले आहे. त्यांच्या निविदा प्रक्रीयेची माहिती घेतली असता शहरात हे सुरु करावयाचे झाल्यास त्यामध्ये सर्वप्रथम रु.२.०० कोटी एवढी अंदाजपत्रकीय तरतुद (Budget head) नव्याने करणे आवश्यक आहे.

दिनांक २५/०६/२०१९ रोजी होणा-या अंदाजपत्रकीय मंजूर करणेकामीच्या महासभेत पथदिवे देखभाल व दुरुस्तीसाठी अंदाजे २.०० कोटी रुपयांचे नविन तरतुद करणे आवश्यक आहे. बजेट तरतुद केलेनंतर शहरातील सर्व पथदिव्यांचा सर्व्हे करुन सर्व्हेच्या आधारे निविदा प्रक्रीया सुरु करता येईल.

तरी महासभेसमोर सदरचा विषय घेण्यास मान्यता मिळणेस विनंती आहे.

यावर उपायुक्त सा यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, आर्थिक अंदाजपत्रकात तरतुदीसह महासभेमध्ये ठेवा.

---*---

**मा.श्री.राहुल कांबळे :-** नगरमध्ये फ्लाय ओव्हर होतो. जेथे काम होणार आहे त्या भामामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा येतो. महानगरपालिकेने या संदर्भात काय उपाययोजना केली, इतर ठिकाणी शिफ्टींग करीता पर्यायी जागा निश्चीत केली आहे काय याची माहिती देण्यांत यावी.

**मा.महापौर साहेब :-** संबंधित खात्यातील अधिकारी यांना उद्या समक्ष तुम्हाला भेटुन घेण्याबाबत मी सांगतो.

**मा.श्री.राहुल कांबळे :-** जागा मोजणी होईल किंवा मा.आमदार संग्राम भैय्या जगताप यांचे प्रयत्नातुन नगर शहरात पुर्णाकृती पुतळा व्हावा अशी समस्त बहुजन समाजाची मागणी आहे.

**मा.महापौर साहेब :-** उद्या संबंधित अधिकारी यांचे समवेत सविस्तर चर्चा करुन मग आपल्याला माहिती द्यायला सांगतो.

**मा.श्री.राहुल कांबळे :-** मुरुम नाही. लाईट मटेरियल नाही.

**मा.महापौर साहेब :-** प्रत्येक नगरसेवकासाठी १ लाख याप्रमाणे ४ लाखांचे लाईटच्या मटेरियलची व्यवस्था मेहेत्रे यांनी करावी.

**मा.सौ.सुनिता कोतकर :-** वॉर्ड नंबर १६ मध्ये लाईट बंद आहेत. साहित्य मिळत नाही. आयुक्तांकडे तक्रार केली रात्री जाण्या-येण्याचा प्रॉब्लेम येतो. एकनाथनगर भागात लाईट नाहीत.

**मा.महापौर साहेब :-** आत्ताच मी प्रत्येक नगरसेवकाकरीता रक्कम रु.१ लाखाचे मटेरियल घेणेस सांगीतले आहे.

**श्री अमोल येवले -** केडगांव ते कायनेटीक चौक संपूर्ण लाईट बंद आहे. खेमनर वायरमन यांनी एक पोल विकला. पठारे साहेबांना फोन केला. पठारे साहेबांनी त्याला फोन केला त्यांना तो म्हणाला पोल माझ्याकडे आहे. लाईट मटेरियल मला गावातील इलेक्ट्रीक विभागातून घ्यावे लागते. त्या दुकानदाराला विचारले तर ते खेमनर यांनी मटेरियल दिल्याचे सांगतात.

**मा.महापौर साहेब -** श्री पठारे साहेबांना मी लक्ष घालण्यासाठी सांगतो. ते चौकशी करतील

**मा.श्री.रविंद्र बारस्कर -** आपल्या प्रभागातील पंपीग स्टेशन ते सत्यम हॉटेल पर्यतचे लाईट बंद आहेत. विंचू, साप फिरतात श्री मेहेत्रे यांनी तातडीने माणसे नेमून लाईट चालू करावेत.

**मा.महापौर साहेब -** ठिक आहे. चालू करण्यास सांगतो.

**मा.सौ.सुवर्णाताई गेणप्पा -** मनपा मार्फत इले.खांब जेथे उभारु शकत नाही. अशा ठिकाणी पथदिवे बसू शकत नाही. याकरीता भिंतीवर , गॅलरीत दिवे बसविले आहे. अशा ठिकांणाचा या निविदेत समावेश करावा. बंद एलईडी दिवे दुरूस्त करून बसवावे. अमृत योजनेचे काम संथ गतीने सुरू आहे त्याचा आढावा बैठक घ्यावी. शहराच्या मध्ये भागात काम सुरू करण्यात यावे. मागील आठवडयात २ वेळा पाणी पुरवठा विस्कळीत झाला त्याची चौकशी करावी.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** निविदा प्रक्रीया लवकरात लवकर होईल का. इलेक्टीक साहित्य तोपर्यंत मागविण्यांत यावे.

**मा.महापौर साहेब :-** अर्जंट जे आहे त्याचा विचार करुन अगोदर कार्यवाही करु.

**मा.श्री.सचिन शिंदे -** कोठी ते यश पॅलेश रस्त्यावर एकाच जागेवर टयुबा, सोडीयम व्हेपर, ४/३६ च्या फिटींग आहेत. खुलासा करावा.

**मा.महापौर साहेब -** श्री मेहेत्रे यांनी उदया पाहणी करावी. अहमदनगर महानगरपालिके मार्फत संपुर्ण शहरामध्ये स्मार्ट एलएडी स्ट्रीट लाईट एनर्जी सेव्हींग फिटींग बसविणे बाबत विद्युत विभागामार्फत प्रस्ताव फेर सादर करण्यांत यावा. नाशिक महानगरपालिके मार्फत ज्या पध्दतीने निविदा मागवून कार्यवाही केली त्याचधर्तीवर महानगरपालिके मार्फत प्रस्ताव तयार करण्यात यावा. अहमदनगर महानगरपालिकेचे मर्यादीत उत्पन्नाचे स्त्रोत पाहता व कोवीडच्या काळात अर्थव्यवस्थेचे चाक थांबल्या कारणामुळे अहमदनगर महानगरपालिकेची आर्थिक परिस्थिती बेताची आहे. शहराच्या विकासासाठी व नवनविन प्रकल्प राबविणेसाठी महानगरपालिकेस उपलब्ध असलेल्या आर्थिक स्त्रोत्रांपेक्षा नविन स्त्रोत तयार करणे आवश्यक आहे त्याअनुषंगाने केंद्र शासनाच्या सौर पॉवर पार्क योजनेसाठी केंद्र शासनाच्या CPSU सोबत करार करुन महानगरपालिकेच्या पडीक जमिनीचा उत्पन्न स्त्रोत म्हणून उपयोग करता येईल व जेणेकरुन महानगरपालिकेस भविष्यकालीन कायमस्वरुपी उत्पन्न स्त्रोत निर्माण होईल. त्या अनुषंगाने केंद्र शासनाच्या CPSU सोबत करार करण्याच्या व पुढील कार्यवाही करण्या बाबत कार्यवाही होणे आवश्यक आहे.

**---*---**

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट, अहमदनगर महानगरपालिके मार्फत संपुर्ण शहरामध्ये स्मार्ट एलएडी स्ट्रीट लाईट एनर्जी सेव्हींग फिटींग बसविणे बाबत विद्युत विभागामार्फत प्रस्ताव फेर सादर करण्यांत यावा. नाशिक महानगरपालिके मार्फत ज्या पध्दतीने निविदा मागवून कार्यवाही केली. त्याच पध्दतीने अहमदनगर महानगरपालिकेत प्रस्ताव तयार करुन निविदा प्रसिध्द करावी. यास ही सभा मान्यता देत आहे. अहमदनगर महानगरपालिका व केंद्रशासनाच्या

CPSU सोबत करार करुन महानगरपालिकेच्या पडीक जमिनीचे सोलर पॉवर पार्क म्हणुन उपयोग करणे व त्या अनुषंगाने प्रस्ताव तयार करणेस व येणा-या खर्चास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.स्वप्नील रोहीदास शिंदे

अनुमोदक : मा.श्री.संपत विजय बारस्कर

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-<br>
महापौर,<br>
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ०८** **दिनांक : २९ / ०७ /२०२०.**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिकेच्या फेज-२ या व्यापारी संकुलातील हॉल क्रमांक १ ते ९ औद्योगिक व कामगार न्यायालय, अहमदनगर या न्यायालयाचे इमारत भाडे व कर आकारणी बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- औद्योगिक व कामगार न्यायालय, अहमदनगर यांचे जा.क्र. ९७२ दिनांक १९/०६/२०१८ चे पत्र.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये विनंतीपुर्वक रिपोर्ट सादर करण्यांत येते की, औद्योगिक व कामगार न्यायालय, अहमदनगर यांचे इमारत भाडे व कर आकारणी बाबत औद्योगिक व कामगार न्यायालय, अहमदनगर यांनी जा.क्र.९७२ दिनांक १९/०६/२०१८ चे पत्र देवून १ ते ९ हॉल रिकामे करुन दिले आहे. असे कळविले आहे. तरी मनपा नगररचनाकार यांनी निर्धारीत केलेले भाडे रु.१,३८,६६३/- द.म.प्रमाणे मागणी व थकबाकीची मागणी करण्यांत येत आहे. याबाबत नमुद करण्यांत येते की, जागा ताब्यात घेतांना ठरल्याप्रमाणे वाजवी भाडे निर्धारीत केल्याचा प्रस्ताव सा.बा.विभाग, अहमदनगर यांना सादर करण्यात आला होता त्यावेळी आपले तत्कालीन आयुक्त यांनी त्यास मान्यता देवून सा.बा.विभागाकडुन ठरविण्यात आलेले भाडे मान्य असेल अशी स्पष्ट लेखी अनुमती दिलेली आहे. (सोबत झेरॉक्स प्रत जोडली आहे) त्यामुळे आपणाकडुन केलेली वाढीव भाडे मागणी व थकबाकी मागणी योग्य आहे असे पत्रात नमुद केले आहे.

अहमदनगर महानगरपालिकेच्या सावित्रीबाई फुले फेज-२ या व्यापारी संकुलातील हॉल क्र.१ ते ९ दि.१० मे २०१० पासुन दरमहा भाडे रु.१,३८,६६३ + इतर कर घेवून भाडेतत्वावर देण्यात आले आहेत. यापुर्वी जा.क्र.६६७ दिनांक ०६/०८/२०१५ च्या आपल्या पत्रानुसार मनपाचे नगररचनाकार व विधीसल्लागार यांचा अभिप्राय घेतला असता मा.कार्यकारी अभियंता सार्वजनिक बांधकाम विभाग, अहमदनगर यांनी प्रमाणित केलेले दरमहा भाडे रु.६६,५४७/- व मनपाचे नगररचनाकार यांनी प्रमाणित केलेले दरमहा भाडे रु.१,३८,६६३/- यामध्ये मोठी तफावत असल्याने मा.कार्यकारी अभियंता यांनी प्रमाणित केलेले दरमहा भाडे घेवून जागा भाडे तत्वावर देता येणार नाही. मनपाचे नगररचनाकार यांनी प्रमाणित केलेले दरमहा भाडे रु.१,३८,६६३/- याप्रमाणे दि.१० मे २०१० पासुन अदा करावे. त्याप्रमाणे होणा-या फरकाची रक्कम भरावी व सोबत करारनामा मसुदा जोडुन देण्यांत आलेला आहे. त्याप्रमाणे दुय्यम निबंधक, अहमदनगर यांच्या समक्ष स्वखर्चाने करारनामा करुन देण्यास आपणांस मार्केट विभाग जा.क्र.३४२ दिनांक २९/१०/२०१५ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे. परंतु अद्यापपावेतो आपण करारनामा केलेला नाही. असे वेळोवेळी औद्योगिक व कामगार न्यायालय, अहमदनगर यांस कळविण्यांत आलेले आहे.

तथापि जा.क्र.टी.पी. ४१९० दिनांक ३०/०१/२००९ चे औद्योगिक व कामगार न्यायालय, अहमदनगर यांनी सोबत जोडलेले पत्र या विभागास अवगत नसल्याने भाडे थकबाकीबाबत वेळोवेळी प्रस्ताव ठेवुन औद्योगिक व कामगार न्यायालय, अहमदनगर यांस कळविण्यांत आलेले आहे. जा.क्र.टी.पी.४३०७ दिनांक २७/०२/२०१२ व जा.क्र.टी.पी.९१९ दिनांक ०६/०२/२०१३ चे अभिप्राय व औद्योगिक व कामगार न्यायालय, अहमदनगर यांनी पत्रा सोबत जोडलेला अभिप्राय पाहता नगररचनाकार यांनी ठरविलेल्या दराने किंवा सार्वजनिक बांधकाम विभाग यांनी ठरविलेल्या दराने आकारणी करावी असे पत्रात नमुद करण्यात आले आहे. अहमदनगर महानगरपालिका नगररचनाकार यांनी ठरविलेले भाडेमूल्य दर दिनांक २६/०९/२०१७ रोजी त्यांनी यापुर्वी भाडेमुल्य दर योग्य आहे असा अभिप्राय दिलेला आहे.

तथापि मनपा नगररचना विभागाने औद्योगिक व कामगार न्यायालय, अहमदनगर यांस नगररचना विभाग जा.क्र.४१९० दिनांक ३०/०१/२००९ अन्वये तत्कालीन मा.आयुक्त यांचे स्वाक्षरीने सार्वजनिक बांधकाम विभागाने ठरविलेप्रमाणे भाडेतत्वावर देण्यास महानगरपालिका तयार आहे. असे पत्र देण्यांत आले आहे. परंतु मनपा

नगररचनाकार यांनी दरमहा भाडे १,३८,९६३/- प्रमाणित केलेले आहे. अहमदनगर मनपा ठराव क्र.५ दिनांक १५/०३/२००८ अन्वये भाडे ठरविले बाबतचा ठराव पारीत झाला आहे. तरी आपले स्तरावर उचित निर्णयास्तव रिपोर्ट आदेशार्थ सविनय सादर.

यावर सहा.आयुक्त यांचा अभिप्राय की, उक्त प्रस्तावाबाबत मा.सहा.संचालक नगररचना यांचे अभिप्राय घेणे उचित होईल. तथापि आदेशार्थ सादर.

यावर उपआयुक्त कर यांचा अभिप्राय की, सहा.संचालक नगररचना यांचेकडे अभिप्रायार्थ सादर करा.

यावर सहाय्यक संचालक, नगररचना यांचा अभिप्राय की, सदर प्रकरणी या कार्लालयाने यापुर्वी वेळोवेळी अभिप्राय दिलेले आहेत. त्यानुसार पुढील कार्यवाही करणे योग्य होईल. पुनःश्च अभिप्राय मागविण्याचे प्रयोजन समजून येत नाही.

यावर मार्केट विभाग प्रमुख यांचेकडून दि.३०/०७/२०१९ रोजी फेरसादर रिपोर्ट की,

मा.नगररचनाकार यांनी वरील ठरविलेले भाडे कमी करता येणार नाही. असे जा.क्र.टि.पी.४३०७ दिनांक ०७/०२/२०१२ अन्वये कळविले आहे.

मा.शासन निर्णय क्र./आय.सी.ए.ई./०४०९/प्र.क्र./१३३/कामगार/६, उद्योग उर्जा व कामगार विभाग, मंत्रालय मुंबई ४०००३२ दिनांक १४ जुलै २००९ अन्वये सदर जागेचे भाडे सार्व. बांधकाम विभाग, अ.नगर यांनी निश्चीत केल्यानुसार दरमहा भाडे रुपये ६६,५४७/- (स्थानीक कर वगळून) या दराने भाडे घेण्यास व त्याप्रमाणे अदा करण्यास मा.शासन मंजूरी देत आहे. असे श्री.मा.बा.शि.वानखेडे शासनाचे उपसचिव यांनी कळविले आहे.

सदर कार्यालयाने दिनांक १९/०६/२०१८ रोजी जागेचा ताबा सोडला आहे. मा.शासनाच्या वरील पत्राप्रमाणे दरमहा भाडे रु.६६,५४७/- (स्थानीक कर वगळून) आकारणी केल्यास दिनांक ०१/०५/२०१० ते दिनांक १९/०६/२०१८ अखेर रुपये ८३,३०,९८२/- (अक्षरी रुपये त्र्याऐंशी लाख तीस हजार नउशे ब्याऐंशी मात्र) इतकी थकबाकी होती त्यापैकी त्यांनी रुपये त्रेसष्ठ लाख बहात्तर हजार चारशे नव्यान्नव (६३,७२,४९९/-) इतकी रक्कम भाडे पोटी इकडे जमा केली आहे. सदर कार्यालयाकडून रुपये १९,५८,४८३/- (अक्षरी रुपये एकोनीस लाख अठ्ठावन्न हजार चारशे त्र्याऐंशी) इतकी थकबाकी येणे आहे. सोबत तक्ता जोडत आहे.

तरी मा.शासनाचे दिनांक १४ जुलै २००९ चे शासन निर्णयानुसार दरमहा भाडे रुपये ६६,५४७/- (अक्षरी रुपये सहासष्ठ हजार पाचशे सत्तेचाळीस ) घेण्यास मान्यता मिळणे बाबत सविनय सादर.

यावर मा.आयुक्त साहेब अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

**---*---**

**चर्चा :-**

**मा.महापौर साहेब :-** ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिकेच्या फेज-२ या व्यापारी संकुलातील हॉल क्रमांक १ ते ९ औद्योगीक व कामगार न्यायालय, अहमदनगर या न्यायालयाचे इमारत भाडे व कर आकारणीस ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.रविंद्र रावसाहेब बारस्कर

अनुमोदक : मा.श्री.मनोज लक्ष्मण दुलम

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ०९** **दिनांक : २९ / ०७ /२०२०.**

---

**प्रस्तावाचा विषय :** सिध्देश्वर भागवत प्रिंटर्स यांचे सन २००३-२००४ या आर्थिक वर्षातील छपाई टेंडर एफडीआर रिफंड बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

विनंती रिपोर्ट सादर करण्यांत येतो की, अहमदनगर महानगरपालिका सन २००३-२००४ करीता सिध्देश्वर भागवत प्रिंटर्स यांनी छपाई टेंडर डिपॉझिट रक्कम रु.१०,०००/- भरलेली होती. सदर FDR No. ०१३०४२८ दिनांक ०३/१०/२००३ अन्वये भरलेली रक्कम परत मिळणे बाबत त्यांनी दिनांक ०६/०८/२०१८ अन्वये त्यांनी इकडेस पत्र दिले आहे.

सदर डिपॉझिट रक्कम रिफंड करणे बाबत प्रस्ताव दिनांक ०६/०९/२०१८ रोजी सादर केला असता मा.मुख्य लेखापरीक्षक यांनी महाराष्ट्र नगरपालिका लेखासंहिता १९७१ मधील नियम क्र.१९०(३) अन्वये मा.महासभेची मान्यता घेवूनच कार्यवाही करणेत यावी. तसेच सदर प्रस्तावास सभा क्रमांक १ दिनांक २५/०६/२०१९ अन्वये सिध्देश्वर भागवत प्रिंटर्स यांचे सन २००३-२००४ या आर्थिक वर्षातील फॉरफीट झालेले छपाई टेंडर डिपॉझिट FDR रक्कम रु.१०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) रिफंड करणेस मा.महासभेने मान्यता दिलेली आहे. तद्नुसार रिफंडबाबत बिल तयार केले असता मा.मुख्यलेखापरीक्षक यांनी सा.प्र.वि.जा.क्र.२६६ दिनांक १७/०७/२०१८ च्या कार्यालयीन आदेशा नुसार ठरावाची अंमलबजावणी करणेबाबत आदेशीत केलेले आहे. तद्नुसार सदर प्रस्ताव व ठराव प्रत माहितीस्तव सोबत जोडली असुन सिध्देश्वर भागवत प्रिंटर्स यांचे सन २००३-२००४ या वर्षातील छपाई टेंडर डिपॉझिट (FDR) रक्कम रु.१०,०००/- (रुपये दहा हजार फक्त) रिफंड करणेस मान्यता मिळावी हि विनंती.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, सदरचा महासभा ठराव हा मा.स्थायी समितीने सादर केलेल्या अंदाजपत्रकास मान्यता देणेसंदर्भात आहे. त्यामध्ये अंदाजपत्रकामध्ये शिफारस, छाननी नविन तरतूदी इत्यादी बाबी यामध्ये अपेक्षित आहेत. तथापि ठरावामध्ये जात झालेल्या डिपॉझिट परत देणेस मान्यता दिली आहे. त्यामुळे सदर ठरावाची अंमलबजावणी करणे संदर्भात निर्णयार्थ सादर (स्वतंत्र ठराव विषयपत्रावर घेवून करणे आवश्यक वाटते).

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, अशा प्रकारच्या थकीत अनामतीचा एकत्र विषय घ्यावा बरीच वर्षे झालीत नवीन विषय घेवून ठराव करावा.

**---*---**

**चर्चा :-**

**मा.महापौर साहेब :-** ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. सिध्देश्वर भागवत प्रिंटर्स यांचे सन २००३-२००४ या आर्थिक वर्षातील फॉरफीट झालेले छपाई टेंडर डिपॉझिट FDR रक्कम रु.१०,०००/- ची अदा करण्यांस ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.सौ.मालन सुरेशराव ढोणे

अनुमोदक : मा.सौ.सुप्रिया धनंजय जाधव

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-

महापौर,

अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १०** **दिनांक : २९ / ०७ /२०२०.**

---

**प्रस्तावाचा विषय :** उत्पन्नाच्या वाढीसाठी खाजगीकरणाच्या माध्यमातुन BOT तत्वावर महालक्ष्मी उद्यान व सिध्दीबाग उद्यान चालविणेस देणेबाबत..

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, महानगरपालिकेचे महालक्ष्मी उद्यान व सिध्दीबाग उद्यान या वास्तु असून सिध्दीबाग उद्यान शहराच्या दृष्टीने मध्यवर्ती भागात असल्याने नागरिकांच्या लहान मुलांच्या खेळण्यासाठी व मनोरंजनासाठी उपयुक्त असे उद्यान आहे. तथापि ज्येष्ठ नागरीक व लहान मुलांचे समाधान होईल अशा प्रकारचे वातावरण उपलब्ध करुन देणे मनपास जिकरीचे होत आहे. तसेच महालक्ष्मी उद्यान हे देखील महत्वपुर्ण उद्यान असुन उपलब्ध जागा तसेच उपनगरासाठी मध्यवर्ती असलेली वास्तु आहे. तथापि येथील उद्यान प्रकल्पाच्या माध्यमातुन पुरेसे समाधानकारक वातावरण उपलब्ध होत नाही. महानगरपालिकेच्या दृष्टीने शहरवासियांच्या उद्यानाच्या सुविधेबाबत अपेक्षा उंचावलेल्या आहेत. महानगरपालिकेकडे जागा, खेळण्या, वास्तुची देखभाल, नियुक्ती केलेल्या कर्मचा-यांचा आस्थापना खर्च, विद्युत खर्च करुन देखील बाग सुधारणा व अल्हाददायक वातावरण निर्मिती तुलनेमध्ये कमी प्रमाणात उपलब्ध होत आहे.

मनपा कर्मचारी वर्ग मा.न्यायालयाच्या आदेशान्वये कायम झालेले कर्मचारी वारसा / अनुकंपा यान्वये नियुक्त झालेले कर्मचारी यांना बाग सुधारणा, झाडे फुले विकसीत करणे त्यांची जोपासणा करणे, मोकळया भागात लॉन लावणे, जंतुनाशक फवारणी करणे या शास्त्रोक्त कामाचा अनुभव नसल्याने बराचसा कर्मचारी वर्ग अकुशल असल्याने बाग सुधारणा कामी अडचणी येतात.

यास्तव महानगरपालिकेच्या माध्यमातुन दोनही उद्यान खाजगी करणातुन विकसीत करण्याबाबत निर्णय झ ााल्यास कर्मचारी वर्ग इतर कामासाठी मोठयाप्रमाणात उपलब्ध होईल तसेच विद्युतखर्च, देखभाल खर्च कमी होउन नियुक्त केल्या जाणा-या व्यवसाय संस्थेकडुन बाग सुधारणा, नवनवीन खेळण्या उपलब्ध झाल्यास नागरीक, लहानमुले, यांना सदर उद्यानाला आनंद घेता येईल याप्रमारचे सुविधा देतांना व्यवसाय संस्थेस नागरिकांना शुल्क आकारणीस अनुमती द्यावी लागेल.

तसेच शहरातील १) मातोश्री उद्यान, विनायक नगर २) शाहुनगर उद्यान, केडगांव ३) कपिलेश्वर उद्यान, सारसनगर ४) विद्याकॉलनी उद्यान, कल्याण रोड ५) मातोश्री उद्यान, भुतकरवाडी ६) शिवतीर्थ उद्यान, भुतकरवाडी ७) नाना नाणी पार्क, सन्मित्र कॉलनी इत्यादी उद्याने ना-नफा ना-तोटा या तत्वावर चालविण्यास देणे संयुक्तीक होईल.

तरी, सिध्दीबाग उद्यान (मत्सालय व फुलसाणीसह कै.बा.दे.उद्यान) व महालक्ष्मी उद्यान खाजगी करणाच्या माध्यमातुन (BOT) तत्वावर ११ वर्ष कराराने व १) मातोश्री उद्यान, विनायक नगर २) शाहुनगर उद्यान, केडगांव ३) कपिलेश्वर उद्यान, सारसनगर ४) विद्या कॉलनी उद्यान, कल्याण रोड ५) मातोश्री उद्यान, भुतकरवाडी ६) शिवतीर्थ उद्यान, भुतकरवाडी ७) नाना नाणी पार्क, सन्मित्र कॉलनी इत्यादी उद्याने ना-नफा ना-तोटा या तत्वावर तीन वर्षे कराराने चालविण्यास देण्यास व त्याबाबतच्या अटी / शर्ती निश्चीत करण्यास सदरचा प्रस्ताव मा.स्थायी समितीपुढे ठेवण्याबाबत आदेशार्थ सादर.

यावर उपायुक्त कर यांचा अभिप्राय की, धोरणात्मक निर्णय घेणेसाठी मा.स्थायी समितीची शिफारस होवून मा.महासभेकडे पाठविणे उचित होईल.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :-**

**मा.सौ.सुरेखा कदम :-** महालक्ष्मी उद्यान भाडे तत्वावर चालविण्यास देण्यांत यावे.

**मा.महापौर साहेब :-** उद्यान विभागात कमी कर्मचारी आहेत. त्यामुळे महानगरपालिकेचे उद्यान खाजगी तत्वावर देत आहोत.

**मा.श्री.सुनिल त्रिंबके :-** कोरोना पेशंट किती दगावतात. आपली महानगरपालिका किती बॉडी नेतात.

**मा.आयुक्त साहेब :-** नक्की संख्या निश्चीत नाही. आजमितीला ७-८ होतात. त्यामध्ये नगरमधले १-२ आहे. आपल्यापेक्षा जिल्ह्याचे प्रमाण जास्त आहे.

**मा.श्री.सुनिल त्रिंबके :-** किती दिवस बॉडी ठेवतो.

**मा.आयुक्त साहेब :-** शक्य होईल तितक्या लवकर विल्हेवाट लावण्यांत येते.

**मा.श्री.सुनिल त्रिंबके :-** पठाणला फोन केला तर ते म्हणतात आम्हाला टेन्शन देवू नका. आम्ही ड्रायव्हींग करीत नाही.

**मा.आयुक्त साहेब :-** आपल्या फोन नंतर मी पठाण यांना फोन केला. त्यांनी मला दिवसभरात ६-७ बॉडीचे क्रीयाकर्म केल्याचे सांगीतले. त्यामुळे मी त्यांना तसे सांगीतले. मी पठाण यांना असे उत्तर देणे चुकीचे आहे. असे सांगीतले. व त्यांचेकडील कामगार जरी घरी गेले असतील तरी रातोरात बॉडी उचलून घेणेस सांगीतले. या दोन बॉडीची विल्हेवाट लावून त्यांनी मला फोन केला. कोवीडचा प्रादुर्भाव असल्याने उघडयावर जाळण्याची परवानगी नाही. त्यामुळे विद्युत दाहिनीमध्ये क्रीयाकर्म केले जाते, दिवसात चार-सहा बॉडी होतात. एक अंडर रिपेअर आहे ते दुरुस्त करुन घेता येईल का ते पाहत आहोत.

**मा.श्री.सुनिल त्रिंबके :-** आनंद लॉन मधील सेंटरवर लोक कम्पौंडच्या भिंतीवरुन जेवणाचे डबे देतात. तसेच बाहेर कॉलनीत फीरतात.

**मा.आयुक्त साहेब :-** घरुन डबे देवू शकतात. आपण त्या सेंटरमध्ये सीसीटीव्ही लावणेस पोलिस विभागास सांगीतले. पोलीसांकडे सध्या यंत्रणा नाही. सिक्युरिटी गार्ड बाबत आज किंवा उद्या निविदा फायनल होईल. पोलीस अधिक्षकांशी बोललो आहे. आपल्याकडे कुमक आली की यावर आळा बसेल.

**मा.श्री.सुनिल त्रिंबके :-** आनंद लॉन मधे जी कचरा गाडी जाते तीच गाडी कॉलनीत फिरते. सेप्रेट गाडी देण्यांत यावी.

**मा.महापौर साहेब :-** आनंद लॉनसाठी सेप्रेट ठेवायला सांगू.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** नाले व ओढयांच्या विषयामध्ये आमच्या वॉर्डातील ओढे-नाले समाविष्ठ करण्यांत आलेले नाहीत. संपत बारस्कर यांनी पत्र दिले आहे. त्या नाल्यांचा समावेश करण्यांत यावा.

**मा.महापौर साहेब :-** हे नाले ऑलरेडी समाविष्ठ करणार आहोत.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** प्रत्येक प्रभाग समिती वाईज आपण कोव्हीड सेंटर उभारण केली पाहीजे असे पत्र दिले या संदर्भात चेकींग घेतले तर भरपूर प्रमाणात रुग्ण आढळतील नागरिकांचे आरोग्याचे दृष्टीने काही ठोस पावले उचलावी लागतील.

**मा.आयुक्त साहेब :-** प्रभाग वाईज काळजी घेण्यासंदर्भात आपले पत्र वाचले विखुरल्याप्रमाणे मॅनेज करणे महानगरपालिकेला अवघड आहे. एकाच ठिकाणी व्यवस्था करणे सुलभ जाते. होम अलगीकरण बाबत आवश्यकता भासल्यास पुढे कदाचीत संख्या भरपूर झाली तर होम आयसोलेशन बाबत मेडीकल क्षेत्रातील विचार घेण्यात येईल. पेशंट लक्षणे नसलेली येतात. डिसचार्ज रेट चांगले आहे. ७००-८०० पेशंट दररोज आले तरी १०० बेड शिल्लग राहायला पाहिजे. येणारे जाणारे यामध्ये १०० चा मार्जीन राहीला तर बफर ठेवता येतील. प्रत्येक घरातच पेशंट निघाला व त्या घरात सेप्रेट रुम आहे व केअर टेकर आहे व त्यांचेकडून हमी घ्यावी लक्षणे आढळल्यास रुग्णालयात दाखल करील या अटीवर करता येईल.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** औषधी काढा, जनजागृती म्हणा असा काही उपाय करा.

**मा.आयुक्त साहेब :-** होमीओपॅथीची औषधे हायड्रोक्लोरीन जिथे सेंटर आहे तेथे एसयुपी अंतर्गत देण्यास स्वयंसेवी संस्थांना सांगीतले आहे. दाट लोकवस्तीच्या ठिकाणी अर्सेनिक अल्बम, औषधी काढा वगैरे देण्या संदर्भात त्या नियंत्रण विभागाच्या अंडर वाटप करतो. नगरपालिकेच्या वतीने खरेदी केलेले नाही. औषधी काढयाचे प्रमाणिकरणाचा रिझल्ट मिळत नाही सगळयांनी मिळून निर्णय घेवू.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** शासनाचा जो निधी आला आहे नागरिकांच्या जिवीताचे रक्षण करणेसाठी तो वापरणेत यावा.

**मा.आयुक्त साहेब :-** गव्हर्नमेंट कडून निधी आलेला नाही. १४ व्या वित्त आयोगा अंतर्गत आपत्ती व्यवस्थापन प्रतिसाद निधीमधुन खर्च करण्यास मुभा दिली आहे. आयुर्वेदीक काढा वगैरे प्रमाणीत करणार कोण. आयुष डिपा. मान्यता दिली त्यानुसार आपण कार्यवाही करु. सगळया तज्ञांचे मार्गदर्शन घ्यावे लागेल. त्याचा मात्रा किती असावा याचा आकृतीबंध ठरवावा लागेल. माहिती मागवून घेतो.

**मा.डॉ.श्री.बोरूडे -** कोव्हीड सेंटर चालू केले त्यामुळे वॉर्डातील नर्स व डॉक्टरांची भरती NRHM अंतर्गत तातडीने भरती करून घ्यावी. वॉर्डात जे पेशंट सापडतात त्याचे सर्व्हेक्षण व्यवस्थीत होत नाही. मा.आयुक्तसाहेब यांनी सांगितले १६ लाख निधी मिळाला पालकमंत्र्याशी बोलून निधीची मागणी करावी.

**मा.आयुक्त साहेब -** चांगला विषय मांडला जिल्ह्याचा PIP मंजूर केला आहे. ९ कोटी पाठवला जिल्हयाला एकत्रित करून पाठविला आपल्याला लागणारी औषधाची डिमांड विचारात घेवून मागणी करण्यांत येईल. उद्यापर्यत डॉक्टर, नर्से स वॉर्ड बॉय अर्धवेळ व पूर्ण वेळ मागणी करत आहोत. निविदा टाकणे बाबत सुचना दिल्या आहेत.

**मा.श्री.विनीत पाउलबुधे -** कोवीड मध्ये बांधकाम, पाणीपुरवठा कर्मचारी लावले त्यामुळे इतर विभागातील कमर्चारी शिल्लक आहे. बांधकाम , पाणी पुरवठा विभागातील कर्मचा-यांना कोरोनाची नेमणुक देवू नये. कामे ठप्प होवून पडतील. प्रशासनास विनंती इतर विभागातील कर्मचा-यांना डयुटया देण्यात याव्यात. प्रशासनाने याचा गांर्भियपूर्वक विचार करून इलेक्ट्रीक विभागातील कर्मचारी आहेत त्यांना तेथेच ठेवा.

**मा.महापौर साहेब -** मनपाची दैनंदिन कामे असतात.

**मा.आयुक्त साहेब -** आजच्या कोरोनाच्या कालावधीत सगळयात महत्वाचे शहरातील नागरिकांचे आरोग्य जपायचे , यासाठी मेडिकल ऑफिसर, व इतर विभागातील कर्मचारी यांचा वापर केला आहे. पाणी पुरवठा , स्वच्छता ही अव्याहतपणे कामे चालू आहेत. शक्यतो आपण इतर डिपामेंटवर परिणाम होवू नये हेच प्रामुख्याने पाहिले आहे. जनआरोग्य महत्वाचे आहे.

**मा.श्री.विनीत पाउलबुधे -** अनेक कर्मचा-यांना कोरोनाच्या डयुटया दिलेल्या नाहीत २५०० कर्मचा-यांना कोरोनाच्या डयुटया देणार का ? विशेषतः बांधकाम विभागाचे इंजिनिअर यांना कोरोना डयुटी देवू नये.

**मा.आयुक्त साहेब -** आपल्याशी मी पूर्ण सहमत आहे.

**मा.श्री.विनीत पाउलबुधे -** इलेक्ट्रीक विभागासाठी प्रत्येक प्रभागासाठी ५ लाख मंजूर करणार आहात नगरसेवकांची दुरुस्तीची मागणी राहणार आहे. वायरमन, इंजिनिअर तिकडे लावले मग कामे कशी होणार, बांधकाम , पाणी पुरवठा इंजिनिअरला विचारले तर तो कोवीडच्या डयुटीवर असतो लिकेज काढायला एकच माणूस आहे. आपण यावर गांभिर्याने विचार करावा त्याप्रमाणे कार्यवाही करावी.

**मा.महापौर साहेब -** महत्वाचे लोक आहेत त्यांना डयुटया देवू नये असे आयुक्तसाहेबांनी सांगितले आहे.

**मा.श्री.सुनिल त्रिंबके -** शहरात औषध फवारणी करावी, धुराची फवारणी करावी.

**मा.श्री.संपत बारस्कर -** आयुष मंत्रालयाने गाईड लाईन दिली जे कंटेनमेंट झोन केले त्या भागात अर्सेनिक अल्बम गोळया देण्यात याव्यात.

**मा.आयुक्त साहेब -** नगरसेवक व स्वयंसेवी संस्था व आपले कर्मचा-यांनी डयुटीवर गोळया वाटल्या, सिध्दार्थ नगर भागात अर्सेनिक अलबम गोळया वाटण्यात आल्या , औषधी काढा सुध्दा वाटू.

**मा.श्री.संपत बारस्कर -** कंटेनमेंट झोन मध्ये महानगरपालिकेने औषधी गोळया वाटप कराव्यात.

**मा.आयुक्त साहेब -** सर्व डिमांड शासनाकडे ५० हजार औषधी गोळयांची मागणी केली आहे. आपल्याच फंडातून विकत घेवू.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** सुवर्ण जयंती योजने अंतर्गत पंतप्रधान योजनेतुन १० लाखाची मदत अहमदनगर महानगरपालिकेने फेरीवाल्यांना केली. महाराष्ट्रातील पहिली महानगरपालिका आहे. फेरीवाल्यांना केंद्र शासनाच्या योजनेचा लाभ दिला. त्याबद्दल अभिनंदनाचा ठराव करावा.

**मा.महापौर साहेब :-** अजुन कोणी असतील तर त्यांना अर्ज करायला सांगा.

**मा.महापौर साहेब :-** ऑफिस रिपोर्ट मंजूर व मा.श्रीमती शोभाताई बोरकर यांनी केलेल्या मागणीनुसार गंगा उदयान सुध्दा हे खाजगी तत्वावर चालविणेस देणेस मंजूरी देण्यात येत आहे.

**---*---**

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. अहमदनगर महानगरपालिकेच्या उत्पन्नाच्या वाढीसाठी खाजगीकरणाच्या माध्यमातुन BOT तत्वावर महालक्ष्मी उद्यान व सिध्दीबाग उद्यान तसेच गंगा उद्यान चालविणेस देण्यास ही सभा मान्यता देत आहे. याबाबत प्रशासनाने आवश्यक ती निविदा प्रक्रीया राबवुन योग्य ती कार्यवाही करावी.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्रीमती.वंदना विलास ताठे

अनुमोदक : मा.श्रीमती.शोभा सुधाकर बोरकर

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : ११** **दिनांक : २९ / ०७ /२०२०.**

---

**प्रस्तावाचा विषय :** दैनिक लोकमंथन, दैनिक पुण्यनगरी, दैनिक सामना, दैनिक नवामराठा, दैनिक सार्वमत, दैनिक समाचार, दैनिक नगरटाईम्स, साप्ताहिक लोक अंकुर, साप्ताहिक ज्ञानधारा या वृत्तपत्रातुन प्रसिध्द केलेल्या जाहिरातीच्या दिनांक २२/०६/२०१८ ते २७/१२/२०१८ या कालावधीतील बीले मा.महासभेकडे मंजुरीस्तव पाठविणे बाबत..

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

विनंतीपुर्वक रिपोर्ट सादर करण्यांत येतो की, अहमदनगर महानगरपालिकेच्या विविध विभागाच्या जाहिराती प्रसिध्दी विभागा मार्फत शासनमान्य यादीवरील वृत्तपत्रांमध्ये रोटेशननुसार प्रसिध्द करण्यांत येतात.

दैनिक लोकमंथन, दैनिक पुण्यनगरी, दैनिक सामना, दैनिक नवामराठा, दैनिक सार्वमत, दैनिक समाचार, दैनिक नगरटाईम्स, साप्ताहिक लोक अंकुर, साप्ताहिक ज्ञानधारा या वृत्तपत्रातुन प्रसिध्द केलेल्या एकुण ५८ जाहिरातीची बीले अहमदनगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०१८ करीता दिनांक २२/०६/२०१८ ते २७/१२/२०१८ या कालावधीमधील आहेत.

१) जा.क्र.साप्रवि/निवडणूक ५१८ दिनांक १२/१०/२०१८, २) जा.क्र.साप्रवि/निवडणूक ७२० दिनांक १४/११/२०१८, प्र.क्र.कावि/निवडणूक/१७५/२०१८, व प्रसिध्दी विभाग ४०६ दिनांक ०४/०८/२०१८ कार्यालयीन आदेशाप्रमाणे कामकाजामुळे जाहिरातीचे बीले करण्यांस विलंब झाला.

उपरोक्त जाहीराती वेळोवेळी मा.उपायुक्त, अहमदनगर महानगरपालिका यांच्या खर्चास दिलेल्या मंजूरीने देण्यांत आलेल्या आहेत. सदर जाहिरातीची बीले शासकीय दराने प्राप्त झालेली आहेत. तरी सदर बीले जाहिरात खर्च रु.३१,००,०००/- या लेखा शिर्षकातून खर्ची घालण्यास व रु.२,५८,६८०/- (अक्षरी रक्कम रुपये दोन लाख अठ्ठावन्न हजार सहाशे ऐंशी मात्र)

सन २०१९-२०२० लेखाशिर्षक जाहिरात खर्च बजेट तरतुद रु. ३१,००,०००/- एकुण झालेला खर्च - ३०,७०,८३४/- शिल्लक रु. २९,१६६/-

सदर बाबत संबंधित वृत्तपत्रांनी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता केल्यानुसार वरीलप्रमाणे ५८ बीले चालू आर्थिक (सन २०१९-२०२०) वर्षातून खर्ची टाकणेकरीता लेखा परिक्षणासाठी पाठविले असता मा.मुख्यलेखापरीक्षक यांनी महाराष्ट्र नगरपरिषद लेखा संहिता २०११ मधील नियम १६८ प्रमाणे मुदतबाह्य मागण्या मा.महासभेची मंजुरी शिवाय देता येणार नाही. असा अभिप्राय दिला आहे. त्यानुसार सदरची बीले अदा करणेस मा.महासभेची मंजूरी मिळणेकरीता मा.महासभेपुढे सादर करण्याच्या मान्यतेस्तव सविनय सादर.

यावर उपायुक्त (कर) यांचा अभिप्राय की, "A" नुसार निर्णयार्थ सादर.

यावर मा.जिल्हाधिकारी तथा आयुक्त साहेब यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :-**

**मा.महापौर साहेब :-** ऑफिस रिपोर्ट मंजूर.

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट मंजूर. दैनिक लोकमंथन, दैनिक पुण्यनगरी, दैनिक सामना, दैनिक नवामराठा, दैनिक सार्वमत, दैनिक समाचार, दैनिक नगरटाईम्स, साप्ताहिक लोक अंकुर, साप्ताहिक ज्ञानधारा या वृत्तपत्रातुन प्रसिध्द केलेल्या

जाहिरातीच्या दिनांक २२/०६/२०१८ ते २७/१२/२०१८ या कालावधीतील बीले अदा करण्यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करावी.

सुचक : मा.श्री.स्वप्नील रोहीदास शिंदे

अनुमोदक : मा.सौ.मालन सुरेश ढोणे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १२** **दिनांक : २९ / ०७ /२०२०.**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील आरक्षण क्रमांक २१६ अ (सार्वजनिक सुविधा) या आरक्षणाखाली जमिनीचे भुसंपादन करणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- महासभा ठराव क्रमांक १८ दिनांक १४/०८/२०१९.

१) केंद्र शासन पुरस्कृत अमृत योजनेअंतर्गत "भुयारी गटार योजना " या महत्वाकांक्षी प्रकल्पाचे काम अहमदनगर महानगरपालिका मार्फत हाती घेण्यात आले असुन ते प्रगतीपथावर आहे. या प्रकल्पात भुयारी गटारी, पंप- हाऊस तसेच प्रक्रिया केंद्र इ. कामांचा समावेश आहे. या प्रकल्पास सन २०१७-२०१८ मध्ये प्रशासकीय मंजुरी प्राप्त झाली असुन हा प्रकल्प कालबध्द मुदतीत पूर्ण करणे बाबत बंधन घालण्यात आलेले आहे.

२) उपरोक्त प्रकल्पास वेगवेगळया ठिकाणी वेगवेगळया क्षेत्रांच्या जमिनींची आवश्यकता आहे. नगररचना विभागाकडून आवश्यक त्या जागा उपलब्ध करुन देण्याची कार्यवाही करण्यांत येत आहे. त्याचाच एक भाग म्हणून पाणी पुरवठा विभागाच्या मागणीप्रमाणे स.क्र.२२८ व २२९ सावेडी या जागेवर आरक्षण क्र.२१६ अ "सार्वजनिक सुविधा" हे आरक्षण म.प्रा.व न.र.अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये प्रस्तावित करण्यांत आले व त्यास शासनाची मंजुरी घेण्यांत आली. याच प्रकल्पा अंतर्गत बुरुडगांव स.क्र.६६/१ येथील जागा नुकतीच भूसंपादन केली आहे व त्या ठिकाणी या प्रकल्पांतर्गत प्रत्यक्ष बांधकामे देखिल प्रगतीपथावर आहेत.

३) आता उपरोक्त प्रस्तावित आरक्षणास शासनान मंजुरी दिल्याने सदर आरक्षणाखालील जमिन म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ च्या कलम १२६ अन्वये संपादित करणे शक्य होणार आहे व वरील महत्व, स्वरुप व कालमर्यादा पाहता ते तातडीने करणे आवश्यक आहे. कलम १२६ (१) मधील तरतुदी खालील प्रमाणे आहेत. 126. Acquisition of land required for public purposes specified in plans

1)When after the publication of a draft Regional Plan, a Development or any other plan or town planning scheme, any land is required or reserved for any of the public purposes specified in any plan or scheme under this Act at any time the Planning Authority, Develoment Authority or as the case may be 1[any Appropriate Authrority may, expect as otherwise provide in section 113A]2[acquire the land,-

(a) by agreement by paying amount agreed to, or

(b) in lieu of any such amount, by granting the- owner or the lesses, subject, however, to the lessee paying the lessee or depositing with thw planning Authority, as the case may be, for payment to lessee, an amount equivalent to the value of the lessor's interst to be determined by any of the said Authorities concered on the basis of the principles laid down in the Land Acquisition Act, 1894, Floor Space Index (FSI) or Transferable Development Rights(TDR) against the area of land surrendred free of cost and free from all encumbrances, and also furture additional Floor space Index or Treansferable Developmnet Rights against the development or construction of the amenity on the surrendred land at his cost, as the Final Development Control Regulations prepaid in the

behaif of provide, or (c) by making an application to the State Government for aquiring such a land under the Land Acquisition Act, 1894,

and the land(together the amenity, if any, so developed or constructed) so acquired by agreement or by grant of Floor Space Index or addtional or Transfrablle Development Rights under this section or under the land Acquisition Act, 1894, as the case may be, shall vest absolutely free from all encumbrances in th Planning Authority, Development Authority, or as the case may be, any Appropriate Authority.]

उपरोक्त भूसंपादनाच्या तरतुदीपैकी कलम १२६ (१) (ब) नुसार भूसंपादन करण्याचे अधिकार याच अधिनियमातील कलम १५२ नुसार मा.आयुक्त यांना आहेत. त्याच्याच प्रयत्नाचा एक भाग म्हणून या आरक्षणाने बाधित सर्व जमिनधारकांना हस्तांतरणीय विकास हक्काच्या मोबदल्यात त्यांची जमिन म.न.पा.स हस्तांतर करुन देण्याची विनंती करण्यांत आली. त्यांच्यापैकी एक जमिन मालक श्री.बाळासाहेब जगन्नाथ बोठे पाटील यांनी म.न.पा.च्या आवाहनास सकारात्मक प्रतिसाद देवून त्यांची ४४०० चौ.मी.क्षेत्राची जमिन हस्तांतरणीय विकास हक्काच्या मोबदल्यात अहमदनगर म.न.पा.कडेस हस्तांतरीत केली. उर्वरीत जमिन धारकांनी मात्र म.न.पा.च्या आवाहनास नकारात्मक प्रतिसाद दिलेला असून त्यांची जमिन हस्तांतरणीय विकास हक्काच्या मोबदल्यात हस्तांतर करण्यास सध्या तरी असहमती दर्शविलेली आहे. असे असले तरीही संबंधित जमिन मालकांना राजी करण्याचे प्रयत्न नगररचना विभागाकडून सुरु आहेत.

४) प्रस्ताव मा.महासभेसमोर सादर करण्याची आवश्यकता :- वर नमुद केल्याप्रमाणे म.प्रा.व न.र. अधिनियम १९६६ च्या कलम १२६ (१)(ब) नुसार विषयांकित जमिनीचे भूसंपादन करण्याचे प्रयत्न मा.आयुक्त स्तरावर सुरु असले तरीही, असे संपादन संबंधित जमिन मालकाच्या इच्छेवर अवलंबून असते. या प्रकारात जमिन मालकावर कोणतीही अनिवार्यता (compulsion) नसते. त्यामुळे अशा भूसंपादनास लागणारा कालावधी अनिश्चित असतो. प्रस्तुत प्रकल्पाची कालमर्यादा/कालबध्दता विचारात घेता विषयांकित जमिनीचे म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ चे कलम १२६ (१)(अ) व कलम १२६ (१)(क) नुसार देखिल भूसंपादन करणे आवश्यक आहे. त्यानुसारच संदर्भीत भुसंपादन अनुषंगाने ठराव यापुर्वीच पारीत करण्यात आलेला आहे. आणि अशा अनुषंगाने कार्यवाही बाबत भूसंपादन प्रस्तावास मा.महासभेची मंजुरी आवश्यक आहे. त्यामुळे सदर प्रस्ताव मंजुरीसाठी मा.महासभेस सादर करणेत येत आहे. विषयांकित जमिनीचे जमिन मालक निहाय मुल्यांकन मा.सह जिल्हा निबंधक (Joint District Registrar) यांचेकडून मागविण्यात आले आहे ते त्यांनी पत्र क्र.मुल्यांकन /२५३९/२०२० दिनांक १५/०७/२०२० अन्वये पाठविलेले आहे. (सोबत प्रत सादर) हे मूल्यांकन (सन २०२०-२०२१ या वर्षासाठीचे) सर्व्हे क्रमांक व क्षेत्र निहाय खालील प्रमाणे आहे.

| अ.नं. | गावाचे नांव | सर्व्हे नंबर | क्षेत्र (चौ.मी.) | मुल्यांकन |
|---|---|---|---|---|
| १ | मौजे सावेडी (मनपा हद्द) | २२८ | ७०२५ चौ.मी. | ५,१६,९५,६००/- |
| २ | मौजे सावेडी (मनपा हद्द) | २२९ | २९०० चौ.मी. | १,७२,८०,०००/- |
| ३ | मौजे सावेडी (मनपा हद्द) | २३० | ७८०० चौ.मी. | ४,५०,००,०००/- |

वरील विषयांकित जमिन भूसंपादन कायदा २०१३ मधील तरतुदीनुसार खाजगी वाटाघाटीने संपादीत करावयाची झाल्यास एकुण देय रक्कमेच्या १००% दिलासा रक्कम व २५% अतिरिक्त मोबदला रक्कम मुळ जमिन मुल्यासह अनुज्ञेय होईल. मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचेकडेस सदर प्रस्ताव भूसंपादनासाठी सादर केल्यास सदर

जमिन म.प्रा. व न.र.अधिनियम १९६६ व भूसंपादन कायदा २०१३ यांचा एकत्रित वापर करुन मा.जिल्हाधिकारी, अहमदनगर यांचे मार्फत संपादीत करता येईल. अशा पध्दतीने जमिनीचे संपादन करतांना २५% अतिरिक्त मोबदला देण्याची आवश्यकता सते तरी असे अनिवार्य भूसंपादन करण्यास मोठा कालावधी लागु शकतो तसेच शासनाचे प्रशासकीय शुल्क भरणे आवश्यक असते.

म.न.पा.च्या नगर रचना विभागात विकास भाराच्या (Development Charge) माध्यमातुन जो निधी जमा होतो तो निधी विकास योजनेतील प्रस्तावाच्या भूसंपादनासाठीच ७५% व त्यांचे बांधकामासाठी २५% खर्च करणे शासनाने अनिवार्य केले आहे. त्यामुळे हा उपलब्ध भुसंपादनासाठीचा शिल्लक असलेला निधी आवश्यकतेप्रमाणे या प्रस्तावासाठी वापरता येणे शक्य आहे. सध्या या शिर्षाखाली सुमारे रु.१२.०० कोटी इतका निधी शिल्लक आहे.

सबब प्रस्तुत प्रकरणात खालील प्रमाणे कार्यवाही / कार्यपध्दती वापरणे योग्य होईल.

१) म.प्रा. व न.र. अधिनियम १९६६ च्या कलम १२६ (१)(ब) प्रमाणे भूसंपादन करण्याचा मा.आयुक्त यांनी पुन्हा प्रयत्न करणे योग्य होईल.

२) कलम १२६ (१)(ब) अन्वये भूसंपादन शक्य नसल्यास किंवा विलंब होणार असल्यास सदरचे भूसंपादन कलम १२६ (१)(अ) प्रमाणे संमती दर्शक कराराने (Agreement) करणे योग्य होईल.

३) उपरोक्त दोन्ही शक्यता पडताळून झाल्यानंतर सदरचा भूसंपादन प्रस्ताव कलम १२६ (१)(क) अन्वये मा.जिल्हाधिकारी यांना सादर करणे योग्य होईल.

वरिल प्रमाणे कार्यपध्दती अनुसरुन विषयांकित जमिन भूसंपादन करण्यास जमिनीच्या मूल्यांकनास व त्याकामी येणा-या खर्चास मंजुरी मिळणेसाठी सदर प्रस्ताव मा.महासभेत सादर करणे योग्य होईल. तथापि आदेशार्थ .

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, उक्त प्रस्ताव पुढील निर्णयास मा.महासभेपुढे सादर करावा.

**---*---**

**चर्चा :-**

चालू बाजार भावानुसार मालक निहाय खाजगी वाटाघाटी करुन या व्यतिरिक्त जागा कोणाची घ्यायची असेल तर तीही कार्यवाही करण्यांत यावी.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** सदर प्रकल्पासाठी ताब्यात घेण्यांत येणा-या जमिनीसाठी आणखी रोख रक्कमेची आवश्यकता असल्यास याकरीता रक्कमेची तरतुद करण्यांत यावी.

**मा.महापौर साहेब :-** आरक्षण क्रमांक २१६ अ (सार्वजनिक सुविधा) या आरक्षणाखालील क्षेत्र महानगरपालिकेच्या महत्वाकांक्षी अमृत योजनेच्या उपांगासाठी प्रस्तावित केलेले आहे. योजनेच्या पुर्णत्वासाठी ते संपादन करुन विकसीत करणे आवश्यक आहे. त्यासाठी यापुर्वी महासभेने संपादनाची कार्यवाही करण्यासाठी मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार सदर जमीन संपादनासाठी संबंधित जमिन मालकांना टीडीआर च्या मोबदल्यात जागा देणे बाबत प्रस्ताव देण्यात येवून पाठपुरावा करण्यांत आलेला आहे. यापैकी फक्त बोठे पाटील यांचे टीडीआर अंतर्गत भूसंपादन करण्यांत आलेले आहे. उर्वरीत जमिन मालकांनी मोबदला रक्कमेची मागणी केलेली आहे. तेंव्हा अमृत योजना ही विहित कालमर्यादेतमध्ये पूर्ण करणे अत्यावश्यक असल्याने सदर जमीन तातडीने संपादन करणेच्या

अनुषंगाने चालू बाजार भाव मूल्य तक्त्यानुसार व अंमलबजावणी सुचनेनुसार मालक निहाय शासकीय दराने मूल्यांकन ठरवुन खाजगी वाटाघाटीने संपादन करुन घेण्यास महासभा मान्यता देत आहे.

**---*---**

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट व महासभेत झालेली चर्चा पाहता अहमदनगर महानगरपालिका हद्दीतील आरक्षण क्रमांक २१६ अ (सार्वजनिक सुविधा) या आरक्षणाखालील क्षेत्र महानगरपालिकेच्या महत्वाकांक्षी अमृत योजनेच्या उपांगासाठी प्रस्तावित केलेले आहे. योजनेच्या पुर्णत्वासाठी ते संपादन करुन विकसीत करणे आवश्यक आहे. त्यासाठी यापुर्वी महासभेने संपादनाची कार्यवाही करण्यासाठी मंजूरी दिलेली आहे. त्यानुसार सदर जमीन संपादनासाठी संबंधित जमिन मालकांना टीडीआर च्या मोबदल्यात जागा देणे बाबत प्रस्ताव देण्यात येवून पाठपुरावा करण्यांत आलेला आहे. यापैकी फक्त बोठे पाटील यांचे टीडीआर अंतर्गत भूसंपादन करण्यांत आलेले आहे. उर्वरीत जमिन मालकांनी मोबदला रक्कमेची मागणी केलेली आहे. तेंव्हा अमृत योजना ही विहित कालमर्यादेतमध्ये पूर्ण करणे अत्यावश्यक असल्याने सदर जमीन तातडीने संपादन करणेच्या अनुषंगाने चालू बाजार भाव मूल्य तक्त्यानुसार व अंमलबजावणी सुचनेनुसार मालक निहाय शासकीय दराने मूल्यांकन ठरवुन खाजगी वाटाघाटीने संपादन करण्यांत यावी. व संपादीत करण्यांत येणा-या जागेसाठी आणखी रक्कमेची आवश्यकता भासल्यास तशी तरतुद करण्यांत यावी यास ही सभा मान्यता देत आहे. नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही प्रशासनाने करावी.

सुचक : मा.श्री.स्वप्नील रोहीदास शिंदे,

अनुमोदक : मा.श्री.संपत विजय बारस्कर,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १३** **दिनांक : २९ / ०७ /२०२०.**

---

**प्रस्तावाचा विषय :** नगररचना योजना क्र.४, अंतिम भुखंड क्र.२६७ या जागेच्या मंजुर रेखांकना मधील खुली जागा क्षेत्र १३४१.५१ चौ.मी. या जागेवर वाचनालय विकसित करणेसाठी अहमदनगर जिल्हा वाचनालयास परवानगी देणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- श्री.शिरीष मोडक, अध्यक्ष, अहमदनगर जिल्हा वाचनालय यांचा दिनांक १६/०७/२०२० रोजीचा अर्ज.

विषयांकित प्रकरणी संदर्भीय अर्जान्वये अहमदनगर जिल्हा वाचनालय यांनी नगररचना योजना क्रमांक ४, अंतिम भुखंड क्रमांक २६७ या जमिनीच्या मंजुर रेखांकनातील खुली जागा वाचनालय या वापरासाठी विकसीत करणेस परवानगी मिळणे बाबत विनंती अर्ज केलेला आहे. त्या अनुषंगाने या कार्यालयाचे अभिप्राय खालील प्रमाणे सादर करीत आहे.

१) विषयांकित अंतिम भुखंड क्रमांक २६७ या जमिनीच्या मंजुर रेखांकनातील खुली जागा क्षेत्र २३४१.५१ चौ.मी. ही महानगरपालिकेच्या मालकीची आहे. (सोबत सिटी सर्व्हे उतारा जोडलेला आहे)

२) महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने दिनांक २०/०९/२०१६ रोजीच्या अधिसुचनेव्दारे अहमदनगर महानगरपालिकेसाठी (ड वर्ग मनपा) विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली मंजुर व लागु केलेली आहे. सदरहु नियमावलीतील नियम क्रमांक २४.३.२ मध्ये खालील तरतुदी समाविष्ट आहेत.

A) On sanction of the development permission, recreational open space shall deem to have vested in the society/association of the residents/occupants. In case such society or association is to be formed, the possession/society is formed. In case group housing scheme, if the developer/owner intend to develop such open space for bonfide use of resident, then the Commissioner may allow the same while granting the development permission. The recreational open space shall not be sold/leased out to any other person and it shall not be put to any other user except for the common use of residents/occupants.

B) If the Municipal Commissioner is convinced that there is misuse of open space: in such case the Municipal Commissioner shall take over the land of recreational open space.

३) उक्त नियमावलीतील नियम क्रमांक २४.३.८ नुसार मंजुर रेखांकनातील खुल्या जागेत वाचनालय हा वापर अनुज्ञेय आहे.

म्हणजेच मंजुर रेखांकनातील खुली जागा ही त्याच रेखांकनातील भुखंडधारकांसाठी असुन ती इतर कोणासही विक्रीने अथवा भाड्याने देता येणार नाही. तसेच ती त्याच रेखांकनातील भुखंड धारकांच्या सामाईक वापरासाठीच ठेवणे आवश्यक आहे.

सबब खालील अटींच्या अधिन राहुन अहमदनगर नगररचना योजना क्र.४, अंतिम भुखंड क्र.२६७ या जमिनीच्या मंजुर रेखांकनातील म.न.पा.मालकीची खुली जागा (क्षेत्र १३४१.५१ चौ.मी.) वाचनालयासाठी विकसित करणेस परवानगी देण्यात येत आहे.

अटी :- १) प्रचलित विकास नियंत्रण नियमावली नुसार खुल्या भुखंडाच्या क्षेत्राच्या १५ टक्के इतके बांधकाम अनुज्ञेय आहे. तथापि ते तळमजला १० टक्के व पहिला मजला ५ टक्के या प्रमाणे बांधता येईल परंतु सदर बांधकाम करणेपुर्वी त्यास महानगरपालिकेची पुर्व परवानगी घेणे आवश्यक राहील. ही परवानगी संस्थेच्या नावाने मिळणार नाही. ही परवानगी फक्त भुखंडधारकांच्या नावे व सर्व भुखंडधारकांची स्वाक्षरी नकाशावर घेतल्या नंतर देण्यांत येईल.

२) सदर जागेचा वापर रेखांकनातील भुखंडधारकांच्या समाईक वापरासाठी करणे आवश्यक आहे. तीचा कोणत्याही वाणिज्य प्रयोजनासाठी वापर करता येणार नाही.

३) सदर जागेचा नियमबाह्य अथवा गैरवापर झाल्याचे निदर्शनास आल्यास सदर दिलेली विकसन परवानगी रद्द करुन खुली जागा महानगरपालिकेच्या ताब्यात घेण्यात येईल.

४) भुखंडधारकांनी हरकत घेतल्यास सदरची परवानगी रद्द समजण्यात येईल.

वर नमुद अटींवर अर्जदार संस्थेस मंजूर रेखांकनातील खुली जागा वाचनालय या वापरासाठी विकसित करणेसाठी देणे बाबतचा प्रस्ताव पुढील मंजुरीसाठी मा.महासभेपुढे सादर करणे बाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, उपरोक्त आदेशानुसार.

---*---

**चर्चा :-**

**मा.श्री.भैय्या गंधे :-** अहमदनगर जिल्हा वाचनालयाचा अर्ज आहे त्यांना जागा द्यावी. तिथे जर जागा दिली तर वाचकांची सोय होईल. आमच्या प्रभागामधील सिव्हील हडकोतील नाला सुशोभिकरण करणे बाबत निर्णय घेण्यात यावा.

**मा.महापौर साहेब :-** ठीक आहे. वाचनालयाला जागा देणार आहोत. अजुन काही नाले असतील पाईपलाईन हडको व तुमचे हद्दीतील नाला याचा समावेश करण्यांत यावा.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** वाचनालयाला जागा दिली ती कुठे आहे. सावेडी भागात कुठे आहे.

**मा.महापौर साहेब :-** सावेडी भागात आहे.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** गंगा उद्यानाकडे जाणारा मिस्कीन मळयाची बिल्डींगच्या मागच्या लेआउट मधील ओपन स्पेस आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** ले आउट धारकांची अगोदर संमती घ्यावी. त्यानंतर मंजूरी देण्यांत यावी.

**नगररचनाकार श्री.चारठाणकर :-** मंजूरी देतांना त्यामध्ये लेआउट मधील प्लॉट धारकांची संमती लागणार आहे. अटी व शर्ती मध्ये या अटीचा समावेश करण्यांत येईल. मालकी आपल्याकडे आहे. सोसायटी स्थापन झालेली नाही. त्यामुळे आपली मालकी आहे.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** ले आउट धारकांची अगोदर संमती घ्यावी. त्यानंतर मंजूरी देण्यांत यावी.

**मा.महापौर साहेब :-** ठीक आहे तुमच्या म्हणण्या प्रमाणे ले आउट धारकांची संमती घेण्यात येईल.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** एक वॉर्डातील महिला तिला कुत्र्याने चावा घेतला तिचा फोटो आयुक्त साहेब, पी.ए. श्री.देशपांडे यांचेकडे टाकले. बोरगेंना फोन केला तर ते म्हणाले मी कोव्हीडच्या कामात आहे. जखमी व्हायचे प्रमाणे जास्त झाले. याची जबाबदारी कोणत्या अधिका-यावर फिक्स करणार. कोवीड सोबत मोकाट कुत्रे, मोकाट जनावरांचा विषय असेल, सागर हॉटेल जवळ एका माणसाचा मृत्यू झाला. एखादा अधिकारी त्याच्यावर नेमुन भटकी कुत्रे, पिसाळलेल्या कुत्र्यांचा बंदोबस्त करणेची कार्यवाही करण्यांत यावी.

**मा.महापौर साहेब :-** महत्वाचा विषय २ लोकांना जीव गमवावा लागला आहे. तात्पुरत्या स्वरुपात तात्काळ काही करता येईल का यावर आयुक्तांनी कारवाई करावी.

**मा.श्री.कुमार वाकळे :-** मनपा हद्दीत कोवीड रुग्ण आढळला तर त्यांना ॲडमीटची करण्याची जबाबदारी कोणाची. नागरिक सर्वप्रथम आम्हाला फोन करतात. यासाठी अशा लोकांचे नंबर आम्हाला द्यावे जेणेकरुन असे पेशंट ॲडमीट करतांना अडचणी येणार नाहीत.

सर्व प्रथम नगरसेवकांना पेशंटचे नातेवाईक फोन करतात. त्यानंतर आम्ही कोणाला फोन करायचे.

**मा.आयुक्त साहेब :-** मलासुध्दा फोन येतात. आपल्याकडे सर्व मेडीकल ऑफिसर यांना ट्रेसिंग करणेच्या सूचना दिलेल्या आहेत. टेस्ट नंतर रिपोर्ट जर पॉझिटीव्ह आला तर त्या व्यक्तीचा शोध घेवून जेथे बेड उपलब्ध असेल त्या ठिकाणी ॲडमीट होणे बाबत सांगण्यांत येते. त्याकरीता ॲम्ब्युलन्सची सोय महानगरपालिकेने केली आहे.

**मा.श्री.सचिन शिंदे :-** कोवीड-१९ पेशंटकरीता २ ॲम्ब्युलन्स आहेत. त्यांची संख्या वाढविण्यांत यावी. कल्याण रोड वरील पाण्याच्या प्रश्ना बाबत मागच्या महासभेत विषय झाला होता. ८ दिवसात या भागात पाणी येते त्याबाबत महासभा लावू असे महापौर यांनी सांगीतले. वर्षात फक्त ४५ दिवस पाणी येते आम्ही पूर्ण वर्षाची पाणीपट्टी भरतो. मी मागच्या वेळेस सांगीतले होते मग काय झाले त्याचे १५०० ऐवजी ७५० पाणीपट्टी आकारणी करावी. टाकीचा उपयोग काय. ६ दिवस टाक्या भरत नाही. मी दहावेळा पत्र दिले.

**मा.आयुक्त साहेब :-** माणूस उद्या तपासायला पाठवतो. पाणीपुरवठयातला वॉलमन फिटर यांची मिटींग बोलावतो त्यात काय सुधारणा करता येईल. आपल्याला काय सुधारणा करता येतील तुम्ही सांगा त्या पध्दतीने बैठक लावतो.

**मा.श्री.सचिन शिंदे :-** आम्हाला नगरसेवक म्हणायची लाज वाटते. आम्ही नागरिकांसमोर कसे जायचे प्रत्येक लेआउटला मंजूरी देता आपत्कालीन मधुन २ गटारींचा विषय मार्गी लावायला सांगीतले वर्षवर्ष चेंबर सुध्दा रिपेअर व्हायला वर्ष झाले आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** कल्याण रोडच्या त्या कॉलनी मध्ये ड्रेनेज लाईन करण्याकरीता आपत्कालीन मधुन कुठला घ्यायचा ते पाहणी करुन सूचवा ते ठरवू.

**मा.श्री.सचिन शिंदे :-** इंजिनियर पारखी आम्हाला नको. त्यांचा राजीनामा घ्या. पाणी पुरवठयाला कर्मचारी नाहीत. कल्याण रोडच्या २ भुयारी गटारी गटार योजना करुन द्या.

**मा.आयुक्त साहेब :-** शॉर्टटर्म मध्ये कोणते काम करायचे व लॉगटर्म मध्ये कोणते करायचे. या कामाची लिस्ट करु व या आठवडयात महापौरांसोबत बैठक लावू. जी कामे तात्काळ करावयाची ती कामे मार्गी लावू.

**मा.महापौर साहेब :-** पाईप टाकण्यासाठी भरपूर निधी दिला. एकेक प्रश्न सोडवू तो भाग खाली आहे. पाईप टाकायचे काम आठ-पंधरा दिवसात करु.

**मा.श्री.सचिन शिंदे :-** कल्याण रोड साठी किती दिवसात पाणी देणार याबाबत आम्हाला सांगा.

**मा.महापौर साहेब :-** अमृत योजनेचे काम जलद गतीने चालू आहे. आयुक्त आपण पाहणी करु. पाण्या संदर्भात परत एकदा बैठक लावू.

**मा.श्री.सचिन शिंदे :-** किती दिवसात मार्गी लावणार ते सांगा. पहिल्या महिन्यात काम सुरु करा.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** महानगरपालिकेने जे कोव्हीड-१९ सेंटर उभारले तेथे तपासणी साठी गेल्यानंतर तेथील रिपोर्ट मिळण्यासाठी ५-६ दिवस लागतात. पुण्यासारख्या ठिकाणी २४ तासात रिपोर्ट येतात. आणखी एक लॅब तयार करावी. कोवीड मधुन निधी वापरणेत यावा. अजुन दोन ॲम्ब्युलन्स वाढवल्या तर लवकरात लवकर पेशंट हॉस्पीटलला पोहोचतील.

**मा.महापौर साहेब :-** आयुक्त साहेब बोलतील.

**मा.आयुक्त साहेब :-** चालेल. कोवीड साठी हेड डॉ.बोरगे सांगू शकतील.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** जेथे पेशंट सापडतील तेथे औषध फवारणी करणे गरजेचे आहे. परंतु त्या ठिकाणी औषध फवारणी करण्यांत येत नाही.

**मा.महापौर साहेब :-** संपूर्ण शहरात फवारणी करणे गरजेचे आहे. प्रत्येक भागात पेशंट सापडले आहेत. फवारणी करायचे लगेच सांगू.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** एक दिवसात रिपोर्ट कसे येतील याची व्यवस्था महानगरपालिकेने करावी.

**मा.महापौर साहेब :-** लवकरात लवकर करण्यांत येईल.

**मा.सौ.सुरेखा कदम :-** वाचनालयासाठीचा विषय चांगला आहे. आपण हा विषय मान्य करावा. सावेडी भागात चांगले वाचनालय उभे राहील व ज्येष्ठ नागरिकांना याचा लाभ घेता येईल.

**मा.आयुक्त साहेब :-** भटकी कुत्रे बंदोबस्तची फाईल पुटअप झाली. कुत्रे निर्बीजीकरणाची फाईल मंजूर केली आहे. पिंपळगांव माळवी येथील सेंटरवर पाणी पुरवठा मार्फत पाण्याची टाकी वगैरे काम करुन द्यायला सांगीतले. नजीकच्या काळात काम चालू होईल. कुत्रे पकडण्यासाठी टीमला आदेश देवू.

**मा.श्री.गणेश भोसले :-** दोन दिवसात प्रश्न मार्गी लावा अन्यथा आम्ही सर्व नगरसेवक आपल्या दालनात येवून बसतील.

**मा.आयुक्त साहेब :-** ॲम्ब्युलन्स वाढवण्यात येईल. आजपर्यंत अशी तक्रार आलेली नाही. आता परत दोन ॲम्ब्युलन्सची व्यवस्था करतो. पेशंट सापडल्यानंतर फवारणी करण्यात येते. पुर्वी पेशंटची संख्या कमी असल्याने त्या परिसरात तात्काळ फवारणी करण्यांत येत होती. परंतु आता शहरात मोठया संख्येने रुग्ण आढळून येतात. त्यामुळे फवारणी करणेस विलंब होतो. ज्या ठिकाणी पेशंट आढळला त्या ठिकाणचे संपर्कातील आजुबाजुचे नागरिकांचा शोध घेवून त्यांचे अलगीकरण करण्यांत येते. जादा पेशंट जर सापडले तर त्याठिकाणी कंटेन्मेंट झोन करण्यांत येतो. पुर्वी सिव्हील हॉस्पीटल मध्ये रुग्णांचे स्वॅब घेण्यांत येत होते. जिल्हा प्रशासन यांनी महानगरपालिकेने कोव्हीड सेंटर चालू करणे बाबत सूचना केली त्यानुसार आता महानगरपालिकेच्या वतीने रामकरण सारडा विद्यार्थी वस्तीगृह येथे स्वॅब घेण्यांत येतात त्याचे दुस-या दिवशी रिपोर्ट येतात. या दरम्यान ३-४ दिवसांचा कालावधी गेल्याने रिपोर्ट मिळण्यास उशीर होत होता. आणखी एखादे केंद्र वाढवावे लागले तर तेही करु.

**मा.श्री.मनोज दुलम :-** माझ्या प्रभागात वैदू समाजाचे लोक आहेत. त्यांना कुत्रे पकडण्याचे काम देण्यांत यावे. यापुर्वी त्यांनी महानगरपालिकेत हे काम केले आहे.

**मा.महापौर साहेब :-** विषय मंजूर करीत आहोत. तात्पुरत्या स्वरुपात काम दिल तर मार्गी लागतील ठिक आहे.

**---*---**

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट व महासभेत झालेली चर्चा नगरसेवक मा.श्री.महेंद्र (भैय्या) मोहनीराज गंधे, नगरसेविका मा.सौ.मीना चोपडा यांनी केलेल्या सुचनेनुसार नगरसेवक मा.श्री.मनोज लक्ष्मण दुलम, सभागृह नेता मा.श्री.स्वप्नील रोहीदास शिंदे, नगरसेविका मा.सौ.ज्योती अमोल गाडे व मा.श्रीमती.शोभा बोरकर यांनी दिलेल्या अनुमोदनानुसार नगररचना योजना क्र.४, अंतिम भुखंड क्र.२६७ या जागेच्या मंजुर रेखांकना मधील खुली जागा क्षेत्र १३४१.५१ चौ.मी. या जागेवर वाचनालय विकसित करणेसाठी अहमदनगर जिल्हा वाचनालयास परवानगी देणे बाबतच्या प्रस्तावास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही प्रशासनाने करावी.

सुचक : मा. श्री.महेंद्र (भैय्या) मोहनीराज गंधे
अनुमोदक : मा.श्री.मनोज लक्ष्मण दुलम
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १४** **दिनांक : २९ / ०७ /२०२०.**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधुन वाहणा-या सिना नदी व मुख्य नाल्याची पुररेषा विकास योजना आराखड्यावर अंतर्भुत करुन त्याची अंमलबजावणी करणे बाबत.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ- कार्यकारी अभियंता,कुकडी पाटबंधारे विभाग क्र.२ श्रीगोंदा , जि. अहमदनगर यांचेकडील पत्र क्र. कुपावि-२ /प्र.शा-१ ४१०२/सन २०१९ दिनांक ३०/११/२०१९

विषयांकित प्रकरणी संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने सविस्तर अहवाल खालीलप्रमाणे..

१) उपरोक्त संदर्भिय पत्रान्वये मा. कार्यकारी अभियंता, कुकडी पाठबंधारे विभाग-२ यांनी अहमदनगर शहरातुन वाहणा-या सिनानदीसह इतर काही मोठया नाल्याच्या पुररेषा निश्चित करून त्याची आखणी दर्शविलेले नकाशे पाठविलेले आहे.

२) सदर नकाशामध्ये दोन प्रकारच्या पुररेषा दर्शविण्यात आलेल्या आहेत. (२५ वर्षाची वारंवारीता निळी व १०० वर्षाची वारंवारीता लाल पुररेषा) यापैकी निळी रेषा ही संबंधित रेषा ही मोठया पुरा संबंधीत (महापुर) दर्शविणारी आहे.

३) अहमदनगर महानगरपालिकेसाठी लागू असलेल्या विकास नियत्रंण व प्रोत्साहन नियमावतील नियम क्र.२२.३ अन्वये निळया रेषाच्या आत व लाल रेषा व निळया रेषेच्या मधल्या भागात अनुज्ञेय करावयाच्या विकासासंबंधी नमुद करणेत आलेले आहे. सोबत प्रत जोडलेली आहे. मंजुर विकास योजनेत उपरोक्त नमुद निळी व लाल पुररेषा अंतर्भुत केल्यानंतर या पुररेषेप्रमाणे विकास नियंत्रण व पुररेषेबाबत करावयाची आवश्यक ती कार्यवाही करता येणार आहे.

४) येथे नमुद करणेत येते की, पाटबंधारे विभागाने संदर्भिय पत्रान्वये फक्त नकाशे महानगरपालिकेस पाठविलेले आहेत. मात्र प्रत्यक्ष जागेवर या पुररेषेच्या खुणा किंवा अन्य माहिती संबंधीत विभागाने महानगरपालिकेस दिलेली नाही.

५) उपरोक्त नमुद पुररेषा मंजुर विकास योजनेत अंतर्भुत करणेसाठी व अंमलबजावणी होणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ३७(१) अन्वये योग्य ती वैधानिक कार्यवाही पुर्ण करणे आवश्यक आहे. यातील पहिला टप्पा म्हणजे पाटबंधारे विभागाने पुरविलेल्या पुरेषे संबंधीचे नकाशे मंजुर विकास आराखडयात दर्शवुन घेणे आवश्यक आहे. असे वाटते या पुररेषा वेडयावाकडया वळनाच्या असल्याने त्या जशासतश्या विकास योजना आराखडयात दर्शविणे किचकट व आव्हानात्मक काम होते तांत्रीक कर्मचा-यांची कमतरता, मध्यंतरीच्या काळातील लॉग डान मुळे बंद आसणारी कार्यालये या व अशा प्रकारच्या अन्य कारणामुळे या कामास काहीसा विलंब झालेला आहे. मात्र आता हे संपुर्ण काम पुर्ण झालेले आहे.

६) महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ मधील कलम ३७ नुसार आता ही पुररेषा मंजुर विकास योजनेत अंतर्भुत करणेसाठी व नमुद नकाशासह हा प्रस्ताव प्राथमिक व येणा-या खर्चास मंजुरीसाठी मा. महासभेस सादर करणे आवश्यक आहे.

सबब सदर प्रस्ताव मा.महासभेपुढे सादर करणे योग्य होईल आदेशार्थ सादर.

**चर्चा :-**

**मा.सौ.आशाताई कराळे :-** सिनानदी व मुख्य नाल्यांची पुररेषा विकास योजना आराखडयावर अंतर्भुत करुन त्याची अंमलबजावणी केल्यास यामध्ये बरेच नागरिकांची नुकसान होण्याची शक्यता नाकारता येत नाही. याकरीता पुररेषा निश्चीत करतांना पुन्हा एकदा पाहणी करुन निर्णय घ्यावा.

**मा.महापौर साहेब :-** पूर नियंत्रण रेषे संदर्भात करण्यांत आलेल्या तक्रारी अनिश्चित आहेत. संबंधित अधिकारी यांचे समवेत प्रत्यक्ष पाहणी करुनच तक्रारी सोडविण्यात येतील. या संदर्भात मा.सदस्यांनी मागणी केल्यानुसार मी स्वतः व संबंधित अधिकारी यांचेसह सदर ठिकाणी समक्ष पाहणी करुन योग्य तो निर्णय घेण्याबाबत कार्यवाही करण्यात येईल.

**मा.श्री.राहुल कांबळे :-** अंगणवाडी समोर ड्रेनेज लाईनचे पाणी जमा होते या कामाला निधी मंजूर व्हावा. लोकांच्या तक्रारी येतात. लहान मुलांच्या जीवालाधोका झाला आहे. चिकनगुणीयाची साथ आलेली आहे. यावर काही उपाययोजना करावी.

**मा.महापौर साहेब :-** निंबाळकर पाहणी करतील मी त्यांना सांगतो.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** सरकारने सर्व महानगरपालिकांना ॲन्टीजेनकिट, टेस्ट दिले ते किट आपल्या महानगरपालिकेकडे आल्या का. बाहेरच्या महानगरपालिकेला २० हजार किट आल्या. राज्य सरकारला जाब विचारता येईल.

**मा.महापौर साहेब :-** वैद्यकीय आरोग्य अधिकारी माहिती देतील. संबंधितांना विचारुन माहिती द्यायला सांगतो.

**मा.श्री.मनोज कोतकर :-** जे पेशंट पॉझीटीव्ह आहे ते दिवसभर बाहेर बसतात. तंत्रनिकेतन जवळ दिवसभर बसुन राहीले.

**मा.महापौर साहेब :-** माहिती संबंधित अधिकारी यांना द्यायला सागतो.

**मा.सौ.सुवर्णा गनप्पा :-** प्रभाग क्रमांक १३ मध्ये श्रीपाद ग्रंथ भांडार या रस्त्यावर चालणे मुश्कील झाले आहे, एकदा आपण व उपायुक्त यांनी पाहणी करावी. कोव्हीड साठी उपाययोजना करणे, फवारणी करणे, सोशल डिस्टंसींग जनजागृती करणे, जागृती फ्लॅक्स चौका-चौकात लावणे. कै.बा.दे.दवाखाना येथे गरोदर मातांना मार्गदर्शन करणे गरजेचे आहे. चितळे रोड वरील भाजी बाजार आत बसविण्यांत यावा.

**मा.महापौर साहेब :-** उद्या आपल्या भागात पाहणी करु. भाजी मार्केट आतमध्ये बसण्याबाबत लगेच सूचना देतो.

**मा.सौ.गौरी नन्नवरे :-** सीना नदी व मुख्य नाल्याचे पुरनियंत्रण नागरिकांचे नुकसान होणार नाही याची खबरदारी घ्यावी.

**मा.महापौर साहेब :-** समक्ष पाहणी संबंधीत अधिका-यांना घेवून करु.

**---*---**

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट व महासभेत झालेली चर्चा पाहता अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधुन वाहणा-या सिना नदी व मुख्य नाल्याची पुररेषा विकास योजना आराखड्यावर अंतर्भुत करुन त्याची अंमलबजावणी करणे संदर्भात ब-याच सदस्यांनी तक्रारी केलेल्या आहेत. याबाबत मी स्वतः व संबंधित अधिकारी यांचेसह सदर ठिकाणी समक्ष पाहणी करुन योग्य तो निर्णय घेण्यात येईल. त्याप्रमाणे प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही प्रशासनाने करावी.

सुचक : मा.सौ.आशा शिवाजीराव कराळे,
अनुमोदक : मा.श्री.रविंद्र रावसाहेब बारस्कर,
ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १५** **दिनांक : २९ / ०७ /२०२०.**

---

**प्रस्तावाचा विषय :** अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधील सिना नदीमध्ये जाणा-या सात नाल्यांचे (Restoration) जिर्णोध्दार करणे करीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करणे बाबत..

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- १) Manual for Procirement of consultancy and other servces.- २०१७ (Ministry of Finance, Department of Expenditure) Chapter-३.

२) मा.महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र. : संकिर्ण -२०१८/प्र.क्र.५४/ नवि-१६ दिनांक ०४ जुन २०१८.

३) मा.राष्ट्रीय हरीत लवाद यांचे दावा क्रमांक :- ११०/ २०१५ (WZ) बाबत दिनांक १५/०७/२०२० रोजी देण्यांत आलेले आदेश.

४) मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचेकडेस प्रकल्प विभाग जा.क्र.५० दिनांक १६/०७/२०२० अन्वयेचे पत्र.

उपरोक्त संदर्भांकित विषयाबाबत सादर करण्यात येते की, अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधुन सिना नदी वाहत असुन शहर हद्दीमधुन वाहणा-या नदीची लांबी १४ किलोमीटर इतकी आहे. सद्यस्थितीत उपनगरामधील सेप्टीकटँकला जोडण्यात आलेले नागरिकांचे वैयक्तीक शौचालयाचे आउटलेट मधील ओव्हरफ्लो ड्रेनेज लाईन मार्फत उपनगरातील नाल्यांना जोडण्यांत आलेल्याचे आढळून आले आहे. सदरचे नाले शहरातुन वाहणा-या सिनानदीला जावुन मिळतात व त्यामुळे सिनानदी प्रदुषीत होत आहे.

मा.राष्ट्रीय हरीत लवाद यांनी दिनांक १५/०७/२०२० रोजी अहमदनगर महानगरपालिकेस दिलेल्या आदेशान्वये नदीमध्ये कुठल्याही प्रकारचे सिवेज अथवा प्रक्रीया न केलेले पाणी सोडण्याबाबत प्रतिबंधीत केले आहे. राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी अनुसंधान संस्थान, नागपुर (NEERI) या केंद्र शासनाच्या संस्थेमार्फत In-situ Nallah water Treatment Technology बाबत M/S Emergy Envio Private limited या संस्थेशी करारनामा केला असुन सदर एजन्सीस दिनांक ६ सप्टेंबर २०२४ पर्यंत सदरचे तंत्रज्ञान अधिकृत परवाना धारक (authorised licensee) म्हणुन नेमणुक केली आहे. त्या अनुषंगाने M/S Emergy Envio Private limited यांनी दिनांक २६/०६/२०२० रोजी मनपाकडेस Google Meet व्दारे ऑनलाईन Virtual Presentation (आभासी सादरीकरण) देण्यात आले. तद्नंतर मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचेकडेस संदर्भ क्र.४ अन्वये शहरातील सात नाल्यांवर प्रक्रियाबाबत पत्र देण्यांत आले.

त्या अनुषंगाने सदर एजन्सी मार्फत शहरातील खालील प्रमाणे सात नाल्यांचे सर्वेक्षण करण्यांत आले.

| अ.क्र. | नाल्यांचे नांव |
|---|---|
| १ | सावेडी गावठाण येथील नाला |
| २ | बालिकाश्रम रोड वरील चिंतामणी हॉस्पीटल जवळील नाला |
| ३ | बालिकाश्रम रोड वरील सुडके मळयाजवळील नाला |
| ४ | अमरधाम जवळील नाला |
| ५ | आयुर्वेद हॉस्पीटलच्या मागील बाजूस काटवण खंडोबामंदीर रोडकडे जाणारा नाला |
| ६ | आगरकर मळयाजवळील खोकर नाला |
| ७ | बुरुडगांव रोड वरील भिंगार नाला |

त्यानुसार वरील प्रमाणे नाल्यांमध्ये मिश्रीत होणारे अशुध्द जल व त्याचे प्रमाण बाबत ढोबळ सर्वेक्षण करण्यांत आले. सदर बाबत सविस्तर सर्वेक्षण करुन सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करुन महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचेकडेस सादर करणे आवश्यक आहे. वरील प्रकल्पाकरीता अहमदनगर महानगरपालिकेस महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचेकडुन १००% अनुदान प्राप्त होणार आहे. (प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचे खर्चासह). याबाबत मा.आयुक्त यांची मा.सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचेशी भ्रमणध्वनीवर समक्ष चर्चा झाली असुन त्यानुसार संदर्भ क्र.४ अन्वये पत्र देण्यात आलेले आहे. त्यानुसार अहमदनगर महानगरपालिकेमार्फत शहरातील नाल्यांचे (Restoration) जिर्णोध्दार करणे करीता महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचेकडेस सविस्तर प्रकल्प अहवाल सादर करणे आवश्यक आहे. सदरचे काम हे वैशिष्टये पुर्ण असल्यामुळे या कामासाठी अशा कामाचा अनुभव असलेल्या एजन्सीस प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नियुक्त करणे आवश्यक आहे. प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांचा कामाचा वाव खालील प्रमाणे असेल.

| **अ.क्र.** | **तपशिल** |
|---|---|
| १ | शहरातील वरील प्रमाणे सात नाल्यांचे सर्वेक्षण करणे व प्रवाह गणना (Flow Caculations) करणे. |
| २ | Nallah Stretch identification करणे. |
| ३ | सविस्तर अंदाजपत्रक व DPR तयार करणे |
| ४ | DPR मा.शासनाच्या सक्षम प्राधिकरणाकडे मंजुरीसाठी सादर करणे व प्रकल्पासाठी अनुदान प्राप्त करुन घेणे करीता पाठपुरावा करणे. |
| ५ | मा.शासनाकडून अनुदान प्राप्त झाल्यानंतर प्रत्यक्ष प्रकल्प विकसित करणे करीता खाजगी एजन्सीची नियुक्ती साठी ई-निविदा तयार करणे व ई-निविदा प्राप्त झाल्यानंतर त्याचे तांत्रिक मुल्यांकन करणे. |
| ६ | पकल्प विकसित करणे करीता एजन्सी नियुक्ती नंतर सुपरव्हीजन करणे. |

त्यानुसार मा.वित्त विभागाचे Manial for Procirement of consiltancy and other servces.-२०१७ (Ministry of Finance, Department of Expenditure) Chapter-३ मध्ये एखाद्या वैशिष्टयेपुर्ण कामाकरीता Direct Selection (Single Soirce Selection) व्दारे एजन्सीची नियुक्ती करणे बाबत तरतुद नमुद आहे. यामध्ये Chapter-३ (३.१०) मधील मुद्दा क्र.१ ते ५ मध्ये अशा प्रकारच्या कौशल्य प्राप्त असलेल्या एजन्सीची नियुक्ती करता येईल त्याकरीता सक्षम प्राधिकरणाची मंजुरी आवश्यक आहे. मनपा स्तरावर मा.महासभेची मंजुरी घेणे अपेक्षित आहे.

मा.महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग शासन निर्णय क्र.: संकिर्ण - २०१८/प्र.क्र.५४/नवि-१६ दिनांक ०४ जुन २०१८ अन्वये प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्ती बाबत टप्पे विहित केले आहेत.

| अ.क्र. | प्रकल्पाच्या/कामाच्या प्रगतीचा टप्पा | नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेने प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्काचे प्रदानाचे प्रमाण (पकल्प किंमतीचा प्रमाणात) इतर सर्व कामांसाठी |
|---|---|---|
| १ | प्रकल्पाचे प्रशासकीय मान्यतेचे आदेश निर्गमित झाल्यानंतर | ०.५०(डिपीआर ०.३३ + प्रमा-०.१७%) |
| २ | प्रकल्पातील कामाचे कार्यादेश दिल्यानंतर | ०.१६ |
| ३ | प्रकल्पाचे २५ टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.२७ |
| ४ | प्रकल्पाचे ५० टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.२७ |

| | | |
|---|---|---|
| ५ | प्रकल्पाचे ७५ टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.४० |
| ६ | प्रकल्पाचे १०० टक्के काम पुर्ण झाल्यानंतर | ०.४० |
| | **एकुण** | २.००% |

सदर प्रकल्पाकरीता ढोबळ अंदाजपत्रकानुसार एकुण सात ठिकाणी नाल्यांचे पुनःर्जीवन करणे करीता १०.६५ कोटी इतका खर्च अपेक्षित आहे. व इतर रक्कमेच्या २% रक्कम प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारास देय राहील. तरी सदर बाबत राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी अनुसंधान संस्थान, नागपुर (NEERI) यांनी प्राधिकृत केलेली एजन्सी M/S Emergy Envio Private limited या संस्थेची वरील प्रमाणे प्रकल्पाकरीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणुन नियुक्ती करणे बाबत मंजुरी मिळणेस्तव प्रस्ताव मा.महासभेकडेस सादर करणे सविनय सादर.

यावर मा.मुख्यलेखापरिक्षक यांचा अभिप्राय की, नगरविकास विभागाचे शासन निर्णय दि.०४ जुन २०१८ नुसार प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्तीबाबत तसेच सार्व.बांधकाम विभागाचे शासन निर्णय दिनांक २७/०९/२०१८ मधील परिच्छेद क्रमांक २.९.३ प्रमाणे जाहिराती देवून प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार नियुक्ती करण्याबाबत शासन निर्णयात तरतुद असुन प्रकल्प विभागाने प्रस्तावित केलेल्या अ बाबत विना निविदा नियुक्ती देण्याबाबत महाराष्ट्र शासनाचे नगरविकास विभागाचे शासन निर्णय प्रस्तावा सोबत दिसुन येत नाही विभागाने प्रस्तावित केल्यानुसार सदरची बाब धोरणात्मक असल्याने विना निविदा प्रकल्प सल्लागार नियुक्ती बाबत मा.महासभेकडे प्रस्ताव करणे उचित राहील.

यावर उपायुक्त (सा) यांचा अभिप्राय की, अनुदान प्राप्त होण्याच्या अटीवर अ नुसार नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्ताव मा.महासभेकडे पाठविण्यास मान्यतेस्तव सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

---*---

**चर्चा :-**

**मा.श्री.भैय्या गंधे :-** आमच्या प्रभागामधील सिव्हील हडकोतील नाला सुशोभिकरण करणे बाबत निर्णय घेण्यात यावा.

**मा.महापौर साहेब :-** ठीक आहे. अजुन काही सीना नदी मध्ये समाविष्ठ होणारे इतर ओढे-नाले असतील तर ते पाईपलाईन हडको व तुमचे हद्दीतील नाला यांचा डी.पी.आर.मध्ये समावेश करण्यांत यावा.

**मा.श्री.संपत बारस्कर -** शहरातील ओढया नाल्यातही बांधकाम परवानगी दिली आहे. गावडेमळा येथील स्कायकोर्ट या बिल्डींग जवळील नाला खुला झाला नाही. ओढा नागमोडीचा वळण देवून नेला आहे. ओढा खुला करतो असे आम्हाला सांगितले पण अजून कायर्वाही झालेली नाही.

**मा.महापौर साहेब -** आयुक्त साहेब पाहणी करून विरोधीपक्ष नेता यांना काय डिझाईन केली ते दाखवा.

**मा.श्री.संपत बारस्कर -** गावडे मळा येथे नागरिकांच्या घरात पाणी शिरते.

**मा.आयुक्त साहेब -** पाहणी केलेली आहे. इंजिनिअर व नगररचना डिपार्टमेंट यांनी तेथील सर्व्हे करायचा व पाण्याचा निचरा कशा पध्दतीने करायचा हे त्यांनी सांगायचे. त्यांनी ३ पर्याय काढले ते पर्याय व्यवस्थित आहेत ते पाहिले. निगडीत नगरसेवकांशी चर्चा करून मग महासभेसमोर ठेवू असे सांगितले. तुम्ही ३-४ नगरसेवकांसमोर चर्चा करून निर्णय घ्यावा.

**मा.श्री.संपत बारस्कर -** ओढा टर्न करून लेआउट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**मा.आयुक्त साहेब -** परिस्थिती पाहिल्यानंतर ऑलरेडी डेव्हलपमेंट झाली आहे . ती रेक्टीफाय करण्याकरिता तेवढा वेळ आपल्याला नाही. पाण्याचा निचरा कुठला राईट अँगल न करता मार्गी लावा असे मी सांगितले. पहिल्यांदा आपल्या समोर जे आले ते करू. पूर्ण शहराचे पाहिलेतर वस्तुस्थितीत होणार नाही.

**---*---**

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मा.महासभा असा निर्णय घेते की, अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधील सिना नदीमध्ये जाणा-या सात नाल्यांचे (Restoration) जिर्णोध्दार करणे करीता प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराची नियुक्ती करणेस ही सभा मान्यता देत आहे. तसेच अहमदनगर महानगरपालिका हद्दीमधील सीना नदीमध्ये समाविष्ठ होणा-या इतर ओढे-नाल्यांचा देखील या डीपीआर मध्ये समावेश करण्यांत यावा. यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक : मा.श्री.महेंद्र (भैय्या) मोहनीराज गंधे,

अनुमोदक : मा.श्री.रविंद्र रावसाहेब बारस्कर,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १६** **दिनांक : २९ / ०७ /२०२०.**

---

**प्रस्तावाचा विषय :** बुरुडगांव स.नं.३४ या ठिकाणी दैनंदिन ५० मे.टन क्षमतेचा कचरा कचरा खत प्रकल्प Processing plant ५० TPD at Burudgaon मशिनरी उभारणे व एक वर्षा करीता देखभाल दुरुस्ती कामी एकत्रित ई-निविदा मागविणे बाबत.

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- १) शासन परिपत्रक क्रमांक : स्वमअ २०१८/प्र.क्र.३५५/नवि-३४ हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,४ था मजला, मंत्रालय,मुंबई दिनांक ३० जानेवारी २०१९ रोजी डीपीआर मंजुरी बाबत शासन निर्णय.

२) मा.श्री.संपत विजय बारस्कर, विरोधी पक्षनेता, अहमदनगर महानगरपालिका यांचे दिनांक ०३/०७/२०२० रोजीचे पत्र.

३) मा.श्री.कुमार बबनराव वाकळे, नगरसेवक, अहमदनगर महानगरपालिका यांचे दिनांक ०३/०७/२०२० रोजीचे पत्र.

उपरोक्त विषयानुसार प्रस्ताव सादर करण्यांत येतो की, अहमदनगर महानगरपालिकेच्या सावेडी सर्व्हे नंबर २८९ या ठिकाणी मनपा कचरा डेपो येथे खाजगी ठेकेदाराचे १०० मे.टन क्षमतेचे खत प्रक्रिया प्रकल्प असुन सदरील कामाची मुदत संपुष्ठात येणार आहे. त्यानुसार संदर्भीय शासन निर्णयानुसार अहमदनगर महानगरपालिके करीता सविस्तर प्रकल्प अहवाल मंजूर झाला आहे. त्याचप्रमाणे डिपीआर मध्ये दैनंदिन ५० मे. टन क्षमतेचा कचरा खत प्रक्रिया प्रकल्पास मंजुर असुन सदर कामाकरीता एकुण १,५७,२४,८००/- च्या खर्चास मंजूरी आहे. त्याकरीता सद्यस्थितीत सावेडी खत प्रकल्पास स्थानिक नागरीक व नगरसेवक यांचा विरोध आहे व पुढील १५ वर्षाच्या दृष्टीकोनातुन लोक संख्यात वाढ व त्या प्रमाणात कचरा निर्मिती मध्ये वाढ लक्षात घेता कच-यामध्ये वाढ होणार आहे.

संदर्भीय क्रं.२ व ३ नुसार मा.श्री.संपत विजय बारस्कर व मा.श्री.कुमार बबनराव वाकळे या पदाधिकारी यांनी दिनांक ०३/०७/२०२० रोजी देवुन कळविले आहे की,"सावेडी कचरा डेपो जवळचा परिसर दाट लोकवस्तीचा झालेला असुन सावेडी कचरा डेपो या ठिकाणाहुन दुसरीकडे हलविणे बाबत परिसरातील नागरिकांनी वेळोवेळी मागणी करुन आंदोलन देखील केलेले आहे. सावेडी उपनगरातील मध्यवस्तीत असुन त्या डेपो पासुन जवळच्या रहिवाशांना खुप मोठया प्रमाणात त्रास होत आहे. याठिकाणी कचरा साठवुन त्यावर प्रक्रिया करणेकरीता नागरिकांचा मोठ्या प्रमाणावर विरोध असल्यामुळे या ठिकाणी कचरा प्रक्रिया केंद्र उभारु नये अशी त्या भागातील नागरिकांची मागणी आहे. यापुर्वी मा.आयुक्त साहेब यांनी या परिस्थितीचा विचार करुन मला सावेडी कचरा तात्काळ बंद करणार असल्याबाबत पत्र दिलेले होते. तरी सावेडी परिसरातील दाट लोक वस्तीचा विचार करुन त्यांच्या आरोग्याच्या दृष्टीने विचार करुन सावेडी कचरा डेपो तात्काळ बंद करण्यांत यावा. अन्यथा सावेडी परिसरातील सर्व नागरिकांसह तीव्र स्वरुपाचे आंदोलन करण्यात येईल असे आशयाचे पत्र दिलेले आहे."

त्यानुसार मा.पदाधिकारी यांच्या पत्रानुसार इतर ठिकाणी सध्या जागा उपलब्ध होत नसल्याने सावेडी सर्वे नं.२८९ या ठिकाणी डिपीआर मंजुरीनुसार ५० मे.टन चा खत प्रकल्प न उभारता तो बुरुडगांव स.नं.३४ या ठिकाणी दैनंदिन ५० मे.टन क्षमतेचा कचरा, कचरा खत प्रकल्प Processing plant ५० TPD at Birudgaon मशिनरी उभारणे योग्य राहील किंवा अन्य ठिकाणी किमान १० एकर जमीन नगररचना विभागा मार्फत उपलब्ध झाल्यास या ठिकाणी प्रकलप उभारता येईल. सदरील कामाकरीता खाजगी एजन्सी मार्फत कामे करुन घ्यावी लागेल.

सबब वरिल प्रमाणे सोबत जोडलेल्या अटी व शर्तीनुसार व डिपीआर मधील मंजुर तरतुदी नुसार बुरुडगांव स.नं.३४ या ठिकाणी दैनंदिन ५० मे.टन क्षमतेचा कचरा, कचरा खत प्रकल्प Processing plant ५० TPD at

Birudgaon मशिनरी उभारणे, पुरवठा व स्थापत्य कामे करणे व एक वर्षाकरीता देखभाल व दुरुस्ती करणेकामी दर निश्चिती करीता ई-निविदा प्रसिध्द करणे व ई-निविदा प्रक्रिया राबविणेस येणा-या खर्चास तसेच सदरील ई-निविदा प्रसिध्द करणेकरीता एका राज्यस्तरीय व एका स्थानिक वर्तमान पत्रात प्रसिध्दी कामी येणा-या खर्चास मंजूरी मिळणेस्तव आदेशार्थ सविनय सादर.

यावर आरोग्यअधिकारी यांचा अभिप्राय की, अ प्रमाणे कार्यवाहीस मंजूरीस्तव सादर.

यावर मुख्यलेखाधिकारी यांची सहमतीदर्शक स्वाक्षरी असे.

यावर मुख्यलेखापरीक्षक यांचा अभिप्राय की, नगरविकास विभागाचे शासन निर्णय ३० जानेवारी २०१९ नुसार अहमदनगर महानगरपालिका स्वच्छ भारत अभियान अंतर्गत (नागरी) घनकचरा व्यवस्थापन प्रकल्पास प्रशासकीय मान्यता दिली असुन त्या अटी व शर्ती प्रमाणे विभागाने खात्री करुन विवरण पत्रातील अनु क्र.७ मध्ये TPD सावेडी येथे उभारणे बाबत मंजूरी दिली असुन त्या ऐवजी मनपाने बुरुडगांव येथे १०० TDP खत प्रकल्प उभारणीस सुरुवात केली आहे. यांची प्रस्तावात नोंद नाही. विवरण पत्रातील खत प्रकल्पाची जागा बदली बाबत शासनाची अद्यापही त्या प्रकल्पास मंजूरी प्राप्त नाही. हेही टिप्पणीत नमुद नाही याची विभागाने खात्री करावी. तसेच महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभाग, नाशिक यांचे तांत्रिक मंजूरी आदेश क्र.१३१३/२०१८ दिनांक ३१/०७/२०१८ मधील अटी व शर्ती क्र.१ ते ३२ प्रमाणे विभागाने कार्यवाही करावी.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, मुलेप चे आक्षेपाबाबत CSI चर्चा करा.

यावर आरोग्यअधिकारी यांचा अभिप्राय की, चर्चा झाली त्याप्रमाणे मंजूरीसाठी मा.महासभेसमोर सादर करणेस आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, DPR मध्ये नमुद असले प्रमाणे करणेस मान्यता.

---*---

**उपमहापौर सौ.मालनताई ढोणे :-** बुरुडगांव सर्व्हे नंबर ३४ या ठिकाणी दैनंदिन ५० मे.टन क्षेमतेचा कचरा कचरा खत प्रकल्प प्रोसेसींग प्लॅन्ट ५० टीपीडी at बुरुडगांव मशिनरी उभारणे व एक वर्षाकरीता देखभाल दुरुस्ती कामी बायोमायनिंग यंत्रणा उभी करणे, अंतर्गत गटार करणे यासाठी या सभेत तरतुद करण्यांत यावी. पूर्वीची निविदा रद्द करुन नव्याने निविदा मागवावी.

**मा.महापौर साहेब :-** आपले म्हणण्याप्रमाणे कार्यवाही करु.

**मा.श्री.गणेश भोसले :-** बुरुडगांव स.नं.३४ या ठिकाणी ५० मे.टन क्षमतेचा कचरा कचरा खत प्रकल्प प्रासेसिंग प्लॅन्ट उभारणी बाबत घेतला आहे. अहमदनगर महानगरपालिकेने स्वच्छ भारत अभियान अंतर्गत डीपीआर मध्ये सावेडी व बुरुडगांव येथे कचरा डेपो दर्शविला आहे. असे असतांना सावेडी कचरा डेपो हटवता येतो का.

**मा.महापौर साहेब :-** माझे म्हणणे आहे ४ ठिकाणी करा म्हणजे कोणावरही लोड येणार नाही. चार झोन मध्ये केला तरी चालेल. मी या ठिकाणी निर्णय घेतो. चार ठिकाणी करतो.

**डॉ.श्री.पैठणकर :-** महाराष्ट्र शासनाचा डीपीआर मंजूर झालेला आहे. शासन निर्णया प्रमाणे त्यातील विवरण पत्रात ७ वा मुद्दा आहे. त्यामध्ये ५० मे.टन प्रकल्प बुरुडगावला प्रस्तावित केला आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** सावेडी येथील जागा कचरा डेपोसाठी आरक्षीत आहे.

**डॉ.श्री.पैठणकर :-** प्लॅन्ट पूर्ण मोकळा सोडून द्यायचा नाही. त्या ठिकाणी प्रोसेसिंग प्लॅन्ट उभारायचा आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** एमआयडीसी बोल्हेगांवहुन कचरा बुरुडगांवला नेणार का. बुरुडगांव डेपो ॲनिमल वेस्ट, बायो मायनिंग, प्रोसेसिंग प्लॅन्टचा प्रकल्प आहे. आणखी किती प्रकल्प बुरुडगांवला नेणार. एका ठिकाणी एक प्लॅन्ट असतांना आणखी एक त्याठिकाणी उभारायचा हा कोणता न्याय ? कसे काय करता येईल एका जागेवर किती

लोड येणार गाड्यांचा खर्च कीती होणार ट्रिपा कीती होतील. बारस्कर साहेबांचा प्रभाग आहे. नागरिकांची मागणी आहे. आपलाच कचरा आहे. बाहेरचा कचरा नाही. या गोष्टी होत नाही. गव्हर्नमेंट मंजूरी आणली का. जागेचे आरक्षण बदलता येते का. आतापर्यंत ५-१० कोटी या प्रकल्पावर खर्च केले त्याचे काय. हे जर करत असताल तर कोर्ट महानगरपालिकेला सोडणार नाही. कोर्टाने वेळोवेळी दंड केला आहे.

**मा.महापौर साहेब :-** चार ठिकाणी केले पाहीजे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** ४ नाही ५ ठिकाणी करा पण एकाच ठिकाणी किती लोड देणार याचाही विचार करण्यांत यावा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** बुरुडगावला कचरा डेपो न्या ही आमची मागणी नाही. सावेडी कचरा डेपो इतरत्र हलवून त्याठिकाणी स्मशानभुमी करावे असा विषय आहे. या भागात २५-३० हजार विद्यार्थी शिकतात. अनेक शाळा आहेत डॉन बास्को, मुक बधीर विद्यालय, ढवणवस्ती या डेपोला प्रोफेसर कॉलनी चौक, पाईपलाईन रोड, डॉन बास्को, तपोवन रोड या भागातील परिसर आहे. या भागात कचरा डेपोच्या दुर्गंधीमुळे आरोग्य धोक्यात आलेले आहे. १ ते दीड लाख लोकसंख्या आहे. उपनगर या भागात डेव्हलपमेंट होत नाही. नागरिकांचे मत घ्या.

**मा.श्री.गणेश भोसले :-** दोन कचराडेपो असणे योग्य की एक योग्य. महानगरपालिकेचा खर्च वाढणार नाही का. शासनाची आरक्षण बदलण्यासाठी मंजूरी घ्यावी लागणार आहे. कचरा वाहतुकीसाठी सुध्दा किती वेळा चकरा माराव्या लागतील. वेळेचा अपव्यय होणार, इंधनाचा खर्च वाढणार गव्हर्नमेंटची मान्यता घ्यावी लागणार. एकाच ठिकाणी तुम्ही नेता. नगर महानगरपालिकेचे आपल्याला हित कसे पाहायचे आहे. कचरा आपल्या नगर शहराचा आहे. ज्याठिकाणी कचरा नेतो त्या ठिकाणी रस्ता दिला नाही. लाईट दिली नाही त्यांचे पाणी बंद केले. महानगरपालिकेचे नुकसान होईल. शासनाने मंजूरी दोन ठिकाणी दिली आहे. हरीत लवादाची केस चालू आहे. आपल्यावर ताशेरे आले आहेत. अजुनही दंड झाला तर महानगरपालिकेला अधिकारी आयुक्त, उपायुक्तांच्या पगारातुन जर हरीत लवादाने जर दंड केला तर तो वसुल करण्याचा जिम्मा कोणाचा या प्रकल्पावर झालेला खर्च वाया जाईल.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** या ठिकाणचा खर्च वाया जाणार नाही. तरीही स्मशानभुमी साठी शेड, कंम्पौंड, कठडे हेही लागणार आहे. तुमची जी बुरुडगांव विषयी कळकळ आम्हाला मान्य आहे. तुम्ही जिथे रहात होता त्या ठिकाणचा कचरा डेपो, तो कोणी हलविला आंदोलने कोणी केली. आमच्या दारात कचरा टाकायला कसे सांगता.

**मा.श्री.गणेश भोसले :-** तुम्ही नीट माहिती घ्या तेथे कचरा डेपोवर आरक्षण नव्हते. काही गोष्टीत महानगरपालिकेचे हित तुम्हाला पहावे लागेल.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** आता महापौर साहेब यांनी ४ ठिकाणी कचरा डेपो हलविणे बाबत सांगीतले आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** या ठिकाणी मा.शासनाची मान्यता घ्यावी लागेल. एका ठिकाणी १०० टन व एका ठिकाणी ५० टन प्रस्तावित आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** डीपीआर आपण पाठविलेला आहे.

**मा.आयुक्त साहेब :-** बदल करण्याची मंजूरी घेवून पाठवावा लागेल.

**मा.श्री.गणेश भोसले :-** हरीत लवादाचे देणे चालू आहे. अगोदरच ४ प्लॅन्ट आहेत. अजून ५ वा प्लॅन्ट येथे नेता, सावेडी कचरा डेपोच्या ठिकाणी स्मशानभुमी, गार्डन करायचा खर्च वाढणार नाही का. एमआयडीसी कोठे, बुरुडगांव कोठे दिवस भरात ३ ट्रीप होतील. हरीत लवादाची जर दंडात्मक कारवाई जर झाली तर आयुक्त त्यास जबाबदार राहतील.

**मा.आयुक्त साहेब :-** तपोवन येथे महानगरपालिकेचे कचरा डेपो आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** लेखा परीक्षक काय म्हणतात सावेडीत प्लॅन्ट जर झाला तर त्याठिकाणी वास येणार नाही. नागरिकांना कुठलाच त्रास होणार नाही. लेखापरीक्षक यांचा अभिप्राय वाचन केला.

**मा.आयुक्त साहेब :-** जो काही ठराव होईल बदला संदर्भात मान्यता मिळाल्यानंतर शासनाकडे पाठवू.

**मा.गणेश भोसले :-** त्या ठिकाणी माझा विरोध नोंदवावा हरीत लवादाने जर भविष्यात दंड केला तर तो संबंधितांकडून वसुल करावा.

**मा.महापौर साहेब :-** कचरा डेपोसाठी आवश्यक असणारी कामे १४ व्या वित्त आयोगातून करण्यांत यावीत.

**---*---**

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मा.महासभा असा निर्णय घेते की, बुरुडगांव कचरा डेपो येथे ५० मेट्रीक टन क्षमतेचा कचरा प्रक्रिया प्रकल्प उभारण्यात यावा. याकरीता डीपीआर मध्ये प्राप्त झालेले अनुदान व १४ वा वित्त आयोग मधील अनुदान या कामासाठी वापरण्यात यावा  तसेच भविष्यात होणारी लोकसंख्या वाढ विचारात घेता शहरातील ४ झोन मध्ये डी सेट्रलायझ्ड कचरा प्रक्रीया प्रकल्प विकसीत करण्यांत यावेत. त्या अनुषंगाने जागा संपादीत करावी. यास ही सभा मान्यता देत आहे.

व कचरा प्रक्रियासाठी मंजूरी शासन डीपीआर नुसार मृत जनावरे विल्हेवाट प्रकल्प, १०० मेट्रीक टन कचरा प्रक्रिया प्रकल्प बायोगॅस प्रकल्प, बायोमायनिंग प्रकल्प इ.साठी तसेच डेपोच्या संरक्षणासाठी वीज यंत्रणा उभी करणे, अंतर्गत रस्ते तयार करणे लिचेट ट्रीटमेंट प्लांट पुनर्जिवीत करणे, अंतर्गत गटार तयार करणे इ.साठी ही सभा मान्यता देत आहे. तसेच कचरा डेपोवर महानगरपालिकेचा स्वत:चा वजनकाटा उभा करण्यासाठी आवश्यक ती स्थापत्य कामे, मृत जनावरे विल्हेवाट करीता क्रेन बसविणे, बुरुडगांव कचरा डेपो याठिकाणी आग प्रतिबंधक उपाययोजना म्हणुन ५० हजार लिटरची पाण्याची टाकी बांधण्यास १४ व्या वित्त आयोगातुन सदर कामे करणेस ही सभा मान्यता देत आहे.

तसेच डेपोवरील चालू असलेल्या प्रकल्पांची तपासणी निरी, नागपूर या संस्थेमार्फत करुन घ्यावी यासाठी येणा -या खर्चास ही सभा मान्यता देत आहे. घनकचरा विभागाच्या बाबतीत मंजूर डीपीआर नुसार जेसीबी पोकलेन डंपर व जी वाहने खरेदी करायची आहे त्यांच्या डीपीआर मधील नमूद किमती या प्रत्यक्षातील किमतीपेक्षा भिन्न आहेत. तरी डीपीआर मध्ये हे जे अनुदान मंजूर झाले आहेत त्या अनुदानामध्ये जेवढी वाहने घेणे शक्य असतील तेवढी वाहने खरेदी करण्याची कार्यवाही करावी व महानगरपालिके करीता आवश्यकता असल्यास शववाहिका घेण्यास अनुदान उपलब्ध करणेसाठीचा प्रस्ताव मा.शासनाकडेस सादर करणेस ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक : मा.श्री.संपत विजय बारस्कर,

अनुमोदक : मा.डॉ.श्री.सागर अर्जुन बोरुडे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.

**अहमदनगर महानगरपालिका,अहमदनगर.**

**प्रस्ताव क्रमांक : १७** **दिनांक : २९ / ०७ /२०२०.**

---

**प्रस्तावाचा विषय :** सावेडी येथील सर्व्हे नं.२८९ मधील अहमदनगर महानगरपालिकेचा कचरा डेपो इतरत्र हलवून त्या ठिकाणी स्मशानभुमी, उद्यान व मल्टीपर्पज क्रीडा संकुल विकसित करणे बाबत...

---*---

**प्रस्तावाचा मजकुर :-**

संदर्भ :- मा.संपत विजय बारस्कर, विरोधी पक्ष नेता, अहमदनगर महानगरपालिका यांची दिनांक २०/०७/२०२० रोजीची यांदी.

उपरोक्त विषयान्वये प्रस्ताव सादर करण्यात येतो की, मा. संपत विजय बारस्कर, विरोधी पक्षनेता यांनी दि.२०/७/२०२० रोजी यादी देवुन कळविले आहे +की, तपोवन येथे महानगरपालिकेचा कचरा डेपो आहे. सदरील कचरा डेपो मुळे परिसरातील नागरिकांना दुर्गंधीचा त्रास होत आहे. या कचरा डेपो मुळे नागरिकांचे व त्यांच्या कुटुंबाचे आरोग्य धोक्यात आले आहे. शहरात कचरा डेपो एवढया मोठया प्रमाणावर असणे हे संपूर्ण उपनगरासाठी धोक्याचे चिन्ह आहे. नियमाप्रमाणे कचरा डेपो हा शहरापासून १५ ते २० कि.मी. अंतर दूर असला पाहिजे. जेणेकरून या कचरा डेपोचा त्रास नागरिकांना होणार नाही. पण आत्ताची स्थिती जी आहे. ती उपनगराच कचरा डेपो असल्यामुळे जवळपास मोठी लोकसंख्या असलेली वस्तीतील लोकांना सध्याच्या स्थितीत अनेक आजारांना सामोरे जावे लागत आहे. या गंभीर बाबीचा महानगरपालिका आयुक्त साहेब व महापौर साहेब यांनी तातडीने लक्ष घालून सदरील कचरा डेपो शहराच्या व उपनगराच्या बाहेर तात्काळ हलवावे व सदर जागेत सावेडी उपनगरासाठी आवश्यक असणारी अमरधाम आणि अदयावत उदयान विकसीत करावे अमरधाम मुळे सावेडी उपनगरातील नागरिकाचा अनेक वर्षाचा अंत्यविधीचा प्रश्न मार्गी लागण्यास मदत होईल. सदरील कचराडेपो हलविणे बाबत पत्र देवुन आंदोलन करण्यात आले त्यावेळी मा.आयुक्त साहेब यांनी कचरा डेपो इतरत्र हलविणे बाबत दि.१०/६/२०१९ रोजी लेखी आश्वासन दिले होते. सावेडी परिसरातील खेळांडूना खेळाचे मैदान उपलब्ध झाल्यास शहरातील चांगला खेळाडू घडण्यास मदत होईल. याकरिता सदर ठिकाणी मल्टीपर्पज क्रीडा संकुल विकासीत करणे आवश्यक आहे. तरी सावेडी येथील सर्व्हे नं.२८९ मधील अहमदनगर महानगरपालिकेचा कचरा डेपो इतरत्र हलवून त्या ठिकाणी स्मशानभूमी व उदयान विकसीत करणे तसेच मल्टीपर्पज क्रीडा संकुल उभारणे बाबत असे आशयाचे पत्र दिले आहे.

त्यानुसार दि.४/७/२०२० पासून शहरात निर्माण होणार घनकचरा हे सावेडी डेपोवर न टाकता बुरूडगांव कचरा डेपोवर वाहतुक करण्याची कार्यवाही चालू आहे त्याचप्रमाणे घनकचरा व्यवस्थापन सविस्तर प्रकल्प अहवाल (डिपीआर) मंजुरीनुसार १०० व ५० मे. टन कचरा प्रक्रिया खत प्रकल्प , बायोमेथेनेशन खत प्रकल्प व सॅनिटरी लॅडफिल साईड हे मनपा बुरूडगाव कचरा डेपो येथे करण्यात आलेले आहे. त्यामुळे शहरातील कचरा हा पुर्णपणे मनपा बुरूडगाव कचरा डेपो येथे जाणार आहे.

त्यामुळे मा. संपत विजय बारस्कर , विरोधी पक्ष नेता यांच्या यादीनुसार मनपा नगररचना विभागाचे अभिप्राय घेवुन मा.महासभेची मंजुरी घेणेकामी प्रस्तावीतनुसार मंजुरीस्तव सविनय सादर.

येणेप्रमाणे आरोग्य अधिकारी यांचा अहवाल असे.

यावर मा.नगरररचनाकार यांचा अभिप्राय की, आरोग्यधिकारी यांचे प्रस्तावाच्या अनुषंगाने नगररचना विभागाचे अभिप्राय खालील प्रमाणे...

१. मंजुर विकास योजने नुसार विषयांकित सावेडी स.नं.२८८ व २८९ पैकी जागेवर आरक्षण क्र.८१ अन्वये 'कचरा डेपो व प्रक्रिया केंद्र' या वापरासाठी आरक्षीत आहे.

२. सदर आरक्षीत जागेचे एकुण क्षेत्र ८३००० चौ.मी. (८.३० हेक्टर) इतके असुन त्यापैकी साधारण ६६५०० चौ.मी. इतके क्षेत्र विकास हक्क हस्तांतरणाच्या माध्यमातून (TDR) मनपाने संपादीत केलेले आहे.

३. उपरोक्त प्रस्तावाच्या अनुषंगाने सदर आरक्षात फेरबददल करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियमातील कलम ३७ अन्वये फेरबदलाची वैधानीक कार्यवाही करणे आवश्यक आहे व सदर कार्यवाही करणेसाठी मा.महासभेपुढे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

यावर सहाय्यक संचालक नगररचनाकार यांचा अभिप्राय की, आरोग्य विभागाचा अभिप्राय सविस्तर व स्वंयस्पष्ट आहे. तेव्हा उपरोक्त प्रमाणे कार्यवाही साठी प्रस्ताव महासभेपुढे ठेवणे बाबत आदेशार्थ सादर.

यावर मा.आयुक्त साहेब, अहमदनगर महानगरपालिका यांचा अभिप्राय की, उक्त आलेल्या दोन्ही विभागांचे अभिप्रायानुसार प्रकरणी जागा घनकचरासाठी आहे. आवश्यक ठराव जागेच्या मुळ संपादनाची अटी व शर्ती पहाणे जरुरीचे आहे व बदल अनुज्ञेय होत असल्यास उक्त प्रमाणे कार्यवाही साठी कलम ३७ प्रमाणे महासभेचे निर्णयार्थ सादर.

---*---

**चर्चा :-**

**मा.श्री.संपत बारस्कर :-** याची मागणी करतांना या भागात शाळा अनेक आहेत, लोकसंख्या जास्त आहे. हा विषय सावेडी कचरा डेपो बाबत हरीत लवादाची दिशा चुकलेली आहे. आरक्षण पडतांना आपण जो म्हणत आहात त्या ठिकाणी खर्च झाला. रस्ता कंम्पौंड याची आवश्यकता आहे. राज्य शासनाने एमएसईबी करीता जागा मागीतली. कचरा डेपोच्या आरक्षीत जागेत एमएसईबी चे सेंटरला जागा दिली आहे.

**मा.महापौर साहेब :-** कशा पध्दतीने करता येईल याचा विचार करु.

**मा.सौ.सोनाली चितळे :-** भुयारी गटर योजनेचे काम संथ आहे. मुदत संपत आलेली आहे. कामास मुदतवाढ देवू नये. रस्त्याची कामे लवकरात लवकर करण्यांत यावीत. रस्ता क्रॉसिंग साठी परवानगी कोणाची घ्यायची.

**मा.महापौर साहेब :-** रस्ता क्रॉसिंग साठी महानगरपालिकेची परवानगी घ्यायची.

**मा.सौ.मीनाताई चोपडा :-** बुरुडगांव रोडला सफाई कामगार नाही.

**मा.महापौर साहेब :-** तुमच्या भागातलाच माणूस तुमच्याकडे देण्याची व्यवस्था करतो.

**मा.सौ.मीनाताई चोपडा :-** भारतीय जैन संघटनेच्या माध्यमातून मोफत ॲन्टीजेन तपासणी करण्यांत येणार आहे.

**मा.महापौर साहेब :-** आपल्या जैन संघटनेचे कौतुक करणे क्रमप्राप्त ठरते.

**मा.सौ.मीनाताई चव्हाण :-** सावेडी कचरा डेपो लवकरात लवकर हलविण्यात यावा सदर भागात छोटी मुले आहेत. या जागेत क्रीडांगण व्हावे उपनगर झपाटयाने वाढत आहे. कचरा डेपो लवकरात लवकर हलविण्यांत यावा.

**डॉ.श्री.सागर बोरुडे :-** गार्डन सूचनेला अनुमोदन आहे. त्या परिसरात एखादी मयत झाली तर अंतर खूप आहे. या परिसरात अमरधाम होणे गरजेचे आहे. नागापूर कॉटेज कॉर्नर ढवणवस्ती सावेडी गावठाण परिसरात अमरधामची कुठलिही सुविधा नाही. रात्रीच्या वेळी ॲम्ब्युलन्स पहावी लागते. सावेडी भागात अमरधामची गरज आहे. दुर्गंधीमुळे कचरा डेपो हलवण्यांत यावा. पुर्वी बुरुडगांवला कचरा डेपो होता आता येथे नव्याने झाला आहे. सावेडी येथील सर्व्हे नंबर २८९ मधील अहमदनगर महानगरपालिकेचा कचरा डेपो इतरत्र हलवून त्या ठिकाणी स्मशानभुमी, उद्यान व मल्टीपर्पज क्रीडा संकुल विकसित करणे अशी आमची मागणी आहे. मुरुमाची फाईलवर तातडीने अंमलबजावणी करावी. वॉर्डातुन अमृत योजनेचे लाईन गेली रोड मध्यभागी टाकली. मोजमापानुसार टाकली नाही. टीपीआर वर इतरांशी चर्चा केली भविष्यात रस्ता झाला लाईन फुटल्यास अडचण होवू शकते लाईन योग्य प्रमाणे टाकावी किंवा काहीतरी कार्यवाही करावी.

**मा.आयुक्त साहेब :-** पाहतो.

**मा.सौ.दिपाली बारस्कर :-** महानगरपालिकेकडून सुविधा पुरविते यावेळेस थोडेफार कमी पडतो. चेंबर वगैरे दुरुस्तीत कमी पडतो. यासर्व गोष्टींकडे स्वतः लक्ष घालावे. ही खरच खूप चांगली गोष्ट आहे. तिथे खूप दुर्गंधी येते दोन तीन शाळा आहेत. उद्यान व मल्टीपर्पज करता ही चांगली गोष्ट आहे. त्यामुळे महानगरपालिकेचे उत्पन्न ही चांगले होईल. स्मशान भूमी स.नं.२७ या ठिकाणी आरक्षण आहे ते आरक्षण उठविण्यांत यावे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** चार ठिकाणी न करता एक ठिकाणी नेता बुरुडगांवला लोक रहात नाहीत का.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** बुरुडगांव कचरा डेपो ४ कि.मी. आहे. पण त्याच्या अगोदर तेथील लोकांची मागणी लाईट रस्ते पाणी द्या अशी आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** मग त्यांची मागणी पूर्ण करा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** आपले मागणी नुसार त्यांना रस्ता, पाणी, लाईट देवू. ठरावाच्या चर्चेच्या अनुषंगाने आपण ठरावात घेवून आपण त्यांना सुविधा देवू.

**मा.श्री.गणेश भोसले :-** एका प्लॅन्टवर चार-चार प्लॅन्ट चालतील का.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** विषय फक्त १०० टन कचरा वाहतुकीचा नाही.

**मा.श्री.गणेश भोसले :-** ॲनिमल वेस्ट, बायोमेथीन प्रोसेसिंग व आणखी प्रकलप आहेत.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** आपण यातुन मार्ग काढू.

**मा.श्री.गणेश भोसले :-** हरीत लवादाने जर काही दंडात्मक कारवाई करण्यांत आली तर प्रशासनाला जबाबदार धरावे. त्याठिकाणी पर्पज बदलण्याशिवाय काही करता येत नाही.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** तुम्ही मदत करा.

**मा.महापौर साहेब :-** आपण चालू ठिकाणी करु जो पर्यंत पर्पज बदलत नाही तो पर्यंत काही करणार नाही. विषय क्रमांक १६ संपूर्ण कचरा बुरुडगांव येथे कचरा प्रक्रीया न करता आणखी दोन ठिकाणी जागा संपादीत करावी व कचरा प्रक्रीया शासन डीपीआर अंतर्गत रस्ते करणे. कचरा डेपोवर खत प्रकल्प करावे. यापुर्वी घनकचरा विभागासाठी काढण्यांत आलेली निविदा रद्द करुन नव्याने निविदा काढणेस ही सभा मान्यता देत आहे.

**मा.श्री.गणेश भोसले :-** लॉकडाउन मध्ये दुधवाले, डेअरी वाल्यांसाठी संध्याकाळची वेळ ७.०० वाजेपर्यंत करण्यांत यावी.

**मा.महापौर साहेब :-** ज्यांचे दुधाचे व्यवसाय असतील त्यांनी अर्ज करावेत, मा.आयुक्त निर्णय घेतील.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** जे भोसले साहेब बोलले त्याशी मी सहमत आहे. संपूर्ण कचरा डेपो एका ठिकाणी न नेता चार ठिकाणी त्याची विभागणी करण्यांत यावी.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** यांचा विरोध नोंदवून घ्यावा.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** यांनी अगोदर सांगावे.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** तुम्ही जर बुरुडगांवला नेला तर तेथील नागरीक विरोध करतील. चार ठिकाणी कचरा डेपो झाला पाहीजे. ५३% कचरा हा असतो त्यापासुन मिथेल गॅस तयार होतो आजुबाजुच्या शेतीवर परिणाम होतो. बुरुडगांवच्या शतक-यांची अशी मागणी आहे.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** सावेडी कचरा डेपो बाबत आजुबाजुच्या परिसरात नागरिकांना त्रास होतो. शेतक-यांच्या जमिनी खराब होत आहेत. जो ठेकेदाराला आपण प्रक्रिया करायला देतो त्याने रोजच्या रोज कच-यावर प्रक्रीया केली पाहिजे. जो ठेकेदार आहे त्यांच्यावर कारवाई केली पाहीजे.

**मा.महापौर साहेब :-** हलवावा असेच त्यांचे मत आहे. एका ठिकाणी नसून ४ ठिकाणी झाल्यास दुर्गंधी होणार नाही असे त्यांचे मत आहे. रोजच्या रोज प्रक्रीया केल्यास अडचणी, दुर्गंधी येणार नाही.

**मा.श्री.शाम नळकांडे :-** भुयारी गटारच्या कामात अडचणी आहेत.

**मा.महापौर साहेब :-** उद्याच ठेकेदार यांना बोलवून घेवू. आणखी काही विषय असतील तर विषय संपवा.

**मा.श्री.स्वप्नील शिंदे :-** महानगरपालिकेचा १५ वा वित्त आयोगातुन जो निधी प्राप्त आहे. तसेच मा.केंद्र शासनाकडून व मा.राज्य शासनाकडून विविध योजने अंतर्गत प्राप्त होणारा निधी, जिल्हा नियोजन कडून प्राप्त होणारा निधी तसेच महानगरपालिका निधी त्यामध्ये कामे सूचविण्यासाठी मा.महापौर यांना अधिकार देण्यांत यावेत.

**मा.श्री.संपत बारस्कर :-** यास मी अनुमोदन देतो.

**मा.श्री.योगीराज गाडे :-** कोरोनासाठी जो निधी शासनाकडून येणार त्याचे अधिकार आयुक्तांना आहेत. सर्व पक्षीय नगरसेवकांना विचारात घेवून यावर काम करण्यांत यावे. सर्व पक्षीयांची मिटींग लावण्यात यावी कोणत्या पध्दतीवर खर्च होतो.

**मा.महापौर साहेब :-** महानगरपालिकेचा १५ वा वित्त आयोगातुन जो निधी प्राप्त आहे. तसेच मा.केंद्र शासनाकडून व मा.राज्य शासनाकडून विविध योजने अंतर्गत प्राप्त होणारा निधी, जिल्हा नियोजन कडून प्राप्त होणारा निधी तसेच महानगरपालिका निधी त्यामध्ये कामे सूचविण्यासाठी मा.महापौर यांना मा.नगरसेवक यांचे सूचनेनुसार अधिकार देण्यांत येत आहेत. प्रत्येक पक्षाचे नेते बोलावून एक बैठक घेवू. आयुक्तांनी या अगोदर १५ लाख प्राप्त झ ााले सांगीतले आहे. सदरच्या जागेवरील आरक्षण उठविणे बाबत कार्यवाही करावी. चार झोन मध्ये चार कचरा डेपो करण्याबाबत कार्यवाही करावी.

**---*---**

**ठराव :-**

ऑफिस रिपोर्ट व सभागृहात झालेल्या चर्चेनुसार मा.महासभा असा निर्णय घेते की, सावेडी येथील सर्व्हे नं.२८९ मधील आरक्षण उठविणे संदर्भात प्रशासनाने योग्य ती कार्यवाही करावी तसेच कचरा डेपोचा कायमस्वरुपी प्रश्न मिटणेसाठी चार झोन मध्ये जागा उपलब्ध करुन कचरा डेपो उभारणे बाबत कार्यवाही करावी. यास ही सभा मान्यता देत आहे. ड वर्ग विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावलीमधील नियम क्रंमाक २५-८ नोट २ नुसार सदर आरक्षणामध्ये स्मशानभुमी व इतर ४ वापर अनुज्ञेय करणे बाबत मा.संचालक नगररचना पुणे यांची मान्यता घ्यावी.व आवश्यकता भासल्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अनुसार फेरबदलाची कार्यवाही करावी.यास ही सभा मान्यता देत आहे.

मा.शासनाकडून अहमदनगर महानगरपालिकेस १५ वा वित्त आयोगातुन जो निधी प्राप्त झाला आहे. तसेच मा.केंद्र शासनाकडून व मा.राज्य शासनाकडून विविध योजने अंतर्गत प्राप्त होणारा निधी, जिल्हा नियोजन कडून प्राप्त होणारा निधी तसेच महानगरपालिका निधी त्यामध्ये कामे सूचविण्यासाठी मा.महापौर यांना अधिकार देण्यांत येत आहे. यास ही सभा मान्यता देत आहे.

नियमानुसार पुढील योग्य ती कार्यवाही करण्यांत यावी.

सुचक : मा.श्री. संपत विजय बारस्कर,

अनुमोदक : मा.डॉ.श्री.सागर अर्जुन बोरुडे,

ठराव सर्वानुमते मंजूर.

सही/-
महापौर,
अहमदनगर महानगरपालिका.